साप्ताहिक
माणूस
२४ मार्च ८४/२ रुपये

दोन
खास
वार्तापत्रे

# पंजाब का बुलावा है
# महाराष्ट्र आज आया है

# We the people of India

# बजेटचं नाटक कशाला?

## शरच्चंद्रांची सुरवातीची कादंबरी
## 'चरित्रहीन'

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : त्रेचाळीसावा

२४ मार्च १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार...

जयभीम. आपला १० मार्च ८४ चा अंक वाचला. दलित रंगभूमी अधिवेशनाला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी दिल्याबद्दल धन्यवाद. परंतु दुःख याचे झाले की आपल्या संजय संगवई प्रतिनिधीने पान ३० च्या शेवटच्या कॉलमवर आरोपपत्राबद्दल जे काही लिहिले आहे, ते पूर्ण विचारांती नाही. त्याचबरोबर आरोपपत्राच्या गोष्टी उगाचच कारण नसताना तुमच्या प्रतिनिधीने खऱ्या आहेत असे गृहीत धरून त्या वक्तव्यास आणि आरोपास सरळसरळ पाठिंबा दिला आहे. खरं तर जो मूर्ख माणूस पत्र काढून साधं नाव देण्याचंही धाडस करीत नाही, यावरून त्याचे आरोप किती बिनबुडाचे आहेत हे कळते. अशी भेकड मंडळी स्वतःवर असलेले आरोप चांगल्या लोकांवर लादून आपल्यासारखेच इतरांनाही बदनाम करण्याचा प्रयत्न करतात आणि आपल्या विध्वंसक वृत्तीनुसार त्या चळवळीला गाडण्याचा प्रयत्न करतात. त्यातच त्यांचा धंदा होत असतो. तेव्हा अशा वृत्तींना जास्त प्रोत्साहन देता कामा नये. चळवळीस असे वागणे धोकादायक ठरू शकते.

या चळवळीत दलित रंगभूमी पुणे, ही एकमेव संस्था अशी आहे की, जी आर्थिक नुकसान सहन करून वेगवेगळे समाजोपयोगी प्रकल्प राबवू शकते. ज्यांना मेहनत करणें जमत नाही, ज्यांना फक्त नावासाठी संस्था चालवायच्या असतात, ज्यांना या चळवळीवर आपली चूल चालवायची असते, ज्यांना दोन वर्षात साधे ५ प्रयोग देखील धड करता येत नाहीत, ज्यांचे वर्ष–सहामहिन्यात चार–चार तुकडे पडतात, ज्यांचा सामाजिक चळवळीला गाडून टाकण्याचाच प्रयत्न असतो, ज्यांचं अस्तित्व वर्ष–सहा महिन्यात संपुष्टात येतं आणि ज्यांना संस्थाही उरत नाही आणि कार्यकर्त्यांचा झेंडा खांद्यावर घेऊन चळवळीचं शोकनाट्य करणाऱ्यावर 'एक प्रेक्षक' म्हणून लिहिण्याचा केविलवाणा प्रसंग येतो, अशा काडीमोल किडयांची दखल आपल्या प्रतिनिधीने का घ्यावी ?

आपल्या प्रतिनिधीने जं 'चळवळीची जेंव्हा संस्था–संघटना–मठ–अशी परिणती होत जाते तेव्हा या गोष्टी अपरिहार्यच असतात. असे लिहिले ते कशाच्या जोरावर'? का तुमचा प्रतिनिधी इतरांप्रमाणे आम्हालाही चोर समजतो काय ? तसे पुरावे असतील तर त्वरीत जाहीर करा, आम्ही कार्य सोडून देऊ. अन्यथा–जाहीर माफी मागायला सांगा. या सर्व अनिष्ट रुढींविरुद्ध आम्ही दंड थोपटलेत. संस्थेची संघटना–या अशा संकल्पना आम्हाला स्वप्नातही मान्य होणार नाहीत. तुमच्या प्रतिनिधीला कदाचित ते मान्य असेल परंतु ती कल्पनाही आम्हाला संतापजनक आहे हे माझ्या पत्रावरून तुमच्या लक्षात आले असेलच. तेव्हा या चळवळीविषयी बोलताना अथवा लिहिताना कृपया विचारपूर्वक बोलावे. अथवा लिहावे. या चळवळीचे R.P.I. अथवा पँथर बनविण्याचा प्रयत्न करू नये. ते सहन केले जाणार नाही !

**टेक्सास गायकवाड**

विश्वस्त, दलित रंगभूमी, पुणे

[ टेक्सास गायकवाड यांचा त्या 'एक प्रेक्षका'-वरचा संताप उमजू शकतो. अशा पत्रकाची मी दखल घेतली. त्यात अशा प्रवृत्तींना प्रोत्साहन देण्याचा कोणताही प्रयत्न नाही. श्री. गायकवाड यांनी पूर्ण लेख परत वाचावा. एक समाधान देणारे व आशादायक संमेलन असा एकंदर सूर आहे. त्यातही काही प्रतिकूल गोष्टींची नोंद घेतली जाऊ नये असा हटवाद असेल तर उपाय नाही.

सर्व प्रकारच्या अनुकूल सुखद प्रतिक्रियांची अपेक्षा फार तर अनुयायांकडून करावी. श्री. गायकवाड यांचा मी अनुयायी नाही, तसेच विरोधकही नाही. एखादी बाजू दिसली तर त्याची नोंद घेतली एवढेच. यामुळे आपल्यातल्या प्रतिकूल गोष्टींची जाणीवही चळवळीतल्या मंडळींना होईल. प्रतिकूल माहिती बाहेर येऊ द्यायची नाही हा प्रकार स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून घेण्यासारखा आहे. आपल्याविषयी प्रिय असेल तेवढेच लिहिले जावे हा आग्रह आत्मघातकीच आहे.

चळवळीची पुढची परिणती श्री. गायकवाड यांना मान्यही नसेल. हा प्रश्न जर सविस्तर चर्चेचा आहे. मागचा सगळा इतिहास त्याला साक्षी आहे. दलित रंगभूमीला ते मान्य नसेल. आपले मत मांडण्यास ते स्वतंत्र आहेत. 'विचारपूर्वक बोलावे', माफी मागावी अशा पातळीवरून याचा विचार केला जाऊ शकत नाही.

—संजय संगवई ]



# मुंबापुरी

## बूँदसे गयी

अखेर, अंतुल्यांचा खटला सुरू झाला म्हणायचा. ऐतिहासिक 'दैवी सूड' या नाटकातला हा अखेरचा प्रवेश भलताच गाजणारसं दिसतंय.

अंतुल्यांनी खटल्याच्या पहिल्याच दिवसापास्नं कामकाजात अडथळे उत्पन्न करण्याचं काम सुरू केलंय. आज काय तर म्हणे हे कोर्ट माझ्यावर, माझी सुनावणी करण्यास समर्थ नाही. उद्या काय तर म्हणे विधानसभेत जावयाचे असल्यामुळे खटल्याचे कामकाज दुपारी दोननंतर स्थगित करावे. या अशा अडथळा उत्पन्न करण्याच्या कामात अंतुले तरबेज आहेत. मुसक्या जसजशा घट्ट होत जातील, तो तो अंतुल्यांची धडपड वाढत जाईल.

भ्रष्टाचार कायद्यात सुधारणा करण्याचा एकमुखी निर्णय विधिमंडळ कॉंग्रेस (आय) पक्षाने घेतला तेव्हा अंतुल्यांना पाहायला हवं होतं. कोर्टातनं ते थेट विधानभवनावर आले. केसांची झुलपं अन् खिशात गुलाबाचं फूल. बरोबरचे भाऊराव पाटील अन् बाबासाहेब भोसले आजूबाजूला धागरी फुंकत होते. अंतुल्यांच्या चेहऱ्यावर युद्ध जिंकल्याचा मग्रूर होता.

नंतर एकदम फैसला फिरला, ट्रान्स्फर सीन झाल्यासारखा. पश्चात्तापाने माणसं कशी पोळून निघतात हे आम्हाला ठाऊक आहे. हिंदी सिनेमात बघतो की ! पण गेल्या चौदा वर्षांच्या कारकीर्दीत हायकमांडला कधीच कोणत्याही गोष्टीचा पश्चात्ताप झाल्याचं आमच्या ऐकिवात नाही. मग आत्ताच, अवघ्या अठ्ठेचाळीस तासांत श्रीमती गांधींना आपल्या 'कियेका अफसोस' वाटावा म्हणजे जरा टू मचच हं ! शेवटी एक खरंय, की, 'बूँदसे गयी वह हौदसे'... कशी येणार हो ?

## शिमगा रंगलाय !

'मी आपणास सुयश चिंतितो...' असा मऱ्हाटी संदेश राज्यपालांनी दिला अन् महाराष्ट्र विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात झाली. पहिल्याच दिवसापास्नं वातावरण काय भन्नाट तणावपूर्ण होतं म्हणताय ! एकदम रंगारंग कार्यक्रम !

पहिल्याच दिवशी विरोधी पक्ष आमदारांनी बोंबटचा मारून येते सात आठवडे आपली भूमिका काय राहणार आहे याची चुणुक दाखवली आहे. विरोधी पक्षाचं फ्लोअर–कोऑर्डिनेशन आतापर्यंत तरी बरं आहे. नवीन काही उपटू देऊ नको म्हणजे झालं.

विधानपरिषदेत रामभाऊ किंगाडे आणि शामराव पेजेसारख्या बुजुर्ग कॉंग्रेस (आय) सदस्यांनी विरोधी नेत्याला शोभलसं घणाघाती भाषण ठोकून खुद्द प्रधानमास्तरांची वाहवा मिळवली !

एक पाय दिल्लीत अन् दुसरा मंत्रालयात अशा अवस्थेत वसंतदादा राज्यशकट चालवताहेत. समय कठीण आहे. विरोधी पक्षाला पुरून उरण्याइतका दम दादांच्यात निश्चित आहे; परंतु, अंतुले प्रकरण विरोधी पक्षवाले उगाळत बसणार यात शंका नाही.

तीन एप्रिलला विरोधी नेत्यांनी 'भ्रष्टाचार–विरोध' दिवस पाळायचं ठरवलंय. हा शिमगा रंग आणणार यात वाद नाही.

'ब्लिस वॉज इट दॅट डॉन...' असं मीनू मसानींनी स्वातंत्र्यपूर्व काळाचं वर्णन केलं आहे. आमच्यसारख्या उमेदवारीच्या रांगेत असलेल्या पत्रकारांना हा समय झिंग आणणारा वाटतो. हो एक रणरणती दुपार आहे. सगळ्यांच्या मुखवटयाचे पापुद्रे निघताहेत.

'दोपहर की धूप हैं, और कुछ नहीं ।
सबका पिघलता रूप हैं, और कुछ नहीं ।'

## बरखास्तीनंतर

सत्तरी ओलांडलेले मुंबापुरीचे माजी महापौर बोमन बेहेराम यांना पाय ओढत भर उन्हात विधानभवनावर नगरसेवकांचा मोर्चा घेऊन जावे लागले, हे पाहून आम्हाला भारी वाईट वाटले.

मुंबईचे महानगरपालिकेच्या १०७वर्षांच्या इतिहासाची पर्वा न करता ही पालिका बरखास्त करण्याचे विधेयक कॉंग्रेस सरकारने ह्या अधिवेशनात मांडले गांधी–नेहरूंच्या ह्या कॉंग्रेसचे पुढारी आता अंतुल्यांना वाचविण्यासाठी घटनेतही बदल करायची तयारी दाखवितात ! त्यांना त्यांच्या पक्षाच्या इतिहासाची पर्वा नाही. तेव्हा पालिकेच्या परंपरेची काय चाड असणार ?

नगरविकासमंत्री चंद्रकांत त्रिपाठी यांनी मांडलेल्या ह्या विधेयकाचे विधानसभेत समर्थन करताना अहमद झकेरिया म्हणाले की, हे त्रिपाठी काशीहून गंगा घेऊन आले आहेत आणि त्या पाण्याने ते ही मुंबापुरी धुऊन स्वच्छ करतील. मुंबापुरीतील झोपडपट्टी–दादा आणि अनधिकृत बांधकामांना पाठिंबा देणारे हे त्रिपाठी आता ती साफ कशी करणार कुणास ठाऊक ? पण ह्या वाहत्या गंगेत कॉंग्रेस आयचे नेते हात धुऊन घेतील यात शंका नाही !

मुंबई महापालिकेचा कायदा १८८८ मध्ये फिरोजशहा मेहता आणि न्यायमूर्ती तेलंग ह्यांनी तयार केला. यानंतर काही किरकोळ दुरुस्त्या सोडल्या, तर आजतागायत त्यात कोणताही बदल करण्यात आला नव्हता. ह्या स्थानिक स्वराज्यसंस्थेचे स्वातंत्र्य अबाधित राहावे म्हणून मुद्दामच त्यांनी ही पालिका बरखास्त करण्याचे अधिकार सरकारला दिले नाहीत; इंग्रजांच्या काळातही सरकारने हे अधिकार आपल्या ताब्यात घेतले नाहीत; पण

ह्या काँग्रेस आयच्या सरकारने मात्र विरोधी पक्षांशी अथवा शहरातील प्रमुख नागरिकांशी कोणताही विचारविनिमय न करता आज तेच अधिकार आपल्या ताब्यात घेतले.

हे विधेयक विधानसभेत मांडले जाताच नगरसेवकांनी पालिकेच्या सर्व सभा तहकूब केल्या आणि तात्काळ मोर्चा घेऊन ते विधानभवनाकडे निघाले. त्यात बोमन बेहरामही सामील झाले.

हा मोर्चा पोलिसांनी चर्चगेट-स्थानकाजवळच अडविला; पण पोलिसांची साखळी तोडून नगरसेवक विधानभवनाकडे पळत सुटले आणि त्यांच्यापाठी लाठचा घेऊन पोलीस. नगरसेवकांना रामराव आदिकांच्या हाती निवेदन द्यायचे होते. पोलिसांनी अखेर तीन आमदारांना आणि दोन माजी महापौरांना अटक केली. आदिकांनी शेवटी नगरसेवकांना भेटायचे मान्य केले. मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर ही भेट झाली.

ह्या भेटीतून निष्पन्न तरी काय होणार ? इतकी वर्षं हाती सत्ता होती तेव्हा पुलीदच्या नगरसेवकांनी एकमेकांशी भांडण्यात काळ घालविला. शहराचे प्रश्न सोडून काय वाटेल त्या कारणांसाठी सभातहकुबीच्या सूचना मांडल्या.

आणि आता ह्या संस्थेचे स्वातंत्र्यच सरकार हिरावून घेत आहे. लोकशाहीला हा एक शापच आहे. ती असते तेव्हा भ्रष्टाचार बोकाळतो आणि ती नसते तेव्हा तिच्या गुणांचा आपल्याला साक्षात्कार होतो !

—विष्णू जयदेव

# मुक्काम कोल्हापूर

## शुगर मिलचं सहकारीकरणं

ऊस—साखर—गूळ असे शब्द आले की कोल्हापूरचं नाव महाराष्ट्रात अपरिहार्यपणे निघतंच. परंपरेच्या अभिमानामुळं पुढंही या क्षेत्रातली घोडदौड कोल्हापूरनं थांबवलेली नाही. उदंड साखरकारखाने झाले तरी अजूनही खेडचापाडयांमधली शिष्टमंडळं आपल्या आडव्या—तिडव्या शिष्टाईद्वारे सत्ताधाऱ्यांना साखरकारखाना आम्हाला कसा मिळायला पाहिजे हे पटवत असतात. एकंदरीत उसाचं भरघोस उत्पादन हे त्यामागचं मुख्य कारण; पण मग जे साखरकारखाने सद्यःस्थितीत चालू आहेत त्यांच्याकडून ज्या अपेक्षा शेतकरी व्यक्त करतात त्या पूर्ण होत नाहीत, हेही एक कारण त्यामागं असू शकतं.

हे सारं लिहिण्याचं कारण म्हणजे कोल्हापुरात खाजगी मालकीची असणारी शुगरमिल सहकारीकरणाच्या प्रक्रियेकडे वळत आहे. महाराष्ट्रातले—पर्यायानं कोल्हापुरातले—बहुतेक साखरकारखाने हे सहकारी तत्त्वावरच चालू आहेत. कोल्हापुरात केवळ 'कोल्हापूर शुगर मिल' हा एकच साखरकारखाना तेवढा सहकारी नव्हता. नुकतीच या कारखान्याला सहकारी स्वरूप देण्याची घोषणा झालीय. महाराष्ट्र सरकारने शुगर मिलचं सहकारीकरण करून तीन वर्षांसाठी संचालक मंडळ नेमलं आहे. या गोष्टीच्या पूर्तीसाठी सातत्यानं प्रयत्न करणारे श्री. भगवानराव पोवार यांची या संचालक मंडळाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. शुगर मिलला ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना या घटनेनं बरं वाटावं. एक तर त्यांचे पैसेही मिळणं बाकी आहे आणि पूर्वीच्या खाजगी व्यवस्थापनावर केलेले आरोपही बरेच आहेत.

१९३३ साली इथल्या राजाराममहाराजांनी काळवेळ ओळखून शुगरमिल स्थापली. पुढे शिरगावकर यांच्याकडे तिचं व्यवस्थापन आलं आणि काही काळानं मुंबईच्या श्री. रुईया यांनी ही मिल विकत घेऊन श्री. मदनमोहन लोहिया यांची व्यवस्थापक म्हणून नियुक्ती केली. मालक आणि व्यवस्थापक दोघेही अमराठी आणि रोजमितीस ज्यांच्याशी संबंध यायचा ते सगळे पटकेवाले मराठी शेतकरी. अशाही स्थितीत कारखाना काही वर्षं उत्तम परिस्थितीत होता. थकबाकीची तक्रार गंभीर नव्हती आणि कारखाना सांस्कृतिक क्षेत्रातही एक वेगळेपण पुढं आणू पाहात होता. म्हणजे काय ? मिलचे मॅनेजर श्री. मदनमोहन लोहिया हा एक रसिक माणूस असल्यानं शुगरमिल हा परिसर त्यांच्या नेतृत्वाखाली नाटच—संगीत—क्रीडा आदी क्षेत्रांत रस घ्यायला लागला. आसपास तर रसिकत्वाला बहर आलाच; पण त्याच्या बऱ्या—वाईट झळा कोल्हापूर शहरानंही अनुभवल्या. रसिकत्वाला 'बऱ्या' बरोबर 'वाईट' बोल एवढ्याचसाठी लावला की, इतरही 'कवित्व' आले. प्रस्तुत विषयाशी —शुगरमिलच्या सहकारीकरणाच्या पार्श्वभूमीशी—त्याचा संबंध सूक्ष्मपणे येतो म्हणून हे मांडलं. पुढे पुढे शुगरमिलमध्ये तंटेबखेडे सुरू झाले. शेतकऱ्यांच्या थकबाक्या वाढल्या. कर्मचाऱ्यांमध्ये राजकारण आलं आणि या सर्वांचं कारण म्हणून मालक श्री. रुईया आणि व्यवस्थापक श्री. लोहिया यांच्याकडे बोट दाखविण्यात येऊ लागलं. 'मन चाहेल असा कारभार' हा लौकिक त्यांच्या वाटचाला आला. श्री. रुईयांवर तर ते केवळ स्वतःचाच स्वार्थ साधतात एवढाच आरोप होऊ लागला. श्री. रुइया आणि श्री. रूपारेल हे या मिलचे बहुसांख्यिक शेअर्सधारक म्हणजे पर्यायानं सत्ताधीशच ! शुगरमिलचं ते 'आयते लोणी' खातात, हा त्यांच्यावरचा आरोप. अन्यतः शेतकऱ्यांचे पैसे बुडल्याबद्दलचं आंदोलन होणं मुश्कील होतं. तर या रुइया-रुपारेल लोकांचे ७५ लाखांचे शेअर्स डोळचात खुपणं स्वाभाविकच ! आता सहकारीकरण झाल्यावर सगळचात आधी जी मागणी येईल— ती मला वाटतं हे ७५ लाख रुपये परत देऊन टाकावेत हीच ! 'कोल्हापुरातून या रुइयांची हे पैसे देऊन हकालपट्टी करा!' अशी मागणी इथल्या एका वृत्तपत्रानं केली आहे.

रुइयांबरोबर लोहियांना ही टीका सहन करावी लागत आहे आणि त्यात अस्वाभाविक काही नाही. आजवर लोहियांच्या काही चांगल्या गुणांमुळं त्यांना बदनामीचे वार सहन करावे लागले नाहीत. त्यांच्या रसिकतेबद्दल वर मी लिहिलंच आहे. गंधर्वकंपनीच्या दिमाखाहून अधिक थाटात स्वयंवर—सौभद्र सादर करणारे शेठ लोहिया या त्यांच्या प्रतिमेबरोबरच इतर काही दुर्लौकिक पूर्वी नव्हता; पण उत्तरोत्तर तो वाढत गेला. लोहियांनी स्वतःचा म्हणून एक काळ कोल्हापूरच्या समाज—जीवनात गाजवला; परंतु पुढे पुढे हे व्यक्तिमहात्म्य कमी होत गेलं. तर अशा लोहियासाहेबांचं शुगरमिलमधलं वर्चस्व सहकारीकरणानं कमी होत आहे.

शेतकऱ्यांना या घटनेनं बरं वाटेल असं

मी म्हटलं; पण प्रत्यक्ष काय होतं हे आता घडल्यावरच समजेल ! नव्या संचालक मंडळाचे अध्यक्ष श्री. भगवानराव पोवार यांनी या गोष्टीचा पाठपुरावा सावधपणानं केला. त्यांना कोल्हापूरच्या माजी आमदार रवींद्र सबनिसांसकट इतर अनेकांनी अगदी तळमळीनं मदत केली. त्यांनी उभारलेली शेतकरी ऊसकरी संघटना आता नव्यानं सुरळीत चालू पाहणाऱ्या साखरकारखान्याला ऊर्जितावस्था आणेल अशी सदिच्छा कोल्हापूरकर व्यक्त करीत आहेत.

## कॉम्प्युटर स्कूल

दक्षिण महाराष्ट्रातली पहिली कॉम्प्युटर शाळा उघडण्याचं श्रेय कोल्हापूरच्या शाहू इन्स्टिटयूट या नावानं ओळखल्या जाणाऱ्या संस्थेनं घेतलं. इंजिनिअरिंग–मेडिकल कॉलेजच्या चर्चा चालू असतानाच परवा या शाळेचं उद्घाटन करण्यात आलं. बेळगावचे प्रसिद्ध उद्योगपती रावसाहेब गोगटे यांच्या अध्यक्षतेखाली आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु श्री. भोगीशयन यांच्या उपस्थितीत हा उद्घाटनाचा समारंभ पार पडला.

शिवाजी विद्यापीठ हे अधिकाधिक लोकांपर्यंत जाऊन पोहोचण्याचं ब्रीद घेऊन जन्माला आलं. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हा उद्देश असणारच. प्राचार्य भोगीशयन यांनी हे आपल्या बोलण्यातून सांगितलं. ही जी कॉम्प्युटर शाळा उघडण्यात आली आहे ती तर प्रामुख्यानं खेडयापाडयांतल्या मुलांना फायदा मिळावा म्हणून. 'नव्या भारताच्या जडणघडणीत आपण ही जी छोटी–मोठी कामं करतोय त्याकडं चिकित्सक दृष्टीनं पाहा' असं आवाहन या निमित्तानं श्री. भोगीशयन यांनी केलं. मला चटकन हे बोलणं कळलं नाही; पण पुढं त्यांनी त्याचा खुलासा केला. शिवाजी विद्यापीठ किंवा मराठवाडा विद्यापीठ यावर दर्जाच्या हीनतेबद्दल जी टीका होत असते त्याच्याशी या उद्गाराचा संबंध पोचू शकेल. त्यांना म्हणायचं होतं की, लोकांनी अधिकाधिकपणे 'आमच्याशी' बोलावं. तक्रारी आणि अडचणी वृत्तपत्रांत नको तर आमच्याकडे मांडाव्यात.

हे एका परीनं खरंच. शिवाजी वा मराठवाडयावर लोक यथेच्छ तोंडसुख घेताना आपण ऐकतो. अभ्यासक्रम किंवा त्यासाठी नेमलेली पुस्तकं याकडं पाहिलं तर बाकीच्या नावाजलेल्या विद्यापीठांच्या फारसा मागं 'शिवाजी' नाही हे दिसतं; पण मग त्या गोष्टी व्यवहारात उतरत नाहीत. चार–चौघात धाडसानं बोलणारे, स्वतःचं संशोधन करणारे विद्यार्थी इथं अभावानं दिसतात, याचं कारण म्हणजे मिळालेलं ज्ञान थातुरमातुर असल्याचा भास निर्माण होतो. तांत्रिक वा अतांत्रिक शिक्षणाची 'ॲप्लिकेशन्स' यशस्वी होत नाहीत म्हणून या विद्यापीठाची बदनामी होते, असं म्हणावं काय ?

नव्यानं सुरू झालेली कॉम्प्युटर स्कूल्स् कोल्हापूरच्या व आसपासच्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त उपयुक्त ठरावी व लोकप्रियही व्हावी.

—सुनील धोपेश्वरकर

## राजधानी दिल्ली

# बंद-कुठे ? कसा ?

पंजाब-हरियाणात अकालींनी चालविलेल्या निरपराध हिंदूंच्या हत्येच्या निषेधार्थ २७ फेब्रुवारी रोजी 'दिल्ली बंद' चे आवाहन भाजपने केले. अशा 'बंद' ला काही ठिकाणी हिंसक वळण लागले म्हणून 'दिल्ली बंद' ला शासनाचा विरोध होता. तरीही भाजपने आपला निर्णय ठाम ठेवला.

दोन-चार दिवस आधीपासूनच वातावरणात तणाव जाणवत होता··· ग्रहणातल्या मध्यकालासारखा. जे इतरत्र घडलं त्याची इथंही उलटसुलट प्रकाराने पुनरावृत्ती होईल की काय, अशी सर्वांच्या मनात भीती निर्माण झाली होती. काय घडेल सांगता येत नव्हते. वातावरण तंग बनत चालले होते. सामान्य मोलकरीणही 'कहते हैं, कुछ होनेवाला है' असे सांगत होती. इथे उलटा प्रकार घडण्याची शक्यताही अनेकजण बोलून दाखवीत होते.

स्वतः राष्ट्रपतींनी शेवटच्या क्षणापर्यंत बंद मागे घेण्याचे वैयक्तिक आवाहन केले. त्यामुळे 'बंद' मागे घेतला जाणार अशी हवाही सर्वत्र पसरली होती; परंतु आदल्या संध्याकाळी भाजपच्या दिल्ली शाखेने तातडीची बैठक घेऊन आपला निर्णय जाहीर केला की, 'राष्ट्रपतींच्या आवाहनातील कळकळीविषयी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत; परंतु या शेवटच्या क्षणाला बंद मागे घेणे शक्य होणार नाही!'

दिल्लीसारख्या राजधानीच्या ठिकाणी जर काही हिंसक प्रकार घडते तर त्याचे परिणाम फार खोलवर झाले असते. त्यामुळे शासनाची पूर्ण घाबरगुंडी उडाली. पोलीसखात्याला झडझडून कामाला लागण्याचा आदेश देण्यात आला. इतकेच नव्हे तर संरक्षणखात्यालाही संपूर्ण सावध राहण्याचा इशारा देण्यात आला. बंदोबस्तात कुठेही कुचराई उरली नव्हती!

एका ठिकाणाहून खडी भरून दुसऱ्या ठिकाणी ती टाकायला नेणाऱ्या ट्रकप्रमाणे, एका ठिकाणची माणसे भरभरून नेऊन त्यांच्या कचेऱ्यांकडे त्यांना उतरवणाऱ्या डी. टी. सी. च्या ( दिल्ली ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशनच्या ) बसेसना भरपूर संरक्षण देण्यात आले होते. त्यांना अडथळा आणणाऱ्यांना पाच वर्षे कारावासाच्या शिक्षेचे फर्मानही सुटले.

'कल आयेगी ना काम पर ?' मी मोलकरणीला आदल्या दिवशी विचारले. 'बस आयेगी तो आ जाऊँगी' तिने धूर्त उत्तर दिले.

मद्रासमधील बेकारीला कंटाळून दिल्लीसारख्या दूरवरच्या ठिकाणी येऊन राहिलेल्या या मद्रासी मोलकरणींची वस्ती पूर्वी शहरातल्या मध्यवर्ती ठिकाणीच होती; परंतु दिल्लीचे पॅरिस करण्याच्या कल्पनेचे वारे शिरलेल्या संजय गांधीने या सर्व लोकांची वसाहत तिथून आठ–दहा किलोमीटर दूर अशा मोंगलपुरी, खिचडीपुरी इत्यादी ठिकाणी हलवली. तेव्हापासून या बायका काही खाजगी बसेसमधून पहाटे ५–५॥ ला निघून कामासाठी ठिकठिकाणी जातात. दुपारी ३ वाजता सर्व कामे आटोपून याच बसेसमधून आपापल्या ठिकाणी परततात.

२७ फेब्रुवारीची पहाट उजाडली. मला

जागं करण्याच्या बाबतीत घड्याळाच्या गजरापेक्षाही प्रभावी असलेला, बसमधून उतरलेल्या मोलकरणींचा कलकलाट आज ऐकू आला नाही. डी. टी. सी. च्या बसने येतील कदाचित, अशी क्षीण आशा मनाशी बाळगीत मी गच्चीतून बाहेर डोकावून पाहिले. कुठे तरी एक-दोन धाडसी मोलकरणी जाता-येताना दिसल्या. बाकीच्यांनी कामावर न येण्याची संधी पूर्णपणे साधून घेतली! 'निमित्तमात्रं भव चालका:' असे त्या दिवशी त्या आपल्या बसड्रायव्हरला मनाशी म्हणाल्या असतील. माझ्याही मोलकरणीने ही नामी संधी गमावली नाही!

सकाळी ६॥-७ वाजता आपापल्या 'स्कूल बस' ची वाट पहात निरनिराळ्या 'विन्टर युनिफॉर्म' मध्ये असलेल्या मुलांचे घोळके मात्र रस्त्यात कुठे दिसत नव्हते. वाट चुकलेल्या पाखराप्रमाणे एखाद-दुसरे नर्सरीतले बालक आपल्या वडिलांचे बोट धरून प्रामाणिकपणे शाळेकडे चालले होते. त्या मातापित्यांच्या कर्तव्यपरायणतेचे मला फार कौतुक वाटले. आम्ही मात्र मुलांना शाळेत न जाण्याचा गोड आदेश आदल्या दिवशीच जाहीर केलेला असल्यामुळे, मुले नेहमीपेक्षा लौकर उठून 'दिल्ली बंद' चे दृश्य पाहाण्यात सामील झाली होती.

रस्त्यात सर्वत्र शांत शांत होते; परंतु सकाळची प्रसन्न हवा त्या शांततेलाही प्रसन्न बनवीत होती. अजून उन्हं कोवळी होती. वातावरण तापायचं होतं. त्या शांततेचा भंग करायला डी. टी. सी. च्या बसेस मात्र रस्त्यावरून धावत होत्या. एरवी माणसांनी ओसंडून चाललेल्या या बसेसमधून कुठे तरी दोन-चारजण भीत भीत प्रवास करीत होते. कदाचित या बसेसचं (गर्दी नसल्यानं) लक्झरी बसेसमध्ये झालेलं हे रूपांतरं अपूर्वपणे अनुभवत ते चाललें असावेत.

तसा 'दिल्ली बंद'चा अनुभव दिल्लीकरांना वर्षातून २-३ वेळा येत असतोच; पण तो वेगळ्या स्वरूपात. एक १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या राष्ट्रीय सणांच्या वेळेस आणि दुसरा होळीच्या दिवशी! या दिवशी दिल्लीत बँका, कचेऱ्या, शाळा, कॉलेजे तर बंद असतातच; परंतु सर्व छोटी-मोठी दुकानेही एकजात बंद असतात! होळीच्या दिवशी उन्मुक्तपणे रंग खेळणे हा उत्तरेकडील लोकांचा स्थायीभाव असल्यामुळं अशा रंगाच्या भीतीनं लोक घराघरातच लपून बसलेले असतात आणि राष्ट्रीय सणांच्या दिवशी सर्वच बाजारपेठा बंद असल्यानं रस्त्यांनाही एक उदास अवकळा येते. हा सण आहे की, कुणाचा दुखवटा दिवस आहे, कळेनासे होते.

दिल्लीत नव्यानं आल्यावर तर हे दोन दिवस म्हणजे 'आले संकट' असेच आम्हाला वाटायचे. साधा ब्रेडसुद्धा कुठे मिळायचा नाही! मोलकरणी कामावर येत नाहीत. प्रजासत्ताकदिनी लोक दुपारी १२ वाजेपर्यंत टी. व्ही. वरून राजपथावरची परेड पहाण्याचे कर्तव्य पार पाडीत असलेले आढळतात किंवा प्रत्यक्ष 'राजपथा'वर जाऊन अमाप उत्साहाने ही परेड पाहतात. कुणी घराबाहेर दिसत नाहीत. रस्तेही ओस दिसतात. जवळपासच्या खेड्यांतील लोक तर यासाठी पहाटेपासूनच येऊन राजपथाच्या कडेला असलेल्या हिरवळीवर ५-६ तास आधीपासूनच ताटकळत बसलेले असतात. सर्वसामान्यांच्या निष्ठेचे हे एक रूप!

'दिल्ली बंद'च्या दिवशी समस्त सरदारजी-परिवार मात्र चांगलाच हादरला होता. घराबाहेर पडण्याची कुणाची हिंमत नव्हती! 'घरमालकपणा'चे सगळे अवगुण गुंडाळून ठेवून आमचा सरदारजी-घरमालकही एकदम गरीब गाय बनला होता! अत्यंत शेळपट हसू चेहऱ्यावर उमटवीत 'आइये जी, बैठिये' म्हणत आमचे त्याने त्या दिवशी भरघोस स्वागत केले. एरवीचा 'रिटायर्ड मेजर'ची ऐट मिरवणारा बुरखा कुठच्या कुठे गळून पडला होता.

दिल्लीतील सदरबाजार, चांदणीचौक, कॅनॉटप्लेस यासारख्या मुख्य बाजारपेठा तर संपूर्ण बंद होत्या. त्या निर्मनुष्य सामसूम रस्त्यावर निवांतपणे उभे राहण्याचे सुख अनुभवीत असलेली एखाद-दुसरी गाय दृष्टीस पडत होती. वाहनांची वर्दळ नाही की कुणाचे हुसकणे नाही, या एका आनंदाव्यतिरिक्त तिला कशाची दखल नव्हती.

कचेऱ्यांना अधिकृत सुट्टी नसल्यामुळे काहीजण जीव मुठीत धरून कामावर हजर होते.

कुठे तरी डी. टी. सी. च्या दोन-चार बसेसवर दगडफेक झाली; पण हा प्रकार किरकोळच म्हणायचा. दिल्लीत काहीही 'थ्रिलिंग' घडले की, त्याचा परिणाम डी. टी. सी. च्या बसेसना भोगावा लागतो. या बसेसमधील अव्यवस्था आणि त्यांच्या सेवेतील बेशिस्तपणा सामान्य माणसाला इतका त्रासदायक वाटतो की, या बसेसना कुणी काहीही केले तरी त्याचे सोयर-सुतक वाटेनासे होते. एखाद्या विद्यार्थ्यावर या बसमुळे हातपाय मोडण्याचा किंवा मृत्युमुखी पडण्याचा प्रसंग ओढवला की, त्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी डी. टी. सी. च्या २-३ बसेस जाळल्याच म्हणून समजा! कॉलेजच्या निवडणुका आल्या की, प्रत्येक बस प्रचार-पत्रकांनी अंतर्बाह्य सजल्याशिवाय सुटका नसते. 'दिल्ली बंद'च्या दिवशी मात्र या बसेसनी निर्मनुष्य रस्त्यांवरून कमी प्रवाशांसह खडखडाट करीत मजेत धावून घेतले. त्यामुळे शांततेचा होणारा भंग त्या शांततेला अधिकच तीव्र बनवीत होता.

संध्याकाळपर्यंत सारे हे असेच होते. वातावरण ताणलेलेच. कधी कुठे ठिणगी पडेल काही सांगवत नव्हते. तथापि रात्रीपर्यंत सर्व 'बंद' शांतपणे पार पडला. (कुठेही काही अपप्रकार न घडल्याने भारतीय जनता पक्षाची प्रतिमा एकदम उंचावली.) कुठेही कुणी जरी काळ लावली असती तरी त्याचे खापर भाजपच्या माथ्यावर फुटले असते; पण तसे घडले नाही हे त्या पक्षाचे सुदैवच! या 'दिल्ली बंद'ने राजधानीचे एक वेगळे चित्र बघायला मात्र मिळाले.

—ललिता मिरजकर


सांगत्ये ऐका

हंसा वाडकर

आवृत्ती चौथी

किंमत : चौदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

२३ मार्च ( भगतसिंग–बलिदानदिन ) ते १३ एप्रिल ( जालियनवालाबागस्मृतिदिन ) या काळात पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनी संस्थेतर्फे काही तरुण मुलं सद्भावयात्रेसाठी पंजाबला जाणार आहेत. पूर्वतयारी–दौऱ्याचा हा वृत्तान्त...

# सैतानाचा पराभव करता येतो. थोडी निर्भयता, बुद्धी, सहकार्य, कामाची ओढ हवी !

अविनाश धर्माधिकारी

पंजाब सद्भाव अभियानाची पूर्वतयारी करण्यासाठी २२ फेब्रु. ला पुण्याहून निघालो. त्याच्या तीन–चार दिवस आधी आईचं एक पत्र दिल्लीहून आलं होतं. चंडीगडहून दिल्लीला येताना वाटेत जो उत्पात तिला अनुभवायला मिळाला त्याचं त्यात वर्णन होतं. दिल्लीत त्रिपक्षीय वाटाघाटी चालू झाल्याचाच तो दिवस होता. पंजाबमधून हरियाणात शिरताना बस पोलिसांनी थांबवली आणि सर्व उतारूंना हरियाणारोडवेजच्या निळ्या बसमध्ये बसायला लावलं. कारण पंजाबरोडवेजच्या बसेसना धोका होता. पानपतपाशी तर दंगल फारच वाढली होती म्हणून बस काही काळ डेपोतच थांबवली होती. 'ऑल क्लियर' मिळाल्यावर बसेस निघाल्या. मैल दोन मैल जातायत तोवर लोकांचे थवे बसेसना आडवे आले. काही बसमधून शिखांना उतरवून बेदम चोपून काढण्यात आलं. तेव्हा आईच्या बसमधल्या लोकांनी शिखांना सीटखाली लपवून वरून चादरी पांघरून घेतल्या. ड्रायव्हरने 'शीख नाहीत, पानपतलाच उतरवले' असं सांगत गर्दीतून गाडी काढली. तरी बसवर अधून-मधून दगडांचा वर्षाव झालाच. दिल्लीत एका पोलीसचौकीपाशी बस थांबल्यावर शिख उतरले आणि रडतरडत सर्व प्रवाशांच्या अक्षरश: पाया पडले. एक वृद्ध शीख म्हणाला, '४७ के दिनोंकी याद आयी'– पंजाबमधले रंग झपाट्यानं काळवंडून चाललेत हे त्या पत्रानं जाणवून दिलं. नंतर तीन–चार दिवस पेपरात आलेल्या बातम्यांनी दाखवून दिलं की, ते अधिकच गडद होत चाललेत.

त्या दिवशी 'झेलम'ने वेळेवर प्लॅटफॉर्म सोडला. गाडीला फारच कमी गर्दी होती. मरायला आत्ता जाणार कोण तिकडे ? थोड्या वेळानं मी फोरसिथ्‌ची एक कादंबरी वाचायला घेतली. पहिल्या पानावर कादंबरीची तोंडओळख करून देणाऱ्या चार ओळी होत्या. निर्णयाचे दोन पर्याय ॲडॅम मन्रोनं राष्ट्राध्यक्षांसमोर केले. राष्ट्राध्यक्ष चक्रावून गेले. ते म्हणाले– 'कोणताही पर्याय स्वीकारला तरी नरसंहार अटळ आहे.' ॲडॅम मन्रोनं उत्तर दिलं, 'तसंच असतं ते. आमच्या भाषेत याला सैतानी पर्याय– डेव्हिल्स् आल्टरनेटिव म्हणतात.' आज पंजाबला ज्या वादळानं घेरून टाकलंय त्यानं असा सैतानी पर्याय पुढ्यात वाढून ठेवलाय. पंजाबमध्ये निर्दोष लोकांची हत्या म्हणून हरियानात काही निर्दोष लोकांची हत्या. त्याचा सूड घेण्यासाठी पंजाबमध्ये पुन्हा गुणित प्रमाणात निर्दोषांची हत्या. परिणामी कर्फ्यू, अश्रुधूर, गोळीबार, बाँबविस्फोट. विस्कळित समाजजीवन. सर्वसामान्य माणूस जीव मुठीत धरून जगणार आणि रस्त्यावर बदमशांचे साम्राज्य फैलावत चाललेले. सद्भाव हे उत्तर. मी आणि इकबालसिंगजी पंजाबला निघालो होतो. सद्भाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा आवाज या गदारोळात कुठे उठवता येईल का, त्या आवाजाला कुठून प्रतिसाद मिळेल का हे पहायचं होतं.

मुळात या वेळी आश्वासक प्रतिसाद आधी पुण्यातच मिळाला. इकबालसिंगजींच्या रूपात. जून–जुलै ८३ मध्ये पंजाबमध्ये सद्भावयात्रा करून परतल्यावर पुण्यात पंजाबी समाजाशी संपर्क वाढवायची एक मोहीम केली होती. त्यात डिरेक्टरीवरून लक्षात आलं की, 'पूना डेली न्यूज'चा संपादक कोणी सरदारजी आहे. त्यामुळे प्रबोधिनीतून त्यांना पत्र गेलं. त्यातून संबंध निर्माण झाले. मधे तीनच महिने गेले. आता इकबालसिंगजी या नव्या मोहिमेत पूर्ण उत्साहाने उतरले होते. प्रवास पूर्ण करून रात्री २॥ वाजता अंबाला (कँट)ला पोचलो तेव्हा कडाक्याची थंडी होती. भरपूर उबदार कपडे घालूनही हातापायांची बोटं बधिर व्हावीत इतक्या बोचऱ्या थंडीत तितक्याच बोचऱ्या बातम्या वाट पहात होत्या. प्लॅटफॉर्मवर ढणढणत्या स्टोव्ह-भोवती चहा पीत बसलेल्या एका टोळक्यात 'पंजाब केसरी'च्या पहिल्या आवृत्तीचं वाचन चालू होतं. हिंसाचाराच्या बातम्या देणारा 'आज कहाँ कहाँ' हा एक खास कॉलमच सुरू केला आहे. शेजारीच सीआरपीच्या जवानांचा पहारा चालू होता. कारण दंगली उसळलेल्या असल्यामुळे अंबाल्यात कर्फ्यू चालू होता. अमृतसरपासून अंबाल्यापर्यंत पसरलेली एका सैतानाची अवाढव्य सावली इथेच जाणवली. तीच त्या टोळक्यातल्या, फाळणी पाहिलेल्या वयस्क हमालाला जाणवली असावी. कारण चहाचा पेला खाली ठेवून तो सांगत होता, 'हिंदु–सिख एकही खून के है भाई। उनका झगडा ! पहले कभी देखा नही था, सुना नही था। लगता है कयामत आ गई है।'

## एक पंजाब यह भी है।

आपल्याला माहिती असलेला पंजाब हा नव्हता. तो होता पाच नद्यांनी सुजल, सुफल केलेला सुपीक प्रदेश. भारतीय संस्कृतीचं मलस्थान. शतकानुशतके वायव्येकडून येणाऱ्या आक्रमकांच्या टोळधाडी आपल्या छातीवर झेलणाऱ्या तगड्या, देखण्या, कष्टाळू लोकांचा पंजाब. या देशाच्या संस्कृतीसाठी, संरक्षणासाठी बलिदानांची अखंड मालिका गुंफणारा प्रांत. प्रसन्न हवामानानं नटलेलं भारतातलं एक लेणं. चंडिगढकडे पहाटे बस धावत सुटली तसं पंजाबचं हे रूप दिसत होतं. नजर जाईल तिथपर्यंत दिसणारी हिरवीगार शेतं कोवळ्या उन्हात डोलत होती. या पंजाबनं फाळणीचं महाभयानक थैमान अनुभवलं; पण तरी पंजाबी जिगर मोडली नाही. त्या जिगरबाज कष्टांमधूनच वैराण असलेला पूर्वपंजाब बहरला, भारताचं धान्याचं कोठार बनला. जपानशीही स्पर्धा करू शकेल असं लघु–मध्यम उद्योगाचं जाळं लुधियाना–जालंदर पट्टयात बहरलं. लोकरीच्या व्यापाराचं मोठंच केंद्र असलेलं अमृतसर संपूर्ण हिंदुस्थानचं तीर्थक्षेत्र बनलं ते सुवर्णमंदिर आणि जालियनवालाबागेमुळे. सैगलपासून गार्गी, अमृताप्रीतमपर्यंत आणि पृथिपालसिंगपासून बिशनबेदीपर्यंत पंजाबनं देशाला प्रतिभासंपन्न कलाकार, लेखक, खेळाडू, पत्रकार इ. इ. दिले. ओ. पी. नय्यरच्या कित्येक अमरट्यून्सना पंजाबी संगीताचीच डूब आहे. पौरुषसंपन्न भांगडा हे संपूर्ण भारताचंच लोकनृत्य बनलंय. ६२ च्या युद्धात नेफा प्रदेशात चिनी लाटांशी टक्कर घेताना पहिल्यांदा प्राण ठेवणारा मेजर जोगिंदरसिंह, ६५ च्या युद्धात सरगोधा विमानतळाच्या रडारवर स्वतःच्या विमानासकट झेपावलेला गुरुबक्षसिंग. इतके कशाला पाकिस्तानी घुसखोर शेतात लपलेत म्हणून शेत पेटवून देऊन लाठ्याकाठ्यांनी घुसखोरांना तुडवणारा सामान्य पंजाबी शेतकरी. या सर्वांनी घडवलेला भारतातला सर्वांत समृद्ध प्रांत.

चंडिगढमध्ये पोचलो तेव्हा हाच पंजाब आठवत होता. सकाळची उन्हे पसरलेली होती. थंडीतला बोचरेपणा संपून आता आल्हाददायक हवा होता. नित्याचे व्यवहार सुरू होत होते. चंडिगढच्या ऐसपैस रस्त्यावरून वाहतूक सुरू झालेली, कडेला सायकलरिक्शा उभ्या, त्यामागे फूटपाथवर फळफळावळ छोटे–भटुरे आणि चहाच्या गाड्या. एक फोन करण्यासाठी एका कापडाच्या दुकानात गेलो. तिथेच दोघं फेरीवाले आले होते. त्यांचं कापड दुकानदारानं घ्यावं असं सांगत होते. दुकानदारानं नाकारलं. थोडा वेळ त्या विक्रेत्यांनी 'सेल्समनशिप' कौशल्य वापरलं; पण दुकानदार बधला नाही. मग कापडाचे गठ्ठे आवरत त्या दोनातला एक विक्रेता कडाडला, 'तुम लाला हो, ऐसेही करेंगे, सिख होता तो ले लेता।' हे दोघे विक्रेते शिख होते, दुकानदार हिंदु होता. चविष्ट फळफळावळांनी भरलेली असेल असं समजून एखाद्या रंगीत टोपलीचं झाकण उघडावं आणि क्षणार्धात आतून सरकन् विषारी नागानं फणा काढावा तसं झालं. आत्तापर्यंत कधी शिख आणि हिंदु कोणी वेगळे मानले जातच नसत. वेगळे कशाला, शिख व हिंदु ही परिभाषा सुद्धा वापरली जात नसे. केशधारी आणि सहेजधारी अथवा मोना असेच शब्द वापरले जात. समाजात अशीच भावना होती की सर्व शिख केशधारी हिंदु आहेत अन् सर्व हिंदु सहेजधारी शिख आहेत. भारतातल्या इतर कोणत्याही प्रांतातल्या दोन जातींमध्ये, पोटजातींमध्ये सुद्धा होत नसतील इतक्या सहजपणे रोटीबेटीव्यवहार प्रचलित होते– अजूनही आहेत. एकाच घरात थोरला मुलगा शिख, धाकटा मुलगा मोना असतात. गुरुद्वारामध्ये किंवा मंदिरांमध्ये सर्वच जण जात. 'लेकिन अब ये क्या हो रहा है।' हे सून्न वाक्य किती तरी जणांच्या तोंडून ऐकू येते आजकाल !

आता पंजाबमध्ये द्वेषाचा विखार खूप खोलवर जाऊन पोचलाय. आठ महिन्यांपूर्वी प्रबोधिनीच्या सद्भावयात्रेच्या वेळी तो एवढा नव्हता. आता वीष वेगात भिनत चाललंय, त्यानं पंजाबचं शरीर काळंनिळं होत चालल्याचंही कळतंय. पंजाबचा दिवस सकाळी ६ नंतर दबकत, बिचकत सुरू होतो आणि संध्याकाळी ६ ला कर्फ्यूचा सायरन वाजला की बंद होतो. पतियाळा, लुधियाना, जालंदर, अमृतसर, फिरोझपूर, गुरुदासपूर, होशियारपूर, खन्ना, फगवाडा... पंजाबच्या सर्व महत्त्वाच्या शहरांवर कर्फ्यूचं आणि भीतीचं राज्य होतं. काही ठिकाणी 'दिसताक्षणी गोळ्या घालण्याच्या' आज्ञा सुटलेल्या. एवढं करून रोज चारपाच–चारपाच जणांचे खून रतीब घातल्यासारखे चालू होते. अतिरेक्यांचा पत्ता लागत नव्हता. सर्वसामान्य माणूस अंतर्बाह्य हादरून गेलेला. फुटीरता, जातीय द्वेष आणि हिंसाचार मात्र रस्त्यावर स्वैर सुटलेले. आता 'तो' पंजाब दिसत नाही, 'हा' पंजाब सतत भेडसावत राहतो. असं असल्यामुळेच आम्ही प्रथम ज्या काहीजणांच्या भेटी घेतल्या त्यातून हाच सूर उमटत राहिला. 'या अशा वातावरणात, महाराष्ट्रातून येऊन तुम्ही थोडे लोक सद्भाव अभियान करणार त्यानं काय साधणार ? आम्ही ठामपणे सांगायचो की नेमक्या या वातावरणामुळेच सद्भाव मोहिमेची आवश्यकता जास्त नाही का ? more the sense situation, more is the need for constructive work.'

### विधायक प्रतिक्रिया

विषारी वाऱ्याचा पहिला झोत असा अंगावरून पुढे सरकला आणि मग सावकाशपणे सुवासिकशी झुळुकही जाणवू लागली. असं लक्षात आलं की सर्वसामान्य माणसाला या सर्वांचा उबग आलाय. त्याच्या मनात धर्मांधता, जातीय द्वेष यांना स्थान नाही. तो शिख–हिंदु भेदाभेद मानत नाही. देशविघातक भाषा आणि कारवाया हे त्याला पाप वाटतं. ऐतिहासिक, आर्थिक, सामाजिक धाग्यांनी पंजाबचं चिवट वस्त्र विणलेलं आहे. त्याच्या एकसंधपणावर आज खूप ताण पडला आहे; पण ते इतक्या सहजासहजी छिन्नभिन्न होणार नाही. सावकाशपणे-निश्चितपणे पंजाबमधील घडामोडींवर पंजाबमधूनच विधायक प्रतिक्रिया उमटू लागल्या. हिंसाचाराचा निषेध करणारी वाक्य उच्चारलेली ऐकू येऊ लागली. दंगलग्रस्त शहरांमध्ये लोकांच्याच पुढाकारातून पक्ष, पंथ, भेद विसरून शांततासमित्या स्थापन होऊ लागल्या. हरियाणातला हिंसाचार झपाट्याने ओसरू लागला. तिथे शिखांवर झालेल्या 'अत्याचारांची' पहाणी करायला अकालींचे एक प्रतिनिधिमंडळ जाणार होतं, तर हरियाणातल्या शिखांनीच त्यांना कळवलं की आम्ही इथल्या जनतेशी एकरूप आहोत, तुम्ही इथे येऊ नका, त्यामुळे भेद वाढतील. लाखन माजरा गावातल्या हिंदूंचा एक जथा गुरुद्वाराच्या संरक्षणात उभा राहिला. जालंदरमध्ये सर्व वृत्त-

पत्रांची एकत्र बैठक होऊन त्यात एक आचारसंहिता स्वीकारण्यात आली. तीनुसार जातीय तेढ वाढायला हातभार लावतील अशा बातम्या देण्याचं टाळणं सर्वांनीच मान्य केलं. फिरोझपूरला हिंदु आणि शिखांनी एकत्र येऊन *बगदादी गेट गुरुद्वारात रामायण आणि* गुरुग्रंथसाहेब यांचा अखंड पाठ योजला. अमृतसरमध्ये सर्व पक्षीय शांततासमिती स्थापन झाली. त्यात कम्युनिस्टांसकट सर्व राजकीय पक्ष होते. अमृतसर रेल्वेस्थानकावर, अमृतसर शहराचे संस्थापक शिखांचे चौथे गुरू रामदास यांची प्रतिमा पुन्हा स्थापन करण्याचा निर्णय या समितीनं घेतला. दंगल सुरू झाली त्या दिवशी ही प्रतिमा तोडून–फोडून टाकण्यात आली होती. अमृतसरमध्येच बाजारात गोळ्या झाडणाऱ्या अतिरेक्यांना जमावाने त्यांचा पाठलाग करून पकडलं.

## आभास विरून गेला

यातील शक्य तेवढ्यांचे पत्ते मिळवून त्यांना चंडीगढमधून पत्रं टाकली. महाराष्ट्रातून युवक येऊन कशा प्रकारे एकात्मतेला हातभार लावू इच्छितात ते कळवून आपण भेटू या अशी विनंती केली आणि आम्ही पाचजण कामाला लागलो. पाचजण म्हणजे मी आणि इकबालसिंग. भाई : तो प्रबोनिधिनीच्या व्यापार उद्योग विभागाच्या काही कामानिमित्त तिथेच होता आणि गेले सहा महिने तिथे काम करणाऱ्या दोन युवती कार्यकर्त्या-हेमांगी नगरकर, पूर्णा गोगटे. रोजची अनेक वृत्तपत्रं नीट वाचणं हेही त्या कामाचाच एक भाग बनला; पण पूर्वतयारीची मुख्य कामं म्हणजे सर्व क्षेत्रातल्या नागरिकांच्या भेटी, प्रत्यक्ष सद्भावयात्रेचा प्रत्येक शहरातील कार्यक्रम निश्चित करणे, आर्थिक मदतीबरोबरच प्रत्यक्ष स्थानिक सहभाग मिळविणे आणि हे सर्व होण्यासाठी प्रत्येक शहरात या अभियानाची कामं करणारी सद्भावसमिती स्थापन करणे. त्यानुसार गेल्याच्या दुसऱ्या दिवशी एक बैठक झाली. उपस्थितांमध्ये पंजाब युनिव्हर्सिटी हिंदी विभागाचे प्रमुख श्री. धर्मपाल मैनी, 'गुरु रविदास चेअर' भूषविणारे प्रा. सिंघल, हिंदी 'ट्रिब्यून'चे संपादक राधेश्याम शर्माजी होते. युवकांचा सहभाग मिळवणे, वृत्तपत्रांचं सहकार्य, अनेक महत्त्वाची धोरणं यावर चर्चा होऊन या बैठकीनं कामाची एक दिशा दाखवून दिली.

त्यानंतर हळूहळू दिशा सापडत गेली. दुसऱ्या दिवशी 'पंचनद शोध संस्थे'च्या उद्घाटनाचा समारंभ होता. उद्घाटक श्री. प्रेम भाटियाजी होते. *श्री. प्रेम भाटिया 'ट्रिब्यून' चे संपादक व ऑल* इंडिया एडिटर्स गील्डचे अध्यक्ष आहेत. DAU कॉलेजातल्या उद्घाटनसमारंभापूर्वी त्यांची भेट झाली. मुरब्बी पत्रकाराप्रमाणे त्यांनी सद्भावयात्रेचा हेतू, कार्यक्रम याविषयी काही शंका विचारल्या. 'तुम्ही महाराष्ट्रातून इथे येणार, तुम्हाला इथल्या समस्येचं नेमकं स्वरूप माहिती आहे का?' अशी परीक्षाही घेतली आणि मग **'You go ahead, I am with you'** असं सांगितलं. उद्घाटनसमारंभानंतर संस्थेनं एक परिसंवाद योजला होता. विषय होता: **'Whether India is a nation or multination.'** परिसंवादाचं सूतोवाच जस्टिस एच. आर. खन्ना यांनी केलं. वरकरणी असलेल्या विविधतांमागे या संस्कृतीत एकसंधता आहे, म्हणून हे एक राष्ट्र आहे असं त्यांनी तर्कशुद्धपणे मांडले. या विषयाचा पंजाबमधील समस्येशी जवळून संबंध आहे. त्यामुळे त्यांच्या बोलण्यात पंजाब वर्तमान स्थितीविषयी सखोल चिंता व्यक्त झालेली होती. परिसंवादाचा असा सूर त्यांनी लावून दिला, तरीसुद्धा भारत हे एक राष्ट्र नव्हे, अनेक 'राष्ट्रां' चा समूह आहे असे काही आवाज उमटलेच. त्या *तिथे दिवसभरात अनेकांच्या भेटी झाल्या. जनता पक्षाचे स्वामी* अग्निवेश, हिमाचलचे माजी मुख्यमंत्री श्री. शांताकुमार ( भाजप ) सरदार चिरंजीवसिंह ( RSS ), सरदार गुरूनामसिंग तीर(अकाली दल), प्रा. धर्मेंद्र गोयल ( तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक ), श्री. पांडे ( इतिहासतज्ज्ञ ) अशा सर्वांनीच सद्भावयात्रेला पाठिंबा दर्शविला. सहकार्य देऊ केलं आणि प्रत्यक्ष यात्रेच्या कार्यवाहीविषयी अनेक नव्या कल्पना सुचवल्या. याच परिसंवादात अखेरीस इकबालसिंहजींना बोलण्याची संधी देण्यात आली. ते दहाच मिनिटं बोलले अन् त्यांनी सभागृह जिंकून टाकलं. केवळ चर्चा करून काही उपयोग नाही, विधायक कृती हवी हे त्यांनी ठासून मांडलं. आम्ही आमच्या कुवतीनुसार महाराष्ट्रातून येऊन काम करतो आहोत, कारण आम्हाला पंजाबही आमचा वाटतो. आता आम्हाला तुमचं सहकार्य हवं. घराला आग लागली आहे, ती विझवायला धावून येईल त्याचं हे घर. हे त्यांनी अशा उत्कटतेनं मांडलं की सभागृह हेलावून गेलं. सहकार्याचे हात भराभर पुढे झाले. पत्रकारांनी पुढे येऊन आमच्या पाच जणांच्या मुलाखती घेतल्या.

काही जणांच्या भेटी, काही बैठकी, एक सभा, अनेकांचा पाठिंबा, अनेकांचे सहकार्य, वृत्तपत्रजगाकडून स्वागत एवढी चंडिगढमधली मिळकत. ही काही फार कमाई नव्हे; पण आशेचे किरण कोणकोणत्या दिशेनं येणं शक्य आहे हे तरी दिसलं. कामाचा एक सूर सापडला. तो आळवतच जालंदरला निघालो.

दरम्यान हरयाणा थंड होऊ लागला होता; पण पंजाबमधली चिन्हं काही ठीक दिसत नव्हती. सुवर्णमंदिर–परिसरात सहा तास गोळीबार झाल्याच्या बातम्यांनी तर आगीत तेल पडल्यासारखं झालंच होतं. आता भरीत भर म्हणजे सीआयडी आणि पंजाब पोलीस यांच्यातही सशस्त्र खटके उडाल्याच्या बातम्या होत्या. अतिरेक्यांना कठोरपणे हाताळत नाही म्हणून काही सीआरपी जवानांनी अमृतसरच्या DC ला उद्धटपणे वागवलं होतं. संत लोंगोवालांची वाक्यं होती की सुवर्णमंदिराभोवतीचा सीआरपींचा वेढा उठवावा. कारण ते शिखांशी दुजाभाव करतात. वातावरणातल्या सर्वच तंगपणाला छेदत जाणारी हिंसाचाराची काळीकुट्ट रेषा तर दिवसेंदिवस जास्तच ठळक होत चालली होती. चंडीगढमध्ये होतो तोवर हे सगळं फक्त ऐकायला किंवा वाचायला मिळत होतं. त्यामुळे नाही म्हटलं तरी जरासं आभासात्मक वाटत होतं.

जालंदरकरता बसमध्ये बसलो आणि आभास विरून जाऊ लागला. संध्याकाळ होती. गाडीत फारच थोडे लोक. तेही सर्व शीख. सहेजधारी मी एकटा. वाटेतल्या एका गावात सहा वाजले. पंजाब कर्फ्यूखाली गेला. तेव्हा गाडीत शिल्लक राहिलो आम्ही चौघं. ड्रायव्हर, कंडक्टर, इकबालसिंहजी आणि मी. भुल्लर आणि धिलवान इथे चार आणि सहा जणांवर झाडलेल्या गोळ्यांनी संपूर्ण पंजाबमधल्या मोकळ्या समाजजीवनाचा जीव घेतल्याचं दिसत होतं. इथपासून इकबालसिंहजी माझे 'डॅडी' बनले. जालंदरवरची छाया तर जास्तच गडद. अमृतसर हे वादळाचं केंद्र. ते जवळ येत चाललं तसं द्वेषाचे,

नैराश्याचे सूर जास्तच भेसूरपणे कानावर पडू लागले. देश तुटणार ही भाषा अधिक सहजपणे उच्चारलेली ऐकू येऊ लागली. 'लोकसंख्येची अदलाबदल' या कल्पनेवर गांभीर्यानं विचार होत असलेला दिसला. मॉडेल टाऊन गुरुद्वाराचे व्यवस्थापक सरदार किशनसिंग मान हताशपणे म्हणत होते की, बात अब इतनी बढ चुकी है की, पीछे मुडना मुष्किल है, 'मित्तल उद्योग' चे चालक श्री. रवि मित्तल म्हणाले, 'आम्ही शिखांना आमचेच मानतो; पण असंच मानणारे शिख आजकाल दिसेनासे होत चाललेत.' एक उद्योगपती श्री. सुरिंदर सेठ शांत आवाजातच पंजाबच्या डबघाईला आलेल्या अर्थव्यवस्थेचं वर्णन करत होते. त्यानं अंगावर काटा येत होता. कर्फ्यूनं मध्यमवर्गीय, सर्वसामान्य माणूस, रिक्षावाला यांची कशी धूळधाण उडालीय तीही दुःखदच. अशी परिस्थिती. 'अत्यंत गंभीर' हा शब्द ही अपुरा आहे, वापरून वापरून गुळगुळीत होऊन गेला आहे. रात्री टी. व्ही. वरच्या बातम्यांत लोकांना शांततेचं आवाहन केलं जात होतं. छायागीतात सर्व राष्ट्रभक्तीपर गीतं दाखवली जात होती. प्रख्यात कवी 'हां ये मेरा पंजाब है' अशी गौरवपर गीत गात होते. अर्थातच वास्तवाशी या सर्वांचा विरोधाभास जास्तच भीषण वाटत होता.

आणि म्हणूनच जे कोणी कृतिशील उपक्रम मांडत होते, त्यांना सहकार्यही तितकंच चटकन् मिळत होतं, नाही तर आम्ही तसे अनोळखी; परदेशी. त्यांच्या पाठीशी किशनसिंग मान यांनी गुरुद्वारा उभे करण्याचं काही कारण नव्हतं. श्री. सुरिंदर सेठ यांनी आम्ही तिथे जाण्यापूर्वीच नोटस् तयार ठेवण्याचं काही कारण नव्हतं. ते एक यशस्वी उद्योगपती, जालंदर दूरदर्शनवरचे कार्यक्रम–संचालक आणि पंजाबच्या रोटरी क्लबचे गव्हर्नर. त्यांनी आपली सर्व साधनसंपत्ती सद्भावकार्यामागे उभी केली. पंजाबमधल्या सर्व रोटरी क्लबज्साठी त्यांनी या उपक्रमाची माहिती देऊन 'सहकार्य करा' असं कळवणारं पत्र टाईप करून घेतलं. जालंधरमधल्या जेसीज्, लायन्स, जायंटस् या सर्वांशी संपर्क साधून दिले. दुपारी 'हॉटेल स्कायलार्क'मध्ये त्यांची एकत्र मिटिंग होती. तिथे आम्हाला बोलवून नेमकं 'सहकार्य' म्हणजे काय यांची व्यावहारिक योजना आखली. याच हॉटेलमध्ये याच वेळात एका लग्नाची पार्टी होती; पण पार्टीतल्या लोकांच्याही अस्वस्थ चर्चा हाल–ए–पंजाब वरच. एखादा 'issue' किती तापला आहे हे मोजायचा तापमापक म्हणजे सर्वसामान्य माणूस. आज पंजाबमधला रिक्शावाला, दुकानदार, उद्योगपती, वकील, प्राध्यापक इतका अस्वस्थ होऊन, भडकून बोलतो की कळतं काटा फार खोल रुतलाय. लग्नाच्या पार्टीत आठवण निघाली. अमृतसरला दोघा शिख भावातल्या एकाला काही जणांनी गोळ्या घालून मारलं. कारण त्यानं दाढी राखली नव्हती. इथे शिख, हिंदू एकत्र होते; पण हे दृश्य रस्त्यावर जरा अभावानंच दिसतं. म्हणूनच मी आणि 'डॅडीं' नी एकत्र काम करणं अर्थपूर्ण होतं आणि हेही अर्थपूर्ण होतं की, आम्ही रहायला सरदार हर्राजिंदरसिंग यांच्या घरी होतो.

जालंदरमध्ये शेवटी ॲड. D P सेहगल आणि श्री. सुरिंदर सेठ यांच्याशी चर्चा होऊन इथे घेण्याच्या कार्यक्रमांना बरंच अंतिम स्वरूप देता आलं. तिथली 'सद्भावसमिती' बरीचशी डोळ्यांसमोर आली. यात्रेनं गावात पाऊल टाकल्यापासून ते गावाबाहेर पडेपर्यंत काय काय कार्यक्रम ठेवायचे, नेमके उद्देश कसे साधायचे, अधिक समाज कसा सहभागी करून घ्यायचा याची योजना झाली. सोबत गरमगरम पराठे, दही, लोणचं होतं. हवेत थंडी होती; पण सेहगलजींच्या उत्साहात ऊब होती. मी त्यांना म्हटलं की, तुम्ही आमचं काम फारच सोपं करताय. आम्हाला वाटलं होतं प्रत्यक्ष programme वर येण्यापूर्वी बरीच चर्चा करावी लागेल. तसे ते चटकन म्हटले, No mention ही चर्चा करायची वेळच नाही. We should act, immediately with all the power available to us. त्यामुळे जाहीर सभा, बुद्धिवंतांची बैठक, पत्रकारपरिषद, भजन, कार्यक्रम, प्रभातफेरी, पत्रकवाटप या उपक्रमांची पटापट चर्चा झाली. मुक्कामाची जागा, जेवणखाण्याच्या सोयी ते आंघोळी, कपडे धुणे इथपर्यंतच्या बारकाव्यांचा उल्लेख आला. या चर्चेनं एकूणच पदयात्रेचं स्वरूप माझ्या डोक्यात अधिक स्पष्ट केलं. चर्चेच्या ओघात शिख इतिहासावर विषय आला. 'पंचप्यारे'च्या गोष्टीतील पाचही जणांची नावं जाती आणि ठिकाण मी सांगितल्यावर त्यांच्या डोळ्यांत पाणीच यायचं राहिलं.

त्यानंतर दोघे पळतपळतच घरी आलो. कारण 'दिवसा' अमृतसरला पोचायचं होतं. वाटेतच हातात 'ट्रिब्यून' चा अंक पडला. त्यात या उपक्रमाची सविस्तर बातमी दिली होती. बातमीला शीर्षक होतं Peace offensive in Punjab. पेपरची गुंडाळी काखेत मारून पळतच बसमध्ये जाऊन बसलो, अन् बस सुटली. आज बस भरलेली होती; पण फेटयांनी. मोना दोघं-तिघंच. बस जालंदरबाहेर पडल्यापडल्या रस्त्यावर, चौरस्त्यांपाशी शस्त्रधारी पोलिसांचे पहारे दिसले. तिथे वाळूची पोती लावून 'मोर्चे' बांधलेले होते. अमृतसरपासनं दहा कि. मी. वरच्या फाटयावरून आमची बस पुढे सरकली तशी फाटयावर उभी असलेली पिवळी पोलिसी मोटरसायकल सुरू झाली आणि दोन तगडया बंदूकधारी पोलीसांना घेऊन गाडी पाठोपाठ धावू लागली.

अमृतसर जाम टेन्स; पण दिवसापुरता कर्फ्यू उठलेला. चावलाजींकडे सामान ठेवण्यासाठी जाताना वाटेत जालियनवाला–बाग लागली. नंतर सुवर्णमंदिराभोवतीच्या अरुंद गल्ल्या पार करतकरत त्यांच्या घरी पोचताना नसन्‌नस सरसरून आली. भीती, हुरहूर यांना जालंदरमध्ये थोडं स्थान होतं, ते कापरासारखं जळून गेलं. समोर सुवर्णमंदिर. मला तिथे जायचंय. इतकंच. सामान चावलाजींकडे ठेवून सुवर्णमंदीरापाशी आलो. इंचाइंचावर पोलीस. ते नसतील तिथे निहंग. मंदिराभोवतीच्या घरांवर गन्स् बसवलेल्या. पोलिसांच्या डोक्याला लोखंडी टोप, चेहऱ्यासमोर लोखंडी जाळ्या. यात एकही सरदार नाही हे लक्षणीय. भवानीपेठेएवढीच गर्दी; पण भवानीपेठेच्या १/३ रस्ते असं मिश्रण करून त्यात केवळ कल्पनाच करता येईल इतका tenseness मिळवला तर तयार होईल ती सुवर्णमंदिराभोवतीची हवा तयार असेल. एका दुकानात मोठा रुमाल खरेदी करून डोक्याला बांधला आणि पेशवेपार्कात चाललो आहोत असं मनाला बजावत शिट्टी वाजवत दारातून आत शिरलो. फार टक लावून पहाणारांकडे बघून Smile दिलं. डॅडी इकबालसिंगजींची सोबत अर्थातच मोलाची. सीधे अकाली दलाच्या ऑफिसमध्ये गेलो.

पृष्ठ ३१ वर

**१२ मार्चला महाराष्ट्रातून एक हजार शेतकरी राजभवनावरील मोर्चात सहभागी होण्यासाठी चंडीगढला शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली गेले होते. या मोर्चात भाग घेण्यासाठी दहा राज्यांतून शेतकरी जमलेले होते व वातावरण भारलेले होते – दिलासा देणारे होते.**

# किसानों से जो टकरायेगा भूखा ही मर जायेगा पंजाब से बुलावा है महाराष्ट्र आज आया है

संजय संगवई

चंडीगढ बसस्टँडवर यष्टचा अजून सुस्ताव-लेल्याच होत्या. मात्र अंबाला, दिल्ली, अमृतसर, पठाणकोटकडून येणाऱ्या रस्त्यावर भल्या पहाटे ट्रॅक्टर्सची धडधड चालू झाली. शेजारच्या परेडग्राउंडमध्यें ट्रॅक्टर्स थांबविले जात होते. कचर–पचर बोलत सगळी माणसं मैदानात उतरत. उन्हं वर चढू लागली तशी सगळ्या ट्रॅक्टर्समधून आणलेलं भलं मोठं सरपण काढलं गेलं. धडाधड जाळ पेटला. मटार–आलूचा रस्सा मोठाल्या डेग्यांमध्ये तयार झाला. आता तव्यांवर सगळेजण रोटचा भाजू लागले. पूर्ण मैदान खरपूस वासानं भरून गेलं. मधूनच नवा ट्रॅक्टर येई. दोन्हीकडचे लोक घोषणा देत... 'भारतीय किसान यूनियन !'... 'हम सब एक है !' दिवसभर सभा होणार. दुपारी राजभवनावर मोर्चा न्यायचा. पंजाबातल्या संगरूर, पटियाला, लुधियाणा, गुरदासपूर जिल्ह्यातले शेतकरी परस्परांना भेटत होते. नवा परप्रांतीय दिसला की कुतूहल चाळवले जाई. कोण कुठला चौकशी होऊन 'रोटी–पाणी' घेण्याचा आग्रह !

तिकडे पंचायतभवनात सर्व नेते व कार्यकर्ती मंडळी होती. महाराष्ट्राचे शरद जोशी, अनिल गोटे, विजय जावंदिया; हरयाणाचे मांगीराम मलिक, करमसिंग; मध्यप्रदेशचे विनयचंद्र मुनीम; उत्तरप्रदेशचे श्रीकृष्ण गांधी ही मंडळी होती. पंजाबची भूपिंदरसिंग माळा, सुरजितसिंग, विकसिंग, अजायबसिंग रपाडा ही माणसं सरबराई करण्यात गुंतलेली. चंडीगढच्या पोलीसअधिकाऱ्यांशी चर्चा. मोर्चा व धरणे अहिंसक राहील असा नेत्यांनी निर्वाळा दिला. पूर्ण चंडीगढमध्ये १४४ वे कलम लागू होते म्हणे. 'पण आता तुमची फारच माणसं येताहेत, तर होऊ द्या सभा' असे पोलीसकमिशनरसाहेबांनी म्हणून टाकले !

दुपारची सभा प्रचंडच होती. ५०–५५ ट्रॅक्टर्स चंडीगढबाहेरच दीड तास अडकवून ठेवले होते. मात्र नंतर ते येऊ दिले. गल्का, गर्दी वाढतच होती. समोर पांढऱ्या, निळ्या, लाल, पिवळ्या केशरी फेट्यांचा सागरच होता ! मधूनच महाराष्ट्रातल्या पांढऱ्या टोप्यांचे व कपड्यांचे बेट होते.

'भारतभर दे किसानो– इक्क हओ', 'बिजली दे बिल्ल–नही देंगे', 'जबतक कर्जाई किसान रहेगा– भारत में तूफान रहेगा', 'जो किसानोंसे टकरायेगा– भूखा ही मर जायेगा' या घोषणा देत ५०–७० हजारांचा मोर्चा संध्याकाळी शांतपणे पाच किलोमीटर लांब राजभवनावर निघाला. गोल्फ क्लब शेजारी सुरक्षा सैनिकांनी तारेचे कुंपण करून अडविले एखाद्या अजस्र जलाशयासारखा मागचा संपूर्ण जमाव हेलकावत खाली बसला.

गोल्फमैदानात ट्रॅक्टर्स, ट्रक धडधडत घुसले. स्पोर्टक्लबच्या दिशेने व इतर दोन बाजूंनी राजभवनाची नाकेबंदी झाली. पंजाबच्या किसानांच्या मागण्या मान्य होणार नाहीत तोवर इथून हलणार नाही ! भले मग कितीका दिवस लागेनात असा आरंभी तरी निर्धार होता. बसलेल्या जागीच पाणी, शिधा आणला जाणार आहे.

संध्याकाळ पडली. अंधार वाढत जात होता. गलबलाट–घोषणांनी शेजारचा शांत परिसर ढवळून निघाला. बंगले, अपार्टमेंटस्-मधली मंडळी कुंपणाआडून डोकावत होती.

मावळत्या वेळी एका कृपाणधारी वृद्धाने सणसणीत आरोळी दिली. 'जो बोले सो निहाल' दहा हजारांच्या मागच्या गर्दीतून अनेक कृपाण–भाले वर आले, मुठी हवेत फेकल्या गेल्या 'सत सिरी अकाल !'

...आता इथेच बसायचं होतं... तड लागेपर्यंत. वीजदरातील घोटाळे नष्ट करावे, रास्त भाव, कालव्याच्या ब्रिकलाईनिंगचा खर्च सरकारने करावा, बँकांच्या कर्जातील दलाली काढली जावी इत्यादी अनेक मागण्या होत्या.

दिल्लीपासूनच वाटत होतं की, जेवढं बाहेर दिसतंय तेवढी भयंकर स्थिती मुळीच नाही. हरयाणा रोडट्रान्स्पोर्टच्या रात्रीच्या ऑर्डनरी बसमध्ये मुद्दाम बसलो. ही बस पानिपत, कर्नाळ वगैरेंसारख्या गावांतून जात होती. पानिपतचा एक तरुण इसम मागे होता. त्याला विचारलं, तसा तो म्हणाला, 'हां बीचमें थोडीसी गडबड थी अब सब ठंडा हैं।' (रात्रीसाठी पंजाबकडे जाणाऱ्या गाड्या मात्र सोडल्या जात नव्हत्या.) रेल्वे-लाइन्स उखडणे, उपसभापतीवर हल्ला हे प्रकारही होतेच. गाडीत चार-दोन सरदारजी निःशंकपणे घोरत होते. मागचा पानिपत-वाला त्याच्या टेपवर चटकदार पंजाबी गाणी खुशीत ऐकत होता. मला आपलं बरं वाटलं !

...सकाळीच चंडीगढमध्ये बसस्टँड-जवळच्या परेडग्राउंडवर चहल–पहल सुरू

झाली. 'ट्रिब्यून' सारख्या दैनिकांनी 'Chandigarh fortified to tackle farmers' अशा थाटात बातम्या दिल्या होत्या. पंजाब राजभवनाला वेढा घालण्यासाठी देशातील १० राज्यांतून ४० ते ५० हजार शेतकरी येतील या अंदाजाने पोलिसांबरोबरच केंद्रीय राखीव दलाच्या दहा कंपन्या व सीमा सुरक्षा दलाच्या ३ कंपन्या बोलाविल्या होत्या. राजभवनाचे दरवाजे आदल्या दिवशीच बंद झाले. आसपासच्या सेक्टर्समध्ये लोखंडी बॅरिकेड्स उभारून झाल्या. केंद्रीय तुकडीच्या तीन कंपन्या तैनातही झाल्या होत्या.

पंजाबात एका आठवड्यापासून शेतकऱ्यांचे वीजदरासाठी आंदोलन चालू होते. त्याचा अंतिम टप्पा त्याचबरोबर अखिल भारतीय पातळीवरचा किसान-मेळा अशा दोन प्रकारांनी १२ मार्चचा मेळा व घेराव ठेवला होता. पंजाबमधल्या किसान यूनियनचा अकाली दलाशी घनिष्ट संबंध आहे. अनेक नेते संत भिंडरांवाले यांचे समर्थक आहेत. त्यामुळे हे अधिवेशन एका बाजूला झुकलेले, थोडेफार हिंसक होईल का काय अशी शंकाही होती.

तिकडे पंजाबात गडबड आहे, कशाला यावे अशी शंका घेऊन अनेकजण आले होते. त्यावर कित्येकजण फार नाराज झाले. संगरुरचा गुरशरन व्यथित होऊन म्हणाला की, 'आमचे भाई महाराष्ट्रातून येत आहेत म्हणून आम्ही किती खुशीत आहोत. त्यांच्यासाठी सगळे ट्रॅक्टर्स काढले, खायला-अंथरायला काही कमी पडू नये अशी दक्षता घेतली.'

अजायबसिंह खाडा तर स्टेजवरून गर्जतच होते.

'आपणाला किती बदनाम केले जाते बघा. हे पुण्याहून आलेले महाराज (अस्मादिक!) पुण्यात असताना मला पंजाबमधील परिस्थितीबद्दल खोदून खोदून विचारत होते. आपल्याला अजून बदनाम करता येऊ नये अशी दक्षता तुम्ही घ्या!'

या सर्वांचं म्हणणं फार खरं होतं. महाराष्ट्रातून नागपूर, वर्धा, नांदेड, उदगीर, लातूर, कंधार, धुळे, साक्री, बागलाण या भागांतून आलेल्या शेतकऱ्यांची या पंजाबी भावांनी फार चांगली आवभगत केली. पाच दिवसांचा प्रवास करून थकून आल्यानंतर ट्रॉलीजवरून आपापल्याला गावी नेलं, नंतर चंडीगढला आणलं. नागपूरवरून सात तरुण १८०० कि. मी. चा सायकलवरून प्रवास करून चंडीगढला पोचले. त्यांचेही किसानांच्या लाखो हातांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. महाराष्ट्रातले सर्व मिळून १ हजारांपर्यंत लोक होते.

## मनोमिलाप हेच यश

हरयाणाचे २ हजार किसान आले होते. भारतीय किसान युनियनचे प्रमुख नेते (परधाऽन) मांगीराम मलिक हरयाणाचेच. अकाली आंदोलनाच्या दरम्यान पंजाब व हरयाणातील लोकांच्या मनात कटुता आली हे खरे. दोन्हीकडचे लोक ते नाकारत नव्हते. परंतु बी. एस्सी. झालेला कुलवंतसिंग म्हणाला, 'भई, यह सब बच्चोंके गुस्से जैसा है। बस, अब वह ठंडा पड गया!' मांगीरामजी हा माणूस मोठा खानदानी पण साधा. स्वतःचे विचार स्पष्ट आहेत, व्यक्त करण्याची ढब थेट देहाती जाटासारखी. खादीचे धोतर, कुडता व भगवा फेटा बांधून कोणाचंही बोलणं अदबीनं वाकून ऐकतात. सभेत ते म्हणाले, 'बाबांनो, शीख किंवा हिंदू यापैकी आपला कोणताच धर्म नाही. आपण किसान आहोत. आपल्या सर्वांचंच सारखंच शोषण केलं जात आहे. तोच आपला धर्म आहे!'

त्या वेळी समोर जमलेला लाखांवरच्या रंगीबेरंगी पगड्यांनी प्रचंड गर्जना केली.... 'आवाज दो-हम एक है!'... त्या उसळत्या धुळीत, कहार उन्हात सुखद शीतळाई देणारं आणि चटकाही लावणारं दृश्य होतं. अशा वेळी रोमांचित किंवा भावनिक न होणं फार-फार कठिण!

सभेत पंजाबी नेत्यांनी व इतरांनी राजकीय पक्षांवर पार झोड उठविली. सियासती धंदे करून ही माणसं आपल्यात फूट पाडतात, त्याला आळा घातलाच पाहिजे. वाजवी (उत्पादनखर्चानुसार) दाम, कर्जातील सवलती, पंजाबच्या शेतकऱ्यांचे वेगळे प्रश्न यावर सगळेच बोलले; परंतु सगळ्यांच्या बोलण्याचा धागा एकच होता. आपण सगळे एकाच सुपातले, एकाच जातीचे, स्थितीचे. आपल्या ऐक्याच्या आड बाकीच्या गोष्टी येऊ नयेत.

मध्यप्रदेशातले पाच व उत्तरप्रदेशातील पाचजण, राजस्थानातून व दिल्लीतून काहीजण आले होते. या शेतकरी मेळाव्याची महत्त्वाची तात्कालिक फलश्रुती काय असेल तर ती हा मनोमिलाप! पंजाब-हरयाणाचा शेतकरी एकत्र आला. परस्परांच्या हातचं त्यांनी गोड मानून खाल्लं! काही अतिरेकी वगळता पंजाबमधला बहुसंख्य शीखसमाज अजूनही शांत व दिलदार आहे हे पटलं होतं!

या वेळी मराठी शेतकऱ्यांनी मस्त लक्ष वेधून घेतले. 'पंजाब का बुलावा है-महाराष्ट्र आज आया है' म्हणत वऱ्हाड-मराठवाड्याकडली काही अडकलेली मंडळी आली. त्यांना घोषणांनी साथ देताना सिरदारजींचे धूळमाखले चेहरे फुलून आले. महाराष्ट्राचे नेते तर सर्वांचेच नेते झाले. सरद जोशी भाव खाऊन गेले! (ही केवळ निर्मळ कॉमेंट) त्यांचा अनुभव-अर्थशास्त्र-संघटन यामुळे ते सर्वांचेच आपोआप आकर्षणकेंद्र बनले. पंजाबी ट्रिब्यून, इंडियन एक्स्प्रेसच्या लोकांनी त्यांच्या उभ्या-उभ्या मुलाखती घेतल्या. सामूहिक नेतृत्वातील एक प्रमुख नेता म्हणून (फर्स्ट अमंग इक्वल्स) त्यांच्याकडे पाहिलं जात होतं.

या मेळाव्याच्या निमित्तानं पंजाबी शेतकऱ्यांचा उत्साह आणि संघटना, शिस्त दिसली. सकाळपास्नं जवळच्या गावांतून लांबच्या स्टेशनवरून ही 'किसान यूनियन' वाली मंडळी चालत येत होती. ट्रॅक्टर्सवरून आठ दिवस पुरेल एवढा शिधा, लाकूडफाटा, भाज्या घेऊन परेडग्राऊंडवर आल्या आल्या रोट्या बडवायला सुरुवात केली. येत्याजात्याला पुसत होती 'परशाद नै लिया?' बाहेर प्रांतातल्या माणसाची आपुलकीने चौकशी करणार, महाराष्ट्र म्हटलं की हुजूरसाहिब नंदेड (नांदेड)ची अगत्याने आठवण! इतका वेळ सभा, तेच ते मुद्दे असलेली भाषणं, ऊन, असं असूनही प्रत्येक भाषण लक्षपूर्वक ऐकणं, उत्तेजित होऊन घोषणा देणं, स्वयंस्फूर्तीनं वाहवा करणं या गोष्टी अगदी दूरवर ट्रॅक्टर्समधली मंडळीसुद्धा करीत होती. स्त्रियांनीसुद्धा घोषणा देत मिरवणूक आणली.

आणि संघटना. पंजाब किसान यूनियनची गट (तालुका) स्तरावरून संघटना आहे. नंतर जिल्हा व राज्य पातळी. त्यानुसार

प्रत्येक खेड्याचा एक गट, तालुक्याचा गट, जिल्ह्याचा गट व त्यांचे प्रधान असे या मेळाव्याला आले होते. प्रत्येकाने कुठे जमायचे, कोणत्या क्रमाने हेही ठरत होते, लुधियाणा जिल्ह्याचे प्रधान बिक्रमसिंग घूलकोट म्हणाले की आमच्याकडे पहिला संघर्ष उभा राहिला तो लुधियाणा जिल्ह्यातील खेड्यांतून. नंतर त्यांची व्याप्ती वाढत गेली. आमचे सर्व संघर्ष यशस्वी झाले कारण प्रत्येकजण त्यात सहभागी होतो.'

या वर्षी वीजदरात वाढ केल्याच्या निषेधार्थ आंदोलन चालू होते.

'आणखी एक विशेष म्हणजे आपलं उद्दिष्ट काय हे बहुतेकजणांना चांगलंच ठाऊक होतं. [गुरुनामसिंग म्हाताऱ्यापासून ते वर्ध्याच्या तरुण मुलापर्यंत सर्वांनाच आपल्या असंतोषाचा तात्त्विक पाया माहीत होता. काही प्रतिवाद केला की 'प्राइस इंडेक्स'चा उल्लेख करून समोरच्याला 'डिसआर्म' करणारी ही मंडळी ! लहान शेतकरी, मोठा शेतकरी असा भेद त्यांना मंजूर नव्हता. पंजाब–हरयाणात आता ५–१५ एकरांवरचा शेतकरी क्वचितच. आजचा मोठा जमिनवाला उद्याचा अल्पभूधारक राहील असेही सगळ्यांचे म्हणणे होते. संगरूरच्या रघुवीरसिंहने माझं बौद्धिकच घेतलं ! आपल्यात फूट पाडली जात आहे याची स्पष्ट जाणीव इथे होती. मांगीरामजींनी सहज बोलताना याला 'तात्त्विक पाया' दिला. ते म्हणाले, श्रमिकांमध्ये ऐक्य होऊ नये व कष्टकऱ्यांच्या हातात श्रममूल्य जाऊ नये म्हणून खोटा इतिहास रचून, भाषिक व जातीय भेद मचवून आमचे मनोबल खच्ची करून टाकले. आता यांना धडा शिकवायलाच पाहिजे !'

ते म्हणाले, 'मनोबल उंच करण्यासाठी संघर्ष पाहिजे. संघर्षातून स्वतःची जाणीव होते. त्यातून आत्मगौरव वाढीला लागेल व काही कृती होईल. म्हणून सध्या प्रचार व भाषण, मेळावे एवढंच वातावरणही फारसं आक्षेपार्ह नाही !'

यापुढे संघटनेचे रूप कसे असावे हे जवळजवळ निश्चित झालेले आहेच. तीन वर्षांपूर्वी खन्ना येथील बैठकीत मांगीराम व इतरांच्या घटना व संघटना या प्रस्तावाला विरोध करणाऱ्या शरद जोशींनी परभणी ( त्याआधी मनमाड ) येथे एक पाऊल पुढे जाऊन एकदम स्वयंसेवक-प्रशिक्षणापर्यंत उडी घेतली. मांगीराम म्हणाले की, चळवळीबरोबरच बदलत जाणारे विधान (घटना) पाहिजे. चळवळीत अधिक जोम असतो. ती जिवंत असते हे मान्यच; पण चळवळ आकाराने फुगत चालली किंवा तिचा जोर वाढत चालला की तिचे संस्थात्मक रूप करणे आवश्यक बनते. संस्था ही स्वतःबरोबर काही अनुकूल व प्रतिकूल (डिस्फंक्शनल) गोष्टी घेऊनच येते !

## चंडीगढ–महत्त्वाचा टप्पा

याच संदर्भात राजकारणातील सहभागाचा प्रश्न उभा राहतो. किसान युनियन राजकारणविरहित राहणार असे प्रत्येकाने ( शरद जोशींसकट ) सांगितले. राजकीय पक्ष, राजकारण व सत्ता, निर्णयप्रक्रिया यासंबंधी यावेळी गल्लत होण्याचा संभव असतो. आपण एक दबावगट म्हणून काम करत असू. मात्र त्याचबरोबर स्वतःला हव्या त्या गोष्टी घडवून आणता याव्यात, त्यासाठी एक तर आपली माणसं 'तिथं' पाहिजेत किंवा आपल्या ताकदीवर तिथल्या माणसांना वाकविण्याची धमक पाहिजे. कोणताही निर्णय आपल्या बाजूने करवून घेणे ( डिसिजन–मेकिंग पॉवर ) म्हणजे राजकारण ! प्रत्येक वेळी प्रत्येकाला ते करावे लागते. त्याला नाके मुरडण्यात अर्थ नाही. आर्थिक संघर्ष व आर्थिक उद्दिष्ट हा प्रत्येक कृतीचा पाया असला तरी संघर्ष (Conflict) व 'निर्णय' (Decision) हे राजकीय कृतींच्या सदरातच आहेत. तुम्ही फार तर पक्ष स्थापन करणार नाही; परंतु येत्या निवडणुकांत आपल्याला अनुकूल अशी कोणती कृती करायची ते ठरवितात. पक्ष नको असला तरी राजकारण आवश्यकच आहे. शेतकऱ्याने आता स्वार्थी बनावे ते सांगताना–' आम्ही नाही बाबा त्याच्यात–' हा सोवळेपणा कशासाठी ? तसे नसेल तर मग डायरेक्ट 'विनोबा-मेथड' वापरावी. त्यात हृदयपरिवर्तन, सत्याग्रह हीसुद्धा हिंसा, दबाव मानली जाते. काहीच करू नये !

किसान युनियनने (किंवा शेतकरीसंघटनेने) 'राजकीय कृती' करण्यास सुरुवात केलेलीच आहे. आता आपण तसे करतो, करणारच इ. इ. सांगावे. नसता तेही एक ढोंग होऊन जाईल !

चंडीगढ मेळाव्यात अर्थातच याबद्दल काही विचारविनिमय होण्याची अपेक्षाही नव्हती.

या वेळी अनेक ठराव संमत झाले. मात्र शरद जोशी यांनी दिलेला निवडणुकांबाबतचा इशारा सर्वांत महत्त्वाचा आहे.

आपणास प्रतिकूल असलेल्याला कोंडीत पकडूनच आपण जे पाहिजे ते मिळवू शकतो. आगामी निवडणुका राष्ट्रीय पातळीवरच्या आहेत. देशातल्या किसानांनी उमेदवारांना वेठीस धरून त्यायोगे आपल्या मागण्यांची तड लावावी.

'चुनाव आ रहा है। हमारी आजादी हासिल करने का यही समय है।' या श्री. जोशींच्या वाक्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. असे असेल तर 'शेतकरी संघटनेने' तरी यासाठी काही सकारात्मक ( पॉझिटिव्ह ) उद्दिष्ट ठेवले का ? राजकारण्यांना गावात येऊ देऊ नका, पाट्या लावा, निवडणूक घोषणा लिहू देऊ नका... हे सर्व जिगर निर्माण करण्यास ठीक आहे. आपण स्वतः राजकारणांत आहोतच व ते आपल्याला करायचे आहे अशी स्वतःला जाणीव दिली गेली तरच सकारात्मक कार्यक्रम ठरू शकेल. स्वतःचीच वंचना किती काळ करणार ? जोशींच्याच भाषेत– या निवडणुकांसारखी संधी परत येणार नाही. त्या वेळी केवळ उपहासात्मक, मनोरंजक फार तर आगामी सत्ताधाऱ्यांना आरंभीच थोडा त्रास देणारे असेच कार्यक्रम घेऊन संधी वाया का घालवावी ? राजकारणी पुढाऱ्यांबद्दलची खुन्नस जिरवून घेण्याच्या वरवरच्या प्रयत्नांपेक्षा काही भरघोस मूलभूत करावे !

अर्थात आज पंजाब–हरयाणाचा व महाराष्ट्राचा शेतकरी त्यांच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय राजभवनापुढून हलणार नाही म्हणतोय! राजभवनावर हक्क त्याचाच आहे. तो सांगण्यासाठी त्याला बैलगाड्या व ट्रॅक्टर्स रस्त्यावर सोडावे लागतात एवढेच !

त्याच दिवशी पंजाब शेतकऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा करण्यास सरकार तयार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. राज्यपाल नंतर येणार असून त्या वेळी काय ती चर्चा होईल.

हा मेळावा व मोर्चा मुख्यतः पंजाब शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठीच होता. देशभरातून त्यांना पाठिंबा देण्यासाठी किसान आले. एक तऱ्हेचे ऐक्य साधले जात होते. किसानांच्या मागण्यांचे उद्दिष्ट लगेच साध्य होणार नाही. मात्र भारतीय किसान संघटना व चळवळ यांच्या प्रगतीचा चंडीगढ हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा होता. परभणी मेळाव्याप्रमाणेच गरजेपुरतेच धान्य पिकविणे, मंडीवर बहिष्कार हे निर्णय झाले. □


कसायला जमीन,
राहायला घर
वीस कलमांची
हीच मजल
चि-83/496

# अंदाजपत्रकाचा हा निरर्थक सोपस्कार-सोहळा कशासाठी ?

प्रा. राम बिलवलकर

प्रतिवर्षी फेब्रुवारी महिना लागला की, देशालाच जणू अर्थसंकल्पाचे वेध लागतात. नवे कर कुठल्या वस्तूवर बसतील याचे अंदाज व्यक्त केले जातात. ज्या वस्तूंच्या किंमती अर्थसंकल्पोत्तर वाढणार म्हणून त्या वस्तूंच्या खरेदी–विक्रीची धामधूम उडते. पुढल्या वर्षी महागाई आणखी वाढणार, म्हणून सामान्य माणूस धास्तावून जातो. करचुकवे आणि बुडवे, आयकरतज्ज्ञांच्या मदतीने वर्षात हाती लागलेले उत्पन्न 'हाती लागलेच नाही' असे कागदावर दाखविण्याची धमाल उडवून देतात. अर्थशास्त्री येत्या अर्थसंकल्पाबाबत आपले अंदाज व्यक्त करू लागतात. वृत्तपत्रे त्यांची मते व अंदाज प्रसिद्ध करण्यात अहमहमिका दाखवतात. अर्थसंकल्पाद्वारे देशात जणू नवे काही अवतरणार असते.

खरे तर अर्थसंकल्प म्हणजे गतवर्षीच्या जमाखर्चाचा ताळमेळ. त्या आधारावर पुढील वर्षातील जमा–खर्चाचा संकल्प. त्यावर आदल्या वर्षीची छाया असते आणि नव्या वर्षात त्यातून प्रकाश दिसण्याची आशा असते. देशाचे अर्थकारण, विवक्षित काळाचा वेध घेऊन, त्यानुरोधाने जाण्याचा वार्षिक संकल्प असे त्याचे स्वरूप असते; निदान असावे. एखाद्या अर्थसंकल्पामुळे देशाच्या अर्थकारणाला फार मोठे वळण दिले जाते ही भाबुक आणि 'पुस्तकी' कल्पना झाली. असे काही घडत नाही व घडण्याची शक्यताही नसते. आंतर्देशीय राजकारणात वेगवेगळी राष्ट्रे वेगवेगळ्या चाली खेळत असतात. त्यामुळे देशाच्या संरक्षणाच्या प्रश्नाला वेगळे वळणही एकदम मिळण्याची शक्यता असते. कधी देशात महापूर, तर कधी वादळे, कधी हिमवृष्टी, तर कधी दुष्काळ, तर कधी धरणीकंपी धक्के शासनाच्या तोंडाला फेस आणू पाहातात ! कधी पाऊस पडला तर बरे पीक, त्याने फसविले तर अन्नासाठी दाही दिशा हाकाटी. आवश्यक वस्तूंचे न्याय्य किंमतीत न्याय्य वितरण, टंचाईतून उद्भवणारे काळे बाजार, काळे व्यवहार, तस्करी, गुन्हेगारी, लाचखोरी, वशिलेबाजी, दंगेधोपे, मागण्या, मोर्चे, बंद, उपास, संप, टाळेबंद्या, माथेफिरू गोळीमारी, नाहक खून, रेल्वे-बसेसचे अपघात, एक ना अनेक गोष्टी आणि त्यातले प्रवाह इतके चंचल असतात, त्यात पुन्हा राजकारणी खेचाखेची इतकी अमाप असते की, यातील किती गोष्टी नियोजनानुसार व नियंत्रणाखाली चालतात हे सांगणे कठीण. राजकारणाच्या आणि अर्थकारणाच्या सोयींसाठी वटहुकुमी पद्धतीने जिथे सिमेंट, पोलाद, लोखंड, रसायने, पेट्रोल, डिझेल अशा उद्योगोपयोगीच नव्हे तर साखर, गोडे तेल, तांदूळ, गहू यासारख्या जीवनावश्यक वस्तूंचेही निर्देशित दर, सरकारला अंदाजपत्रकाची वाट न पाहाता अगर बुद्ध्या अंदाजपत्रक टाळूनच वाढवून द्यावे लागतात अगर दिले जातात, तिथे अंदाजपत्रकातील करआकारणीची बूज काय राहिली ? बँकरेट बदलून व्याजाचे दर बदलतात. संघटित कामगार संघटना संपाचे हत्यार दाखवून आपले पगार, भत्ते, सुखसोयी, सुविधा वाढवून घेतात. अगदी आमदार, खासदार, मंत्रीही आपले पगार, भत्ते, सुविधा अंदाजपत्रकी मार्गानेच नव्हे तर विधानसभेत अगर लोकसभेत मांडलेल्या ठरावान्वये वाढवून घेतात. आंतरराष्ट्रीय व्यापारी करार कर्जव्यवहार, तंत्रज्ञान आयात–निर्यात या गोष्टीही अंदाजपत्रकाच्या चौकटीतच घडवून आणल्या जातात असे कुणी म्हणणार नाही.

वाढत्या महागाईला अंदाजपत्रकाद्वारे धरबंध घालता येतो का ? करसवलती, झीरोटॅक्स झोन्स् यांनी भांडवलगुंतवण वाढते असे म्हणता येईल का ? भांडवलगुंतवण वाढली तरी निर्माण केलेली उत्पादनक्षमता पूर्णपणे वापरात येते अशी खात्री देता येईल का ? सरकारी खर्चाच्या आकड्यांना देशाच्या आर्थिक प्रगतीचा निर्देशांक म्हणता येईल का ? कर बसविले तर करउत्पन्नाचे अंदाजी आकडे प्रत्यक्षात जमा होतील का ? सरकारीकरणापायी, नोकरशाहीपायी, मंत्री–आमदार–खासदार यांच्या ऐषआरामी राहणी आणि दौऱ्यांपायी, बडेजावापायी एशियाड चोगम घेण्यापायी वाढणारा सरकारी अनुत्पादक वरखर्च कमी करण्याचे धोरण, सरकार अंदाजपत्रकात मांडू शकेल का ? मग अंदाजपत्रकाचा हा वार्षिक निरर्थक सोहळा तरी कशासाठी ?

## उत्पादनक्षमता वापरली जात नाही

या देशाची आर्थिक घडी पार विस्कटून गेली आहे. महागाई सतत वाढत आहे. विकास फक्त भाववाढीच्या मार्गानेच होतो असा चुकीचा समज या देशात पसरविण्याचा सातत्याने प्रयत्न होत आहे. परदेशात आपल्यापेक्षा जास्त भाववाढ झाली आहे किंवा भाववाढीचे आमिष नसेल तर उद्योगधंदे कसे वाढणार ? ही भाषा देशाचे पंतप्रधान जेव्हा करतात तेव्हा त्यांना मग आर्थिक विकासाचा वेग का मंदावला आहे, असे कोण विचारणार ? काळाबाजारवाले, चोरटी आयातदार, तस्कर, व्यापारी, सट्टेबाज यांच्या धंद्यांना इथे तेजी आहे. गुंतवलेल्या भांडवलातून इथे पुरेसे उत्पादन होत नाही. कारण पुरी उत्पादनक्षमताच मुळी वापरात येत नाही. कारणे अनेक. विजेचा पुरेसा पुरवठा नाही. त्यात वेळोवेळी खंड पडतो. वाहतुकीच्या चोंदी तर नेहमीच्याच ! टपाल, तार, दूरध्वनी या दळणवळणांच्या सोयी व त्यांची कार्यक्षमता याबद्दल काय बोलावे ? उत्पादन वाढावे कसे ? या परिस्थितीत बदल घडवून आणणे अर्थसंकल्पाद्वारे शक्य होईल का ?

लोकशाही राज्यव्यवस्थेत राजकारणाची अर्थव्यवस्थेवर नेहमीच

कुरघोडी होते. लोकशाहीत असे व्हावे अगर होणारच असे नव्हे; पण असे होते खरे. त्यामुळे देशाला निवडणुकांचे वेध लागले की, सादर होणारा केंद्राचा वा राज्याचा अर्थसंकल्प हा निवडणूक अभिमुखी असणार, त्यात सामान्य माणसाला खूष करणाऱ्या करसुटी, करमाफीचा भुलभुलैया असणार, तुटीचा अर्थसंकल्प, हा केवळ जनकल्याणासाठी म्हणून सांगितले जाणार. काही कर कमी केले जाणार. तळागाळातल्या गरीब जनतेच्या उत्थानाच्या, शेतकरीवर्गाला अधिक सुविधा देण्याच्या घोषणा होणार, जनतेच्या ज्या ज्या मागण्या असतील त्याच्या प्रकल्पावर खिरापतीसारख्या थोडथोडचा खर्चाच्या तरतुदी जाहीर होणार हे ठरलेलेच असते.

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प अशा तऱ्हेच्या अर्थसंकल्पाचा 'आदर्श वस्तुपाठ' ठरावा इतका तो निरर्थक आहे. त्यात देशाची बिघडत चाललेली आर्थिक घडी परत बसविण्याची इच्छाही नाही, ताकदही नाही; पण आश्वासक भाषा मात्र आहे. त्या अर्थसंकल्पाने पगारदार गरीब मध्यमवर्गीयांना व गोरगरिबांना दिलासा वाटावा अशा ३०५ कोटी रुपयांच्या करसवलती जाहीर केल्या. २७२.८८ कोटी रुपयांचे नवे करही बसविण्यात आले; पण ते विशेषतः क्रूड पेट्रोल, लोखंड, पोलादाच्या वस्तू यावरील अधिकांश कर वाढवून.

१९८४–८५ सालचे अंदाजित एकूण उत्पन्न ४०५०१ कोटी रुपये असून त्यात २२९९३ कोटी रुपये कर–उत्पन्न असेल. वर्षातील एकूण खर्च ४२ हजार ५३६ कोटी रुपये अंदाजिला असून त्यामुळे २ हजार ३५ कोटी रुपयांची तूट राहाणार आहे. नव्या करामुळे २७२.८८ कोटी रुपये खजिन्यात जमा झाले तर १९८४–८५ सालची तूट फक्त १७६२ कोटी रुपये होईल. १९८३–८४ सालची दुरुस्त अर्थसंकल्पीय तूट अंदाजित १५८६ कोटी रुपयांऐवजी प्रत्यक्षात १६९५ कोटी रुपये झाली असे अर्थमंत्र्यांनी सांगितले. संरक्षणावर गतवर्षीपेक्षा २५० कोटी रु. जास्त खर्च करून एकूण ६८०० कोटी रुपये खर्च होतील. योजनाखर्च ३० हजार १३२ कोटी रुपये होईल. अर्थमंत्र्यांनी ऊर्जेसाठीची तरतूद ४४ टक्क्यांनी वाढविली आहे तर तळागाळातल्या जनतेचे कल्याण साधणाऱ्या २० कलमी कार्यक्रमासाठी ४७ टक्क्यांची वाढ घोषित केली आहे.

वाढत्या महागाईच्या संदर्भात आणि रुपयाच्या घटत्या क्रयशक्तीचा विचार करून खालच्या स्तरावरील उत्पन्नगटातील करदात्यांना जाहीर केलेली ५ टक्के आयकर–सूट खरे तर नगण्यच आहे.

खरे तर व्यक्तिगत आयकर रद्द करायला हवा किंवा त्यात सुधारणा करून करमुक्त उत्पन्नाची मर्यादा किंमत–निर्देशांकाशी जोडायला हवी. कारण जे लोक आज करसल्लागाराच्या मदतीने सरकारला दाखवायच्या उत्पन्नाच्या रकमेत घालमेल करू शकतात त्यांनाच या करकायद्याचा चांगलाच उपयोग होतो. तुम्ही एक लाख रुपये उत्पन्न असूनही थोडी अक्कलहुषारी दाखविलीत, खर्चाची गुंतवणुकींची आवश्यक ती फेराफेरी केलीत तर तुम्हाला एक पैसुद्धा आयकर भरावा लागत नाही. अनेक बाबतीत वकील, डॉक्टर, व्यापारी, सिनेप्रोड्यूसर्स, सिनेॲक्टर्स ही सारी पैसेवाली मंडळी उत्पन्नाच्या ज्ञन्यांची फेराफेरी करून किती तरी कमी प्राप्तीकर भरतात अगर तोही भरीत नाहीत ! सरकारला तो वसूल करावा लागतो. शेतकरी, बागाईतदार यांच्यावर तर कर नाहीच. सरकार, मग ते केंद्रसरकार असो वा राज्यसरकार असो, त्यांच्या अंगाला धक्का लावायला तयार नाही. आयकर भरणारे ते बिचारे पगारदार! त्यांना चुकवाचुकवी करायला फारसा अवसरच गवसत नाही. त्यामुळे प्रगामी भासणारा हा कर प्रतिगामीच आहे.

यंदा निदान या करसुटीची मर्यादा १५ हजारांवरून २५ ते ३० हजारांपर्यंत न्यायला हवी होती; पण त्याऐवजी प्रत्येक स्तरावरील करात पाच टक्क्यांची सूट जाहीर झाली. १५ ते ४० हजार रुपये उत्पन्नस्तरात करांचे उत्पन्न कमी असते आणि करदात्यांची संख्या जास्त असते. त्यामुळे थोडक्यात अनेकांना खूष करण्याचा अर्थमंत्र्यांचा हा प्रयत्न. निवडणुकीत त्यांची मते पडायला एवढे मधाचे बोट बस ! ही त्या मागची अटकळ.

प्राप्तीकराचा किमान सीमांतदर ६० टक्क्यांवरून ५५ टक्क्यांवर आणला गेला. ३० वर्षांपूर्वी करचुकवेगिरीला व बुडवेगिरीला आळा घालण्यासाठी ब्रिटिश अर्थतज्ज्ञ श्री. कॅलॉर यांनी सीमांतदर ४५ टक्क्यांवर आणण्याची सूचना केली होती. भारी दर उत्पन्न वाढविण्याची इच्छाच नष्ट करतो आणि करचुकवेगिरीला प्रोत्साहन देतो, म्हणून ही सूचना होती. आज तीस वर्षांच्या स्वातंत्र्यकाळातील उद्योगपती, व्यापारी मंडळींच्या अंगवळणी पडलेल्या, करचुकवेगिरीच्या सवयीवर सीमांत–करदर कमी झाला तर काय परिणाम होणार ? करचुकवेगिरी रोखायला आता हा उपाय कालबाह्य झाला आहे.

खांडसरी साखर, कापूस आणि संमिश्र धाग्यांचे कापड, छपाईचा व लिहिण्याचा कागद, सुती हातमागी कपडा, ब्लँकेटस्, स्टीलची भांडी, छत्र्या, नकली दागिने, ध्वनिमुद्रित कॅसेटस् यांवरील अबकारी कर कमी झाले. सामान्य माणसाला दिलासा ! गतवर्षी फ्रीज आदी गृहोपयोगी विद्युत्साधनांवर जाहीर झालेली अबकारी करातील सूटही कायम राहिली. शहरी, मध्यमवर्ग आणि ग्रामीण श्रीमंतवर्ग यांना बरे वाटावे अशी ही पावले ! नाही तरी मतदानावर शहरी आणि ग्रामीण भागात याच मंडळींचे वर्चस्व असते. संपत्तिकरासाठी ३ लाख रुपयांची मिळकत करमुक्त करणे, राहत्या घराच्या किंमतीवरील सवलतीची मर्यादा लाखावरून दोन लाखांवर नेणे, सवलतप्राप्त एकूण संपत्तीची मर्यादा १.६५ लाखावरून २.६५ लाख रुपयांवर


धोती, मलमल व फॅन्सी पातळांचे
कारखानदार

श्री
महावीर टेक्स्टाइल मिल्स

वॉर्ड नं. ९, स्टेशन रोड,
इचलकरंजी

नेणे, ही सारी चाल वरील मंडळींना खूष करणारीच. व्यवस्थापकांच्या वेतनाची करपात्रतेची मर्यादा द. म. ५ हजार रुपयांवरून ७ हजार ५ शे रुपयांवर नेण्यातही तोच हेतू. वीस लाख रुपयांपेक्षा जास्त प्राप्ती असलेल्यांना फक्त 'ऑडिट' सक्तीचे करून करचुकवेगिरीला आळा कसा बसणार !

ऊर्जेवर ४४ टक्क्यांनी तरतूद वाढवून वीजउत्पादन वाढेल का? निदान खंडित न होता उद्योगांना विजेचा पुरवठा होईल का ? विजेवरील खर्च फलदायी व्हायचा तर वीजप्रकल्प उत्पादनक्षमतेच्या ७०।७५ टक्के तरी उत्पादन द्यायला हवेत. जलविद्युतकेंद्राची सरासरी उत्पादनक्षमता ५० ते ६० टक्के असते याचे कारण उन्हाळ्यात कमी होणारा पाण्याचा दाब; पण औष्णिक वीजकेंद्रेही ५० टक्के क्षमतेने का चालावी ? कोळसा वेळेवारी पुरविला जात नाही हे त्याचे मुख्य कारण. तो पुरविण्याची व्यवस्था करा. आहे त्या केंद्रांना तो कार्यक्षमतेने पुरविता येत नसेल तर ऊर्जेवर अधिक खर्च करून उत्पादनक्षमता निर्मून काय साधणार ?

रेल्वेची कार्यक्षमता, पोस्ट, तार, दूरध्वनी या दळणवळणाच्या साधनांची कार्यक्षमता ! या गोष्टी सर्वश्रुतच आहेत, त्यावर योजनांतर्गत जास्त खर्च करून अर्थव्यवहारांना अपेक्षित वळण मिळेल का ? शिवाय योजनाखर्चातील वाढ, वाढत्या किंमतीच्या संदर्भात काय किंमतीची ?

## वीस कलमी कार्यक्रम–पंचवार्षिक योजना

ग्रामीण विकासाचा शास्त्र सर्वत्र ढोल पिटीत असल्याने निदान अर्थसंकल्पात त्यासाठी जादा तरतूद हवीच ! ग्रामीण विकासाच्या नावाखाली हे पैसे खेड्यापाड्यापर्यंत झिरपतच नाहीत, तथाकथित समाजकार्यकर्त्यांच्या खिशातच अंतर्धान पावतात ही सर्वश्रुत गोष्ट आहे.

वीस कलमी कार्यक्रमाचा ७५ सालापासून मोठा बोभाटा चालला आहे. वास्तविक पंचवार्षिक योजनांच्या मसुद्यात नाही अशी एकही गोष्ट वीस कलमी कार्यक्रमात नाही. या देशात पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी चालू आहे. त्यावर रोस्टॅवप्रणीत पद्धतीने अमाप खर्च केला जातो आहे. ते सारे 'चलनी' नियोजन आहे. त्या भांडवलगुंतवणुकीतून प्रत्यक्षात राष्ट्रीय उत्पादन किती वाढले अगर वाढावे याचा विचार अगर मूल्यमापन नियोजनप्रक्रियेत होत नाही. या गोष्टी खऱ्या असल्या तरी नियोजनातीलच उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणखी वेगळा समांतर वीस कलमी कार्यक्रम कशासाठी ? गोर–गरिबांच्या उत्थानासाठी ! तोही चलनी उद्दिष्टे ठेवणारा. कागदी घोडे नाचविणारा. तथाकथित राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांना आपल्या तुंबड्या भरायला मदत करणारा. देशातील भ्रष्टाचार वाढविणारा. वीस कलमी कार्यक्रमावर निर्देशित खर्च केला नाही म्हणून राज्यसरकारांवर ठपका ठेवला जातो. प्रत्यक्षात जनतेच्या हाती काही पडो, वा न पडो खर्च झाला पाहिजे. कागदावर 'लक्ष्ये' भेदलेली दिसली पाहिजेत. मग नोकरशाहीचे फावणारच. त्यांचे, समाजसेवकांचे व राजकीय कार्यकर्त्यांचे, आमदार–खासदारांचे 'मेतकूट' जमून मग कुणालाही मदत दिली जाते. त्यात आपले सगे–सोयरे, गुंड, भिकारी, झोपडपट्टीवासी यांची सोय लावून तथाकथित 'नेतेपण' निर्माण केले जाते. ठावठिकाणा नसलेल्या माणसांच्या हातापायांचे आंगठे घेऊन सरकारी पैसा कार्यकर्त्यांच्या खिशात जातो. वीस कलमी कार्यक्रमासाठी वाढीव तरतूद याचा अर्थ या भ्रष्टाचाऱ्यांना अधिक वाव देणे. निवडणूक जिंकायची तर ही बांडगुळे पोसणे आलेच !

## उधळमाधळ–बेहिशेबी कर्जवाटप

ज्या देशात योजनाबद्ध विकासाची बांधिलकी १९५१ सालापासून मानली गेली, त्या देशात योजनाबाह्य खर्च सरकार आटोक्यात ठेवू शकत नाही. किंबहुना तोच जास्त होतो याला काय म्हणायचे ? १९८३-८४ सालच्या अर्थसंकल्पात तो २४७७३ कोटी होईल असा अंदाज होता. प्रत्यक्षात तो २६०६६ कोटी रुपये झाला. 'एशियाड' 'नाम' 'चोगम' या बडेजावी गोष्टी करायच्या तर हे सारे अटळच नाही का ? मग नोकरशाही बांधिल कंत्राटदार, मंत्री यांची चंगळच; पण हीही माणसे 'राखावी' लागतातच ! त्यांच्या बेकायदेशीर कृत्यांवर पांघरूण घालावे लागते ! लोकशाही राज्यव्यवस्थेत शासक पक्षाची लोकप्रियता टिकवायची तर सरकारी योजनाबाह्य खर्च वाढणारच. कर्मचारीवर्गाला संतुष्ट राखायचे तर त्यांना त्यांचे पगार, महागाईभत्ता वेळोवेळी वाढवून द्यायलाच हवेत. तोंडाने उत्पादकतेशी जोडलेला म्हटले तरी त्यांना 'बोनस'ची खिरापत वाटायलाच हवी. 'गरिबी हटाव' सरकार म्हटले की, तळागाळातल्या लोकांचे कल्याण करणे आलेच. त्यासाठी फक्त वीस कलमी कार्यक्रमाने भागत नाही. निराधार, अपंग, बेकारांना पैसे वाटून निभत नाही. त्यामुळे राष्ट्रीयीकृत बँकांना वेठीस धरून त्यांना अनेक ठिकाणी 'सामुदायिक कर्जे' द्यायला भाग पाडण्याचा पायंडा अर्थखाते सध्या पाडीत आहे. बँकांचा पैसा म्हणजे खरे तर ठेवीदारांचा पैसा. तो अशा तऱ्हेने नापतदार, बेकामांना, तारणाशिवाय खिरापतीप्रमाणे वाटला गेला तर कदाचित् सरकारपक्ष पुन्हा निवडून येईल; पण ही कर्जे वसूल होणेच दुरापास्त झाल्याने, बँका दिवाळखोर बनतील. त्यांनी ठेवीदारांचा विश्वासच गमावला तर उद्योगव्यापाराचा डोलारा ज्या पत–संस्थेवर आधारित असतो तीच खिळखिळी होऊन सारे राष्ट्रच आर्थिक आपत्तीच्या धोक्यात येईल, याचा कुणीच विचार करायला नको का ? कर्जदाराजवळ तारण


शुभेच्छा !

**श्री. आबा जोशी**

बाँड रायटर

इचलकरंजी

मागणे सोडोच, ओळख जरी मागितली तरी बँकअधिकाऱ्यांची ' राजस्थानच्या वाळवंटात बदली होईल ' अशी धमकी दिली जाऊ लागली तर बँकअधिकाऱ्यांनी तरी हा ' अपहार ' थांबवायचा कसा ?

राज्यसरकारे उधळमाधळ करतात. रिझर्व्ह बँकेकडून ओव्हर-ड्राफ्ट्स्ची वाटेल तेवढी उचल करतात. म्हणून त्यांना दोषी धरून या ओव्हरड्राफ्ट्सवर रिझर्व्ह बँकेने नियंत्रण घालावे असे म्हणणारे पंतप्रधान आणि अर्थमंत्री–अर्थसंकल्पात केंद्रीय मंत्र्यांच्या दौऱ्यावरील खर्चात वाढीव तरतूद करतात गतवर्षी केंद्रीय मंत्र्यांच्या दौऱ्यासाठी २ कोटी ४ लाख रुपये एवढी अंदाजपत्रकी तरतूद होती. यंदा ती वाढवून २ कोटी ९ लाख रुपये करण्यात आली आहे. गतवर्षी मंत्र्यांच्या दौऱ्याचा प्रत्यक्ष खर्च किती झाला हे मी पडताळून पाहिलेले नाही; पण हा एवढा खर्च म्हणजे प्रत्येक मंत्र्याने आपल्या पगाराच्या वीस पटींहून अधिक रक्कम आपल्या सरकारी (वा अन्य) दौऱ्यांवर उधळली असा याचा अर्थ होतो. पंतप्रधानांच्या सचिवालयाचा खर्चच पाऊण ते एक कोटी रुपये होतो. हा सगळा प्रकार डोके चक्रावणारा आहे.

वाढत्या महागाईबाबत अर्थमंत्र्यांनी चिंता व्यक्त केली आहे; पण कृती मात्र भाववाढ होईल अशी आहे. महागाई कमी व्हायची तर उत्पादन वाढायला हवे. शिवाय उत्पादनखर्चात घट व्हायला हवी. कोळसा, सिमेंट, पोलाद, लोखंड यांच्या निर्देशित किंमती सरकारनेच वाढविल्या आहेत. नव्या अर्थसंकल्पात क्रूड पेट्रोल, लोखंड, पोलादाच्या वस्तू यांवरील करांच्या अधिभारात सरसकट भरमसाठ वाढ सरकारने केली आहे. शिवाय वाहतुकीच्या चोंदी, विजेचा खंडित पुरवठा, शेडिंग यामुळे उत्पादनखर्च वाढत जाणारच. मग किंमती वाढणारच. पोलादावर जकात वाढवायची अन् विजेरी पंख्यावर घटवायची. यातून पंख्यांच्या किंमती कशा उतरणार ? शिवाय विविध वस्तूंच्या किंमती एकमेकांशी सहानुभूती राखून वाढतात. एका वस्तूची किंमत वाढली की, दुसरी तिचे अनुकरण करते. भाववाढीबाबत नुसती चिंता व्यक्त करून काय साधणार ?

अर्थमंत्र्यांच्या मते सहाव्या पंचवार्षिक योजनाकाळात राष्ट्रीय उत्पन्नवाढीचे प्रमाण सरासरीने साडेपाच ऐवजी ३ टक्केच राहील. औद्योगिक उत्पादनाच्या वाढीची सरासरी ३.९ टक्क्यांहून अधिक राहाणार नाही. गतवर्षीसुद्धा औद्योगिक उत्पादन ४.५ टक्क्यांनीच वाढले. अन्नधान्यांचे पीक भरघोस आले तरी महागाई वाढतच राहिली. मार्च १९८३ ते ऑक्टोबर १९८३ या काळात किंमत निर्देशांक ११.२ टक्क्यांनी वाढला. पुढल्या सहा महिन्यांत तो आणखीही वाढला असेल. भाववाढ कशी आणि कुणी कावूत आणायची ? मुळात तुटीचे अर्थसंकल्प. पैसा कमी पडला की, टांकसाळी आणि नाशिकची सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेस जोरात चालवायची ही सरकारी चलननीती ! त्यामुळे १९७९–८० पासून १९८४ च्या फेब्रुवारीपर्यंत चलनपुरवठ्यात अनुक्रमे १७.१%, १८.१%, ९.५%, ९,५% आणि १०.५% एवढी वाढ झाली. पुस्तकी पद्धतीनेही ही चलनवाढ भाववाढ बेलगाम वेगाने करण्यास पुरेशीच मानली जाते.

सर्वांत अधिक खटकली ती अर्थमंत्र्यांनी गतवर्षीच्या दुरुस्त अर्थसंकल्पातील तुटीची दिलेली आकडेवारी. गतवर्षीची अर्थसंकल्पीय तूट १५८६ कोटी रुपयांची होती. ती दुरुस्त अर्थसंकल्पात १६९५ कोटी एवढी झाल्याचे अर्थमंत्र्यांनी लोकसभेला सांगितले. जमा-खर्च मांडताना तेलकंपन्या आणि इतर राष्ट्रीयीकृत उद्योग यांचेकडे भांडवली खर्चासाठी असलेली २१०० कोटी रुपयांची रक्कम अर्थमंत्र्यांनी सरकारी खजिन्यात जमा का व कशी दाखविली न कळे ! शिवाय सहाव्या योजनांतर्गत प्रकल्पांसाठी खरेदी केलेली यंत्रसामग्री आणि कच्चा माल यांची किंमत ३१ मार्च पूर्वी आदा न करता ती जवळजवळ हजार-दीड हजार कोटी रुपयांची रक्कम १ एप्रिलनंतर म्हणजे पुढील आर्थिक वर्षात खर्च झाली असे दाखविण्याची अर्थमंत्र्यांनी केलेली चलाखी हीही अनाकलनीय ! त्यामुळे दुरुस्त अर्थसंकल्पातील तूट ही फक्त १६९५ रुपयेच नसून त्यात या २१०० कोटींची व हजार-दीड हजार कोटींची भर घातली तर ती ५ हजार कोटींवर आहे. एक तर सरकारी कंपन्यांचा निधी सरकार आपला कसे म्हणते ? बिले द्यायची थांबविले तरी पैसे द्यायला हवेतच ना ? पण निवडणुकीच्या साली एवढी तूट जनतेपुढे कशी मांडणार ? दुःख एवढ्याच गोष्टीचे की, असे हातचलाखीने आकडे सादर करणारे निरर्थक अर्थसंकल्प तरी सरकारने का सादर करावेत ? प्रा. प्रणव मुखर्जी यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञ अर्थमंत्र्यावर ही पाळी यावी आणि त्यांनी ही गोष्ट करावी याचीच खंत मनाला वाटते !

□






शरच्चंद्रांच्या सुरवातीच्या कादंबऱ्यांपैकी ही गाजलेली कादंबरी. 'दत्ता', 'विप्रदास' या कादंबऱ्यांसारखी हिची आकृती रेखीव नाही. 'श्रीकांत' प्रमाणे विस्तृत जीवन–दर्शनही इथे नाही; पण त्यांच्या कथाविश्वात वारंवार आढळणाऱ्या व्यक्ती व प्रश्न या कादंबरीतही आहेत.

# नीतिमूल्यांबद्दलच्या संभ्रमाचा नाटयमय अविष्कार

# चरित्रहीन

**प्रा. बा. वि. पोतदार**

**त्या** काळी स्त्रियांचे विवाह बालवयात होत व यौवनात पदार्पण करण्यापूर्वीच अनेक स्त्रिया विधवा होत. त्या काळी विधवा-विवाह रूढ नव्हता व घटस्फोट निषिद्ध होता. स्त्रियाच काय, पण शेकडा ऐंशी–नव्वद पुरुषही अशिक्षित होते. अशा समाजात स्त्रियांची कुचंबणा न झाली तरच नवल ! याखेरीज, नायक–नायिकांच्या सामाजिक व आर्थिक दर्जामधील भिन्नत्व इत्यादी नेहमीच्या कारणांमुळे विफल झालेल्या प्रीतीच्या वेदनेचे दर्शन शरदबाबूंच्या कथाविश्वात वारंवार घडते. तसेच नायिका विधवा वा 'पतिता' असल्यामुळे विफल झालेल्या प्रीतीच्या वेदनेने शरचंद्रांच्या कथाविश्वाचा मोठा भाग व्यापलेला आहे. या अडथळ्यामुळे प्रीतिभावनेला विशेष उत्कटता प्राप्त होते; पण हे प्रेम अगतिक असते. सामाजिक संकेत झुगारून देऊन, मीलन घडवून आणणे प्रेमिकांना शक्य होत नाही. प्रेमाचे उदात्तीकरण हा एकच मार्ग या प्रेमिकांना शक्य असतो. शरदबाबूंच्या नायिकांना हे उदात्तीकरण हळूहळू शक्य होत जाते. कारण भारतीय स्त्रियांना संयमाचे धडे लहानपणापासूनच मिळालेले असतात. 'चरित्रहीन' मधल्या सतीशसारख्या नायकांना हे उदात्तीकरण फार जड जाते, 'देवदास' सारख्याला तर ते अशक्यच होते. कारण सतीश किंवा देवदाससारखी उत्कट भावनेची माणसे प्रेमाकडे एक मूल्य म्हणून पाहताना दिसतात. नायकांना दुर्बल वा बेछूट बनविणारे प्रेम शरश्चंद्रांनी आपल्या बऱ्याच कादंबऱ्यात रंगविल्यामुळे शरदचंद्रांचे नायक दुबळे असतात असे म्हणण्याचा प्रघात पडला; परंतु शरदबाबूंचे बहुतेक दुबळे नायक त्यांच्या मानवतावादी मूल्यांमुळे व उत्कटतेमुळे एका वेगळ्या प्रकारे अतिशय समर्थ भासतात.

त्यांच्या सुरुवातीच्या कादंबऱ्यांपैकी 'चरित्रहीन' ही एक गाजलेली कादंबरी. 'दत्ता' (विजया), 'दैना पावना' (भैरवी), 'विप्रदास' या कादंबऱ्यांसारखी हिची आकृती रेखीव व प्रमाणबद्ध नाही. 'श्रीकांत' मध्ये जे विस्तृत जीवनदर्शन घडते ते येथे घडत नाही. तथापि शरदचंद्रांच्या कथाविश्वात वारंवार आढळणाऱ्या व्यक्ती व वारंवार मांडले जाणारे प्रश्न या सुरुवातीच्या कादंबरीतही आढळतात. या कादंबरीचा नायक सतीश हा एक देखणा, तगडा, दिलदार, गाण्या–बजावण्याचा शोक असलेला, श्रीमंत बापाचा पुत्र. अभ्यास चुकविणारा; परंतु कुणाच्याही संकटकाळी न बोलावताही धावून जाणारा. त्याचा मित्र उपेन्द्र. हा लहानपणापासून मोठा बुद्धिमान व अभ्यासू; परंतु खेळ, चर्चा, सभा यांमध्येही चमकणारा. म्हणूनच सतीशला त्याच्याबद्दल अपार प्रेम व आदर. उपेन्द्रालाही सतीशच्या गुणदोषांची पूर्ण जाणीव आहे, म्हणूनच धाकट्या भावाबद्दल असावी तशी आपुलकी व प्रेम त्याला सतीशबद्दल वाटते. 'या कलियुगात वास्तव्य करूनही, अन्याय, अत्याचार यासंबंधी ज्यांच्या कल्पना सत्ययुगातल्याप्रमाणे असतात आणि राग आल्यावर ज्यांना हिताहितज्ञान राहात नाही, अशा व्यक्तींपैकी एक,' असे सतीशचे वर्णन उपेन्द्रने केले आहे.

कलकत्याला होमिओपथीचे शिक्षण घेत असताना ज्या एका खाजगी 'मेस' मध्ये सतीश राहू लागतो त्या 'मेस' ची मोलकरीण सावित्री ही या कादंबरीची नायिका. ती तरुण, सुंदर, कष्टाळू व लाघवी स्वभावाची, शिवाय अत्यंत प्रामाणिक. त्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा पैसाआडकासुद्धा तिच्याकडेच असे. ती जणू या वसतिगृहाची कर्ती यजमानीणच ! ती एक सदाचारी ब्राह्मण विधवा असून, दैवगतीच्या फेऱ्यामुळे व स्वार्थी नातेवाइकांमुळे तिला मोलकरणीचे काम करणे भाग पडलेले होते. ही माहिती फक्त मेसचा म्हातारा नोकर बिहारी यालाच होती. तिच्या कष्टाळू व प्रेमळ स्वभावामुळे आणि ती पूजाअर्चा, उपासतापास करीत असल्याने, बिहारीला तिच्याबद्दल फार श्रद्धाभक्ति वाटते व तिला तो नेहमी 'आई' म्हणून हाक मारतो. सतीशच्या दिलदार स्वभावामुळे सतीशवरही बिहारीची मोठी भक्ति जडते.

## मलीनतेचा शिक्का

वसतिगृहाच्या मेंबर्सपैकी केवळ सतीशच तिला नावाने हाक मारी, तिची थट्टामस्करी करी, तिला मधूनमधून पैसे वा वस्तू भेट देई. दिवसभराचे काम करताना सावित्रीचे लक्षही सारखे सतीशकडे असे. खाण्यापिण्याच्या बाबतीत तो मोठा तज्ज्ञ असल्याने दररोज सकाळी एकवार ती त्याच्या खोलीत येऊन स्वयंपाकासंबंधी त्याच्याकडून हुकूम घेऊन जाई. तो आळशीपणाने कॉलेज बुडवू लागला म्हणजे लाडीगोडीने ती त्याला कॉलेजात पाठवी, तो फार खर्च करू लागला तर त्याच्या ट्रंकेला कुलूप लावून ती चावी आपल्या पदराला बांधून ठेवी. बिपिनबाबूसारख्या श्रीमंत व चैनी कलकत्तेवाल्या मित्रांच्या संगतीत त्याने वेळ घालवू नये असे तिला वाटे, तर कधी भडकत्या डोक्याने तो उगीचच बाहेर भटकणार आहे असे वाटले तर ती खुशाल त्याच्या खोलीला बाहेरून कडी घालून निघून जाई. थोडक्यात म्हणजे तिचे सतीशवर प्रेम होते.

त्यालाही ते जाणवत होते; परंतु तिच्या व स्वतःच्याही मनाची अजून त्याला पारख व्हावयाची होती. सावित्री खरोखर कशी आहे, आपल्या प्रेमास योग्य आहे की नाही, असा संदेह न कळत त्याच्या मनाला सुरुवातीला तरी पडताना दिसतो. कारण अखेर ती एक मोलकरीण होती. आपण 'मेस' मधील एक मोलकरीण आहोत, 'पतिता' आहोत, सतीशच्या प्रेमाला आपण योग्य नाही, अशी भूमिका तिनेही मुद्दाम व वारंवार घेतलेली आहे. सतीशशी विवाह होण्याचा संभव तिला मुळीच दिसत नसल्याने, ती मुद्दाम स्वतःकडे कमीपणा घेऊन आपण विधवा आहोत व आपले चारित्र्य शुद्ध नाही याची जाणीव त्याला देऊ पाहाते; परंतु तिची खरी किंमत सतीशला जो जो कळू लागते तो तो तिच्या प्रेमाने तो झपाटल्यासारखा होतो. तिलाही आपल्या स्वार्थत्यागाच्या व प्रेमाच्या उदात्तीकरणाच्या भूमिकेप्रत येताना केवढे कष्ट पडतात, सतीशचा मोह बाजूला सारताना तिला स्वतःशी किती झगडावे लागते, तिच्या मनावर केवढे दडपण येते याचे फार मर्मग्राही व करुणरम्य चित्रण शरदबाबूंनी त्यातील सर्व बारकाव्यांसह कुशलतेने केलेले आहे.

तो तरुण रक्ताचा व उतावीळ स्वभावाचा आहे हे माहीत असूनही त्याच्या अवतीभवती राहण्याचा, त्याच्याशी थट्टामस्करी करण्याचा, सूचकतेने आपले प्रेम व्यक्त करण्याचा मोह सावित्रीला टाळता येत नाही. एक दिवस न राहवून तिच्या पदराचे टोक तो ओढून धरतो, त्या वेळी अर्थात ती त्याचा निषेधच करते; परंतु त्याला शरमिंदा झालेला पाहून ती खिलाडूपणाने, विशेष काही झालेले नाही असे मानून, पूर्ववत वागते. मेसमधील मोलकरणीशी लोक असेच वागतात; पण त्याने वागू नये अशी तिची भूमिका. ती केवळ एक मोलकरीण आहे, कमअस्सल आहे, पतिता आहे, ही तिची भूमिका सतीशला पटत नाही. तो म्हणतो, 'ही गोष्ट काही खरी नाही. प्रत्यक्ष गंगेच्या प्रवाहात उभे राहून जरी तू हे बोललीस तरी माझा त्यावर विश्वास बसणार नाही. कम-अस्सल स्त्रीप्रमाणं तुझं बोलणं-चालणं, व्यवहार नाही, आकार-प्राकार नाही !'

म्हणजेच, ती विधवा आहे ही एक गोष्ट सोडली तर ती पतित नसल्याने व ब्राह्मण असल्याने आपल्या प्रेमास ती योग्य आहे असे तो मनोमन समजतो आणि तिच्या प्रेमामुळे बेछूट वृत्तीचा हा माणूस सुधारण्याची आशा निर्माण होते; परतु तेवढ्यात, हृदयात हळुवारपणे जपलेल्या प्रेमाच्या या भावनेवर मलीनतेचा शिक्का आजूबाजूच्या समाजाकडून मारला जातो. त्या संध्याकाळी वरील-प्रमाणे सावित्रीचे व सतीशचे बोलणे त्याच्या खोलीत चालू असताना मैफलीला बोलवण्यासाठी बिपिनचे टोळके अचानक त्याच्या खोलीवर येते. घाबरल्यामुळे व त्यांना टाळण्यासाठी सतीश फुंकर घालून दिवा विझवतो व झोपल्याचे सोंग करतो; पण हे मित्र चिवटपणे काडी ओढून त्याच्या खोलीत पाहातात व तेथे त्यांना जमिनीवर सावित्री बसलेली दिसते. हास्यकल्लोळाने घर डोक्यावर घेत, सतीशला काबीज करून ते मैफलीला ओढून घेऊन जातात. तिच्या पदराचे टोक धरून ठेवण्याची चूक सतीशकडून घडल्यानंतरही, सावित्रीने आपल्या खिलाडूपणाने व निर्मलतेने, जो संबंध मलिन होऊ दिला नव्हता, त्यावर मलीनतेचा शिक्का अशा तऱ्हेने त्या दिवशी दारुड्या मित्रांकडून मारला जातो. जे इतके दिवस दोघांच्या मनात होते; परंतु अस्फुट व पवित्र अवस्थेत होते ते त्यांचे नाते ओंगळ स्वरूपात आता इतरांकडून जोडले जाते. सावित्री स्वतः कितीही चांगली असली, पवित्र असली, तरी या दोघांच्या नात्याकडे व संबंधांकडे कोणत्या दृष्टिकोनातून त्या वेळचा समाज पाहू शकला असता हेही या प्रकारे स्पष्ट होते.

मित्रांबरोबर रात्री बैठकीला गेलेला सतीश बेहोष स्थितीत परत आल्यावर सावित्रीने त्याला आधार देऊन वर नेऊन झोपविणे, पुन्हा दारू न पिण्याबद्दल त्याच्याकडून वचन घेणे, पूजा-आन्हिक झाल्याशिवाय तो तोंडात पाणीसुद्धा घालीत नसे हे लक्षात घेऊन दुसऱ्या दिवशी सकाळी त्याला आग्रहाने पूजेला बसविणे, या सर्व गोष्टीत तिचे त्याच्यावरचे प्रेम व जिव्हाळा अगदी स्पष्ट दिसून येतो; पण झालेल्या गोष्टीची चर्चा निघते तेव्हा मात्र तिचा अलिप्तपणा त्याला धक्का देऊन जातो. त्यांचा जो संबंध मित्रांकडून जोडला गेला त्याची वाच्यता होऊन त्या दोघांची-विशेषतः सतीशची-बेअब्रू होण्याचा संभव होता. त्याबाबत काय करावे हा प्रश्न निघताच सावित्री जणु सहजपणे सुचविते की, त्याने विपिनबाबूंची ही 'मेस' सोडून जावे. ती म्हणते, 'माझ्याबद्दल मी विचार केलेला नाही. या मेसमधल्या बाबूंनी जर मला ठेवून घेतले नाही तर मी दुसऱ्या घरी नोकरी पाहीन, तिथे कष्ट करीन, तिथे पोटाला दोन मुठी मिळेलच!'

त्याच्याशी अशा तऱ्हेने कायमचा संबंध तुटला तर तिला जणू वाईट वाटणार नव्हते. सावित्रीच्या उत्तराने त्याला अपमानित झाल्यासारखें वाटते. त्याच्याविषयी ओढ असतानाही ती नसल्यासारखे दाखवीत होती, मग त्याच्या सेवेबद्दलचा तिचा जिव्हाळा कशासाठी ? आपले प्रेम न देता ती त्याची मोलकरीण म्हणून नुसती दुरून सेवा करू इच्छित होती काय? सायंकाळी ती त्याला खाण्यापिण्याबाबत प्रेमळ आग्रह करणार होती. त्याच्या खोलीत येऊन दिवाबत्ती लावून जाणार होती. त्याला हवे-नको पाहणार होती; पण या सर्व गोष्टींचा शेवट कुठे होता ? अधिक संबंध तिला का नको होता ? त्याच्यावर तिचा विश्वास नव्हता काय ? संध्याकाळी ती मेसमध्ये येण्यापूर्वीच तो मुद्दाम बाहेर पडतो व विमनस्कपणे हिंडत राहातो. त्याच्या भल्यासाठीच त्याच्या जीवनातून दूर होण्याचा सावित्रीने केलेला निश्चय तो समजू शकत नाही.

म्हणूनच की काय, लगेचच त्याची व सावित्रीची भेट पुन्हा एकदा शरदबाबूंनी घडवलेली आहे व दूरत्वाचा निर्णय घेताना सावित्रीला खरोखर किती कष्ट पडले याचे दर्शन त्याला व आपल्याला घडविले आहे. सावित्रीचा व सतीशचा संबंध यापुढे राहिला असता तर त्याचे स्वरूप इतरांना कसे दिसले असते याचेही दर्शन मोक्षदेच्या प्रतिक्रियांद्वारे त्यांनी घडविले आहे. एक जुनी म्हातारी मोलकरीण मोक्षदा सतीशला त्याच सायंकाळी रस्त्यात भेटते व एक पत्र वाचून घेण्यासाठी त्याला आपल्या खोलीवर घेऊन जाते; स्वतःची खोली अस्वच्छ असल्याने त्याला शेजारच्या सावित्रीच्या खोलीत बसविते. सावित्री कामावरून परतल्यावर त्याला आपल्या खोलीत पाहून चकित होते; परंतु त्याची सेवा करण्याची संधी मिळाल्यामुळे प्रमुदितही होते. त्यांची पूर्वी ओळख होती हे मोक्षदेला माहीत नव्हते; परंतु ते कळल्यावर ती हसत हसत तेथून निघून जाते. म्हणजेच बिपिनच्या टोळक्याने सतीश-सावित्रीचा जो संबंध गृहीत धरला होता तो मोक्षदाही गृहीत धरून चालते. अर्थात तिच्या दृष्टीने यात अस्वाभाविक काही नव्हते. तरुणपणी दासी-मोलकरणी अशा वागल्या नाहीत तर म्हातारपणी त्यांनी जगायचे कसे ? परंतु सावित्रीला अशा तऱ्हेचा संबंध अमान्य असतो व सतीशशी विवाह तर शक्य नसतो. ज्यांच्यावर आपले प्रेम आहे तो पुरुष आदरणीय व सत्प्रवृत्त राहावा ही स्त्रीहृदयाची ओढ सावित्रीतही आहे. सावित्रीची संमती असती तर सतीशने समाजाची पर्वा न करता तिच्याशी विवाह करण्यास मुळीच मागेपुढे पाहिले नसते; परंतु इतकी बंडखोरी सावित्रीत मुळातच नाही. प्रेमाचे उदात्तीकरण हा एकच मार्ग तिला मोकळा असतो व त्याकडे शेवटी ती वळलेलीही आहे; परंतु त्यापूर्वी सतीशच्या व स्वतःच्या अपार दुःखाला ती कारणीभूत होते. कारण सतीशच्या जीवनातून दूर होण्याची भूमिका घेणे तिला फार अवघड जाते.

त्यामुळेच सावित्री आपल्याला प्रेमाने जवळ येऊ देते व लगेच दूर का लोटते हे सरळ मनाच्या सतीशला समजू शकत नाही. सतीशचे आपल्या खोलीत स्वागत करीत असताना सावित्रीच्या मनाची झालेली कुतरओढ, मोह व त्याग यातील संघर्ष शरदबाबूंनी फार कौशल्याने हाताळला आहे व सतीशच्या अपरिपक्व प्रतिक्रिया दर्शवून सावित्रीच्या अगतिक वेदनेत अपार कारुण्य व माधुर्य ओतले आहे. सावित्री त्याचे स्वागत करते, त्याला नेहमीप्रमाणे संध्याकाळच्या आन्हिकाची तयारी करून देते; धोतराऐवजी त्याला आपले नवे पांढरे पातळ नेसायला देते, त्याला बाजारचे खाणे चालत नाही हे माहीत असल्याने स्वतः रांधून त्याला खाऊ घालते; परंतु मध्येच अस्वस्थमनस्क होऊन ती दूर बसून राहाते. मग मोक्षदेने टोचणी लावल्यावर ती त्याला नीटपणे वाढतेही; परंतु हे सर्व करीत असताना, दोघांच्या या भावनांचे पुढे काय होणार हा विचार तिला अस्वस्थ करीत राहातो, तर तिच्या दूरत्वामुळे सतीश चिडून जातो. खाणे झाल्यावर, आदल्या दिवशी त्याला गाण्याच्या बैठकीस गेल्यामुळे जागरण झालेले होते हे तिच्या ध्यानात येते व सहज प्रेरणेने ती आपल्या अंथरुणावर झोपण्याबाबत सुचविते. ती स्वतः शेजारच्या मोक्षदेच्या खोलीत झोपली असती; पण दुसऱ्याच क्षणी स्वतःला सावरून ती मोहाचा क्षण टाळण्यासाठी त्याला घरी जाण्याचा आग्रह करू लागते. स्वतःच्या पदराने त्याचे पाय पुसून ती त्यावर स्वतःच्या हाताने बूट चढवू लागते. यात तिचा आग्रह, आर्जवीपणा, सेवाभाव, प्रेम, शेवटचा निरोप घेण्याचा निर्णय या सर्व गोष्टी शरदबाबूंनी सूचित केलेल्या आहेत.

परंतु सतीशला या अबोल आग्रहाचा राग येतो. त्याला एकदाच काय तो सोक्षमोक्ष लावून टाकायचा असतो. प्रथम राहाण्याचा आग्रह करणारी सावित्री आता जाण्याचा आग्रह का करू लागते हे त्याला नीटपणे उमगत नाही व त्याला मोठा राग येतो. तो उतावीळ मनाचा असल्याचे व शिवाय स्वतःच्याही संयमशक्तीबद्दल तिला पुरेसा विश्वास न वाटल्याने, ती त्याला घालवू पाहात होती, हे त्याला उमगत नाही, कळले तरी वळत नाही. कारण तिच्यासाठी कोणतेही दिव्य करण्याची त्याच्या मनाची तयारी होती. त्यामुळे पुन्हा तिने पतित व हलक्या स्त्रीची भूमिका घेतल्यावर चिडून तो तिच्यावर शिंतोडे उडवतो. मनावर पडलेल्या असह्य ताणामुळे ती शेवटी मूर्च्छित होते. शरदबाबूंच्या कित्येक नायिका मोहाच्या क्षणी विलक्षण संयम दाखवू शकतात. अर्थात अनावर भावनेच्या प्रिय पुरुषाला दूर लोटल्यास त्याचा अधःपात कसा थांबेल याचे उत्तर त्यांच्याकडे नसते. त्यांची स्वतःची त्यागवृत्ती व संयम यांना प्रिय असलेल्या पुरुषाजवळही असावा अशी त्यांची अपेक्षा असते; पण तो नसल्यास त्यांना हे अस्वाभाविक वाटत नाही.

शरदबाबूंच्या विश्वात अशा तरुण पतितांचा उदारहृदयी पुरुषांशी वारंवार संबंध येतो. थट्टामस्करी, परिहास यातून हृदये लपवूनही उघड केली जातात. सतीशशी विवाह सावित्रीच्या मते अशक्य होता. अशा परिस्थितीत त्याच्या अनावर वृत्तीमुळे त्याच्याकडून काही अतिक्रमण झाल्यास त्याच्याविषयीच्या आपल्या श्रद्धेला तडा जाऊ शकेल ही जाणीव असूनही सावित्री त्याच्याशी संबंध आल्यावर आपले हृदय झाकलेले ठेवू शकत नाही. थट्टेच्या आवरणाखाली

**शरदबाबूंच्या विश्वात तरुण पतितांचा उदारहृदयी पुरुषांशी वारंवार संबंध येतो**

त्याच्याशी 'फ्लर्टिंग' करण्याचे काम सुरुवातीला तरी होतच राहाते. कारण तिला त्याच्या मनाचा अंदाज घ्यावयाचा असतो. त्याचे आपल्यावर खरोखरच प्रेम आहे काय, असल्यास त्या प्रेमाची जात कोणती, त्याचे चारित्र्य खरोखरच कशा प्रकारचे आहे याचा अंदाज घ्यावयाचा असतो. तो घेतल्यावर, खऱ्या प्रेमभावनेचा स्पर्श आपल्या जीवनाला झाला या जाणिवेने ती सुरुवातीला सुखावून जाते; परंतु या प्रेमाला काही निश्चित शेवट नसल्याने आपल्या प्रेमाच्या उदात्तीकरणाचा मार्ग ती स्वीकारते, तिला स्वीकारावाच लागतो!

### कशामुळं येवढं सुख, येवढं दुःख ?

एक दिवस ती त्याच्या जीवनातून खरोखरच नाहीशी होते. ती बिपिनबाबूंकडे गेली असा सतीशचा गैरसमज होतो व त्याला मोठा राग येतो, तिने विश्वासघात केल्यासारखे वाटते; पण थोडा विचार केल्यावर त्याच्या लक्षात येते की, तिने त्याला कसलाच विश्वास दिलेला नव्हता, कसलेच वचन दिलेले नव्हते. एक दिवस गंगेकाठी तो विमनस्क स्थितीत बसलेला असताना, 'तिथे बुद्धीच्या तेजाने चमकणारे पवित्र, स्निग्ध मुखमंडल, संयमामुळे गोड वाटणारा तिचा परिहास, तिची अकृत्रिम सेवा या गोष्टी आठवून, प्रेमभावनेचा एक वेगळाच प्रत्यय त्याला येतो आणि त्याच्या नेत्रांवाटे अश्रू ओघळू लागतात. अश्रू इतके मधुर असतात, त्यामध्ये इतका रस भरलेला असतो, हा अनुभव त्याला या परम दुःखाच्या क्षणी प्रथमच आला आणि त्याला विलक्षण समाधान वाटले आणि जिच्यामुळे इतके प्रचंड सुख साऱ्या आयुष्यात त्याला आज प्रथमच मिळाले, तिला उद्देशून दोन्ही हात जोडून त्याने भक्तिभावाने प्रणाम केला.'

निरपेक्ष प्रेमाचा पहिला धडा अशा तऱ्हेने त्याच्याकडून गिरविला जातो; परंतु प्रेमभावनेचे उदात्तीकरण करून त्याने सावित्रीशिवाय जीवन कंठायचे तर कुणाच्या तरी आधाराने त्याला त्या अवस्थेप्रत नेणे प्राप्त होते. कारण त्याची वृत्ती श्रीकांत व विप्रदासप्रमाणे निःसंग, चिंतनशील नव्हती. जिच्यावर त्याचे प्रेम आहे अशा स्त्रीच्या आधाराशिवाय तो जगू शकला नसता. यासाठी शरदबाबूंनी उपेंद्रचा मित्र ज्योतिष याची बहीण सरोजिनी हिचे प्रेम सतीशवर जडल्याचे दाखविले आहे व उपेंद्राची अध्यात्मिक उंची कथानकाच्या शेवटी बरीच वाढवून, त्याच्या आज्ञेप्रमाणे सतीशला आपल्या प्रेमाचे उदात्तीकरण करण्यास भाग पडलेले आहे.

सावित्री त्याच्या जीवनातून दूर झाल्यावर व तिच्याबद्दलच्या अफवेमुळे सरोजिनीचाही आधार काही काळ तुटतो तेव्हा सतीश आपल्या गावी जाऊन थाकोबाबा नामक एका भोंदू साधूच्या सहवासात गांजाच्या नशेत स्वतःचे दुःख बुडवून राहातो व अतिशय आजारी पडतो. एक सावित्रीच त्याला वळणावर आणू शकेल या जाणिवेने बिहारी कुठून तरी सावित्रीला शोधून आणतो. क्षयाने खंगत जाणारा उपेंद्रही तेथे मित्रासाठी उपस्थित होतो. सरोजिनीशी सतीशने विवाह करावा व सावित्रीने आपल्या उरलेल्या आयुष्यात आपली सेवा करावी असा प्रस्ताव उपेंद्रकडून मांडला जातो व सावित्री त्याला संमति देते. सतीशला ती म्हणते, 'तुम्ही म्हणाल, सत्य असो, मिथ्या असो, मला पाहिजेस एक तू; पण मला तर तसं बोलता येत नाही ना? समाजाला माझी जरूर नाही, मला तो मानीत नाही, हे मला ठाऊक आहे; पण मला तर समाजाची जरूर आहे अन् मी त्याला मानतेही. मला माहीत आहे की, श्रद्धेच्या आधाराशिवाय प्रेम उभं राहू शकत नाही. समाज ज्या स्त्रीला आपल्या सन्मानाचं आसन देत नाही तिला आपल्या अंगातल्या शक्तीच्या बळावर त्या आसनावर प्रतिष्ठित करणं कुणाही पतीला शक्य नाही. ही असाध्य गोष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करू नका बाबूजी!' सतीश या वेळी अतिशय आजारी होता. त्याने दोन्ही हातांनी सावित्रीचे हात घट्ट पकडून धरले आणि अतिशय आवेगाने तो म्हणाला, 'सावित्री, या साऱ्या गोष्टी ऐकून घेण्याइतका आज माझ्या अंगी धीर नाही, समजून घ्यायची शक्ती नाही. आज मला स्पर्श करून तू एवढीच एक गोष्ट मला सरळ सांग की, माझ्यावर तुझं प्रेम आहे की नाही?' त्याची सर्व इंद्रिये, सर्व शरीरच उत्तर ऐकण्यासाठी उत्कंठेने वाट पाहात राहिले. एक दृष्टीने तो सावित्रीच्या मुखाकडे पाहात राहिला. त्या व्यथित उत्कंठित नेत्रयुगलाकडे दृष्टी जाताच सावित्रीला अगदी भडभडून आले आणि तिच्या डोळ्यांतून आसवे गळू लागली. क्षणभराने ती म्हणाली, 'प्रेम आहे की नाही? नसतं तर कोणत्या बळामुळं तुमच्यावर माझा इतका जोर? कशामुळं मला इतकं सुख आणि इतकं प्रचंड दुःख? बाबूजी, बाबूजी! म्हणूनच ना मी तुम्हाला इतकं दुःख दिलं? पण काही केल्या माझा हा देह मी तुम्हाला देऊ शकले नाही!'

उपेंद्राने सावित्रीला म्हटले आहे, 'तुझ्याशिवाय माझी जबाबदारी घ्यायला मला कुणी नाही अन् ज्या दुखण्यामुळं मी आजारी आहे त्यामुळं कुणालाही जवळ बोलवायला मला धाडस होत नाही अन् होणं योग्यही नाही. जी माणसं केवळ दुसऱ्यासाठीच जगात जगत असतात अशा तुझ्यासारख्या बहिणीवर मात्र माझी जबाबदारी सोपवायला मला कसला किंतु वाटत नाही. येशील ना ताई माझ्याबरोबर? सतीशला सोडून जाताना तुला कष्ट होतील. होईनात झाले तर. त्यापेक्षाही केवढे तरी प्रचंड दुःख परमेश्वर मनुष्याला सहन करायला लावून त्याला खऱ्या माणुसकीप्रत पोहोचवीत असतो!' उपेंद्रची आज्ञा मोडणे सावित्रीला व सतीशलाही शक्य होत नाही. आपली प्रिय पत्नी सुरबाला हिला क्षयाचा विकार झाल्यानंतर त्याने तिच्या केलेल्या शुश्रूषेमुळे क्षयाचा विकार त्यालाही जडलेला असतो. स्वतःची दारुण व्यथा सहज रीतीने पेलून हा माणूस अजूनही


## उदय एजन्सी

व्ही बेल्टस्, फॅन बेल्टस्, कन्व्हेयर बेल्टस्
आणि इतर खास बेल्टस्
आणि कमिशन एजंट

१० । ४५०, फुले रोड,
इचलकरंजी ४१६ ११५

दुसऱ्याचे व्यवहार यथाशक्तो सोडवीत होता. सुखदुःख त्याला सह्य होत होते ते कोणत्या शक्तीच्या बळावर ?

उपेंद्राचा एक मित्र ज्योतिषबाबू व त्याची बहीण सरोजिनी, उपेंद्राचा दुसरा एक मित्र हाराणबाबू व त्याची पत्नी किरणमयी, या पात्रांद्वारे शरदबाबूंनी कथानकाचे अन्य धागे गुंफलेले आहेत. हाराणची व उपेंद्राची गेल्या कित्येक वर्षांत भेट झालेली नव्हती; परंतु हाराण आता मृत्युशय्येवर असल्याने व उपेंद्र वकील असल्याने तो उपेन्द्राला बोलावून घेतो. हारणची पत्नी किरणमयी ही अत्यंत सुंदर, बुद्धिमान व विद्वान असली तरी तिला कोणत्याही प्रकारच्या मायाममतेची किंवा श्रद्धा–भक्तीची अपेक्षा नाही. कारण आता मृत्युशयेवर असलेला तिचा दरिद्री पति हाराणबाबू हा एक अत्यंत शुष्क व नीरस असा पंडित होता आणि तिची सासू अधीरमयी ही एक खाष्ट आणि अडाणी बाई होती. संसारातील माधुर्य म्हणजे काय याची जाणीवच किरणमयीला कधी झाली नाही. उलट हाराणला तपासणारा तरुण डॉक्टर या सुंदर युवतीशी जे चाळे करी त्याकडे अतीव दारिद्र्यामुळे तिची सासू दुर्लक्षच करी. जीवनाच्या या कटु अनुभवामुळे किरणमयी अधिकाधिक अश्रद्ध होत गेलेली आहे.

असामान्य सौंदर्य व विलक्षण प्रखर बुद्धिमत्ता असलेली एखाद्या सुंदर, मोहविणाऱ्या परंतु धगधगणाऱ्या अग्निज्वालेची आठवण करून देणारी किरणमयी ही एक पतित विधवा आहे. हाराणच्या मृत्यूनंतर तिला व तिच्या सासूला सोबत म्हणून दिवाकरने कलकत्त्यास त्यांच्या घरी राहावे असा प्रस्ताव होतो. दिवाकर हा बी. ए. च्या वर्षाला असलेला, आतापर्यंत उपेंद्राच्या गावी त्याच्या घरी राहून शिकलेला एक आश्रित तरुण. किरणमयीच्या घरी तरुण दिवाकरला ठेवण्यात धोका असला तरी उपेंद्राला असा विश्वास वाटतो की, किरणमयीचे त्याच्यावर स्वतःचे प्रेम जडले असल्याने त्याच्या धाकट्या भावासारखा जो दिवाकर त्याला किरणमयीकडून धोका पोहोचणार नाही; परंतु दिवाकरबरोबरही ती फ्लर्टिंग करू लागते.

कुठल्या तरी मुद्द्यावर दिवाकरबरोबर व क्वचित उपेंद्रबरोबरही चर्चा करून त्यांना आपल्या ज्ञानाने व विद्वत्तेने दिपवून सोडण्याचा प्रयत्न किरणमयी करीत राहाते. त्या निमित्ताने वाचकालाही तिच्या प्रखर बुद्धीची, स्वतंत्र विचारांची व तिच्या जीवितविषयक दृष्टिकोणाची कल्पना येते. ईश्वर, आत्मा यांच्या अस्तित्वावर तिचा विश्वास नव्हता. जे अज्ञेय आहे असे आपण म्हणतो त्याच्यामागे लागावेच का ? जी वस्तू बुद्धीच्या टप्प्याबाहेर आहे तिच्याबद्दल निर्णय कसा करता येईल ? आत्म्याचे अस्तित्व मानून स्वतःला अमर करू पाहाणे हा माणसाच्या अहंकाराचाच एक प्रकार तिच्या मते होता. वेद व उपनिषदे यात लिहिले आहे तेच सत्य, असे मानण्याची तिच्या मनाची तयारी नव्हती. माणसाने आपल्या बुद्धीच्या निकषावर घासून जे जे सत्य असेल ते ते मान्य करावे असे तिला वाटे. धर्म, शास्त्र विधिनिषेध यांची जुलूम–जबरदस्ती माणसावर का असावी असा प्रश्न ती उपस्थित करते, तेव्हा दिवाकर एकदा सुचवितो की, माणसाच्या कल्याणासाठीच ही व्यवस्था असावी; परंतु किरणमयीचे म्हणणे असे की, आपले कल्याण कोणत्या गोष्टीत आहे हे ठरविण्याचा अधिकार व्यक्तीला का नसावा ? उपेंद्रला तिने काढलेल्या हाल–अपेष्टांची व तिच्या कुचंबणेची कल्पना असल्याने त्याला व विशेषतः सतीशला तिच्याबद्दल सहानुभूती वाटते. किंचित उपेन्द्र तिला असेही सुचवतो की, तिने उपस्थित केलेल्या मुद्द्यांना सुरबालेची–त्याच्या पत्नीची–श्रद्धाच उत्तर देऊ शकली असती. सुरबालेबद्दल मनात तीव्र मत्सर निर्माण झाल्याने किरणमयी मुद्दाम तिला भेटायला जाते. आपल्या कठोर बुद्धिवादाने सुरबालेच्या श्रद्धेला अल्पावकाशात चूर्ण–विचूर्ण करून तिची श्रद्धा व तिचे व्यक्तिमत्त्व धूलिकणाप्रमाणे इतस्ततः उधळून टाकावे अशी दुर्दमनीय आकांक्षा किरणमयीच्या मनात उद्भवलेली असते; पण तिथे गेल्यावर किरणमयीला दिसून येते की, सुरबाला ही विद्वत्तापूर्ण चर्चा करणारी व्यक्तीच नव्हती. ती निष्ठावंत हिंदू गृहिणीचा एक उत्कृष्ट नमुना होती. तिच्याकडे गेल्यावर किरणमयी स्तब्ध पुतळ्याप्रमाणे सुरबालेकडे नुसती पाहात राहाते व तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागतात. उपेंद्रला या गोष्टीचा फार विस्मय वाटतो. सात्त्विक प्रेमाने व श्रद्धेने परिपूर्ण असे सुरबालेचे हृदय पाहून, स्वतःच्या दरिद्री हृदयाची जाणीव होऊन किरणमयी रडत होती हे त्या वेळी त्याच्या लक्षात येत नाही.

कलकत्त्याला किरणमयीकडे येऊन राहिल्यानंतर दिवाकरचा वेळ फार मजेत जातो. गावी उपेन्द्रच्या मोठ्या घरात तो आश्रिताप्रमाणे संकोचून राहिला होता. कलकत्त्याला आल्यावर त्याचे क्षितिज विस्तारते. अघोरमयी व किरणमयी दोघीही त्याच्यावर वात्सल्याचा वर्षाव करतात. लेखन-वाचनाची त्याला आवड असल्याने तो साहित्यचर्चेत भाग घेऊ लागतो. त्याचे मित्र एक मासिक काढतात, त्यांना तो सहकार्य देतो. त्याची एक गोष्टही छापून येते. या निमित्ताने साहित्य, सौंदर्य, प्रेम याविषयी त्याच्या व किरणमयीच्या वारंवार चर्चा होऊ लागतात. या बाबतीत तिचा उपदेश तसे म्हटले तर योग्य असे, मते परखड असत; परंतु त्यात बंडखोरीची झाक असे व दिवाकरशी होणाऱ्या वर्तनात थट्टेच्या आवरणाखाली तिचे 'फ्लर्टिंग' चालू असे. नकळत दिवाकरचा बुद्धिभेद करून ती त्यालाही बंडखोर करू पाहात होती. उदाहरणार्थ, स्वतःला अनुभव असल्याशिवाय माणसाने लिहू नये हे तिचे मत चूक नव्हते; पण ती असेही सुचवीत



होती की, दिवाकरने प्रेमाचा आधी अनुभव घ्यावा व मग त्यावर लिहावे आणि प्रेम म्हणजे काय हे त्याला शिकवायला ती समोर नव्हती काय? याही बाबतीत ती त्याची गुरु होऊ शकली नसती का? विनोदाच्या आवरणाखाली ती स्वतःच्या असामान्य सौंदर्याचा व तारुण्याचा आणि त्याच्याबद्दलच्या आपुलकीचाही वारंवार उल्लेख करी. किंबहुना प्रेम, सौंदर्य, पाप या विषयांवर बी. ए. च्या वर्गात शिकणाऱ्या या कोवळ्या तरुणाबरोबर वारंवार चर्चा करणे हेच त्याला एक प्रकारचे आव्हान होते. परखड मते मांडण्याच्या आविर्भावात ती त्याच्या वासनेला, सौंदर्यलोलुपतेला, स्त्रीविषयक कुतूहलाला डिवचून जागे करीत होती.

## किरणमयीची विटंबना

अर्थात ही बुद्धिवादी व नास्तिक मते खरोखरच तिची होती. तो केवळ एक देखावा नव्हता, नाटक नव्हते. ज्याच्या जोरावर मनःसंयम करता येईल, मंगल व अमंगल यातील भेद कळून येईल, असे कोणतेच मूल्य किरणमयीजवळ नव्हते. ऐहिक सुख, व्यक्तीचे व समष्टीचे सुख, या एकाच मापाने शेवटी जीवनातल्या सर्व गोष्टी मोजाव्या लागतात असे तिच्या पतीने (तो तिचा गुरुही होता), वारंवार म्हटले होते; परंतु सुख म्हणजे काय हे त्यालाही सांगता आलेले नव्हते. दिवाकरला ती सांगते की स्त्री–पुरुषांमधील प्रेमात 'स्वर्गीय' असे काहीच नाही. सृजनासाठी निसर्गाने निर्माण केलेले ते एक साधन! प्रकृतीचा एक खेळ. म्हणूनच जगात पाप हे राहाणारच. ते समजून घेऊन त्याला उदार मनाने क्षमा करणे हेच शहाण्या माणसाचे काम.

उपेंद्रवर किरणमयीचे प्रेम जडलेले असते; परंतु त्याचे प्रेम तिला मिळण्यासारखे नसल्याने ती एक दिवस दिवाकरबरोबर आराकानकडे पळून जाते. आपल्या प्रेमाला तुच्छ लेखणाऱ्या उपेंद्रवर तिला जणू सूड उगवायचा असतो; परंतु प्रवासात बोटीवरच्या वास्तव्यात तिला कळून येते की, उपेंद्रवर दिवाकरची निःसीम भक्ती होती व तिच्याबद्दल दिवाकरच्या मनावर तिरस्कारच होता. तथापि एक दिवस, बळी जाणाऱ्या पशुप्रमाणे अगतिकतेने दिवाकर तिला आपले शरीर अर्पण करतो. आराकानला गेल्यावर दिवाकरला लाकूड कापण्याच्या एका कारखान्यात काम मिळते. कामिनी घरवालीच्या चाळीत लाकडी फळ्यांच्या एका खोलीत ती दोघे राहू लागतात. कामिनी अस्पृश्य जातीतली एक वेश्या होती. एका कैवर्त जातीच्या व्यापाऱ्याने पूर्वी तिला ठेवले होते व ती त्याची 'घरवाली' झाली होती. तिचे सर्व भाडेकरूही मोलमजुरी करून पोट भरणारे सामान्य लोक होते. या वातावरणामुळे किरणमयीला उपेंद्रवरच्या आपल्या उत्कट प्रेमाची आठवण तीव्रतेने होई व पश्चात्तापामुळे दिवाकराला स्वतःपासून ती दूर ठेवी. त्यामुळे तिचे व दिवाकरचे वारंवार झगडे होऊ लागले. कारण दिवाकरला आता किरणमयीबद्दल खरोखरच प्रेम वाटू लागले होते. या दोघांच्या झगड्यांना कामिनी घरवालीही कंटाळली. कारण किरणमयीसाठी तिला कोपऱ्यावर राहणाऱ्या हिंदुस्थानी व्यापाऱ्याने मोठी लाच देऊ केली होती. दारिद्र्य व मनस्ताप यामुळे किरणमयीचे सौंदर्य खरे म्हटले तर आतापर्यंत नष्ट झालेले होते. एक दिवस झगडा झाल्यावर किरणमयी दिवाकरला समजावून सांगते की, धाकट्या भावाप्रमाणे त्याच्यावर ती प्रेम करू इच्छित होती व त्याची बुभुक्षित नजर तिला आता सहन होत नव्हती. तिचे म्हणणे समजून घेऊन तो तिच्या सांगण्याप्रमाणे अन्यत्र राहू लागतो. ही संधी साधून कामिनी त्या मारवाड्यास बोलावून आणते; पण त्याला पाहून किरणमयी मूर्छित होते. या सर्व गोंधळातच सतीश तेथे अकस्मात उपस्थित होतो. मृत्युशय्येवर पडलेल्या उपेंद्राने त्यांना परत भेटीसाठी बोलावलेले असते. कारणच जबरदस्त असल्यामुळे दिवाकर व किरणमयी त्याच्याबरोबर जायला तयार होतात.

किरणमयीची झाली एवढी विटंबना पुरे झाली नव्हती म्हणूनच *की काय शरदचंद्रांनी तिला आणखी धक्के दिलेले आहेत.* उपेंद्रवरच्या तिच्या प्रेमाची तिला पूर्ण जाणीव झालेली असते व त्याच्या चरणांजवळ आपल्याला जागा मिळेल असे स्वप्न ती पाहात असते; परंतु भारतात परत आल्यावर तिला कळून येते की, एक सतीश सोडून सर्वांना तिच्याबद्दल घृणाच वाटत होती. दिवाकर तत्काळ उपेंद्राच्या भेटीला जाऊ शकतो व उपेंद्रची क्षमा त्याला मिळते; परंतु किरणमयीच्या राहाण्याची सोय सतीशला अन्यत्र करावी लागते. तेथे विचार करता करता तिला वेड लागून ती गावात भटकत राहाते. योगायोगाने ती उपेंद्रच्या घरी येते तेव्हा तो शेवटचा निःश्वास सोडत असतो. माडीवर त्याच्या खोलीत त्याच्या मृत्यूमुळे हाहाःकार उडतो तेव्हा वेडी किरणमयी खालच्या मजल्यावर शांतपणे झोपी गेलेली असते!

काही नैतिक मूल्ये समाजापुढे मांडण्यासाठी ही कादंबरी आपण लिहिली असा शरच्चंद्रांचा दावा होता. सावित्री–सतीशचे उदात्तीकरण व किरणमयीचा अधःपात व बुद्धिनाश त्यांनी बुद्धिपुरस्सर याच हेतूने चित्रित केलेला आहे. अश्रद्ध, कोणत्याच मूल्यांवर विश्वास नसणाऱ्या व म्हणूनच कधी कुणावर खऱ्या अर्थाने प्रेम करू न शकणाऱ्या, परंतु संवेदनाक्षम, बुद्धिमान व विद्वान अशा किरणमयीला इतक्या आपत्तीतून गेल्यावर वेड लागावे यात अस्वभाविक असे काही नाही. 'श्रीकांत' मधील अभया व 'शेषप्रश्न' मधील कमल यांच्याप्रमाणे किरणमयी ही एक बंडखोर स्त्री आहे; परंतु अभया निरहंकारी व निःस्वार्थी आहे, तर कमलेच्या प्रश्नांची झेप किरणमयीच्या तर्कवादापेक्षा पुष्कळच मोठी आहे. कमल स्वयंकेंद्रित नाही, स्वयंपूर्ण आहे. त्यामुळे तिच्या बंडखोरीला एक आध्यात्मिक पातळी आहे. सावित्रीसारख्या स्त्रीची, प्रेम या मूल्यावरची निष्ठा, सन्मार्गावर राहण्यासाठी तरुण वयातही अनंत हालअपेष्टा सोसून सुखासीनतेपासून दूर राहण्याची तिची तयारी, प्रिय व्यक्तीच्या हितासाठी तिने केलेला महान त्याग आणि किरणमयीसारख्या पंडित परंतु असंयमी स्त्रीची श्रद्धाहीनता, यातील ढोबळ विरोध लेखकाने हेतुपूर्वक योजलेला आहे.

जीवितात कशाच्या बळावर माणसे आपल्या वासनाप्रेरणा संयमित ठेवू शकतात, या प्रश्नाचा शोध शरदबाबूंनी अनेक कादंबऱ्यां-

**कशाच्या बळावर माणसे आपल्या वासना प्रेरणा संयमित ठेवतात त्याचा शोध त्यांनी घेतला**

तून घेतलेला आहे. उपेंद्रसारख्या व्यक्ती मुळातच सत्प्रवृत्त व निष्कलंक असतात. चांगले व वाईट यातील भेदांचे ज्ञान त्यांना असते व त्यांच्या प्रकाशात निःशंकपणे ते आपली वाटचाल करीत असतात. उपेंद्राचे अधिक परिणत स्वरूप आपल्याला 'विप्रदास' मध्ये पाहावयास मिळते. जीवनाच्या बऱ्यावाईट दर्शनामुळे उपेंद्र-सारख्यांची सहानुभूती, मानवता व ममता अधिक विशाल होत जाते. पतिप्रेमावरील प्रगाढ निष्ठा, देवधर्मावरील अमोघ विश्वास, हे सुरबालेसारख्या सामान्य भारतीय स्त्रीच्या जीवनातले प्रभावी मूल्य याही पेक्षा सामान्य अशा माणसाच्या जीवनात मुलेबाळे, आप्तस्वकीय व त्यावरील प्रेम व निष्ठा या गोष्टी मूल्यस्वरूपाने वावरत असतात. या सर्व मूल्यांना पारख्या झालेल्या किरणमयीची कथा. अश्रद्ध, स्वार्थी व अहंकारी वृत्तीबाबत धोक्याची सूचना देण्यासाठी रंगविलेली आहे. तिचा पति आजारातून उठला असता, तर उपेंद्र–सुरबालेच्या निष्ठावंत प्रेमाच्या उदाहरणामुळे तिने कदाचित पतीशी श्रद्धापूर्वक संसार केला असता. तशी संधीच न मिळाल्याने ती अगतिक होते. असत्–प्रवृत्त व्यक्तीची अगतिकता शरदबाबूंनी नेहमीच कमालीच्या हळुवारपणे व जाणिवपूर्वक रंगविलेली आहे. म्हणूनच 'A scientific ethical novel' असे या कादंबरीचे वर्णन शरदबाबूंनी केले असले व तशी तिची रचना केली असली तरी सतीशप्रमाणेच ते स्वतः किरणमयीलाही समजू शकतात. कारण खऱ्या कलावंताला आवश्यक असलेली सहृदयता व औदार्य त्याच्याजवळ आहे.

किरणमयीची कथा व सावित्रीची कथा अशा दोन कथा शरदबाबूंनी या कादंबरीत एकत्र केल्याने व दोहींना सारखेच महत्त्व दिल्याने व त्यात सारख्याच वजनाचा तपशील भरल्याने दोन कादंबऱ्या एकत्र जोडल्याचा भास वाचकाला क्वचित होतो. तसे होऊ नये म्हणून शरदबाबूंनी पुष्कळच काळजी घेण्याचा प्रयत्न केलेला आहे; परंतु तरी उपेंद्रचा मित्र ज्योतिष व त्याची बहीण सरोजिनी या व्यक्ती मुद्दाम कथानकात समाविष्ट केल्यासारख्या वाटतात. कारण सावित्रीला सतीशपासून दूर करताना, त्याचे दुःख थोडे सुसह्य करण्यासाठी सरोजिनीच्या प्रेमाची आवश्यकता दयावंत शरदबाबूंना वाटली असावी. सावित्रीवर जरी सतीशचे प्रेम असले तरी सरोजिनीचे त्याच्यावर प्रेम जडल्याने व त्याचे सावित्रीवरील प्रेम समजू शकण्यसारखा तिचा स्वभाव असल्याने, पुढे सर्व ठीक होईल असा दिलासा वाचकांना मिळतो.

तसेच, किरणमयीची कथा शरदबाबूंना सांगायची असल्यामुळे तिचा पति हाराणबाबू याला लेखकाने ओढून–ताणून कथानकात आणले आहे व तो उपेंद्रचा बालमित्र होता असे आपल्याला आयत्या वेळी सांगितले आहे, असेही वाटून जाते. म्हणून या कादंबरीचा घाट रेखीव वाटत नाही. तरी शरदबाबू हे फार कुशल कथनकार असल्यामुळे व प्रसंग आणि घटना नाट्यात्म पद्धतीने आपल्यापुढे उभे करण्याचे असामान्य कौशल्य त्यांच्या ठायी असल्याने त्यांच्या अन्य कथांप्रमाणे या कथेच्या विश्वातही आपण सहजपणे ओढले जातो. त्यांच्या सुरुवातीच्या मोठ्या कादंबरीपैकी ही कादंबरी आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे. शिवाय त्यांच्या किरकोळ कादंबऱ्या मासिकांत क्रमशः प्रसिद्ध झाल्या होत्या हे लक्षात घेतले तर त्यांच्या रचना-कौशल्याचे कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही. □

( पुढील अंकात लेखांक तीन : 'विप्रदास' )

पुस्तके

# चिं. त्र्यं. खानोलकर : तीन टप्पे

वि. शं. पारगावकर

'चिं. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात' हे श्री. जया दडकर यांचे पुस्तक अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. मराठी साहित्यातील हा अगदी पहिलाच प्रयत्न नसला तरी या पुस्तकाचा एकंदर दृष्टिकोण पाहिला तरी देखील या पुस्तकाचे महत्त्व लक्षात यावे. मराठी ललितसाहित्याच्या दृष्टीने आणि सर्वसाधारण पण रसिक वाचकांच्या दृष्टीनेही.

शिवाय जया दडकर यांनी हा वाङ्मयीन व्यक्तिविषयक जो शोध घेतलेला आहे त्या व्यक्तीचे मराठी वाङ्मयातील स्थानही महत्त्वाचे आहे, ते एकाच दृष्टीने नव्हे तर अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण आहे.

एक व्यक्ती म्हणून जेव्हा जया दडकर खानोलकरांच्या जीवनाचा शोध घेतात तेव्हा हा शोध तितकासा महत्त्वपूर्ण वाटत नाही. कारण एक व्यक्ती म्हणून खानोलकर कुठल्याही अर्थाने लोकविलक्षण नव्हते. एक व्यक्ती म्हणून खानोलकर यांचे जीवन अगदी मिळमिळीत आहे. जे इतर शेकडो, हजारो, लाखो लोकांच्या वाटचाला येते तेच जीवन खानोलकर या व्यक्तीच्या वाटचाला आलेले आहे.

म्हणून जया दडकर जेव्हा या सामान्य व्यक्तीच्या जीवनाचा शोध घेतात तेव्हा तो साराच प्रवास वाचकांना नीरस वाटण्याचा दाट संभव आहे; परंतु एका लक्षवेधक लेखकाची कलाबीजे जेव्हा जया दडकर या जीवनामधून शोधू पाहतात तेव्हा मात्र या शोध–प्रवासात थोडेसे चैतन्य आल्यासारखे वाटते. त्यांचे कुडाळचे आयुष्य, कोचऱ्याचे आयुष्य आणि नंतरचे मुंबईचे आयुष्य अशा तीन प्रमुख टप्प्यात त्यांच्या छोटयाशा आयुष्याचे विभाजन झालेले आहे. कोकणातून नशीब काढायला एखादा कोकणी सामान्य माणूस मुंबईत येतो आणि मुंबईतील एखाद्या मिलमध्ये चिकटून सहाणेवर एखादी मुळी उगाळीत राहावे असे आपले आयुष्य उगाळीत राहतो, तसेच काहीसे खानोलकर यांचेही मुंबईला स्थलांतर झालेले असते.

फरक एवढाच की तो सामान्य कोकणी माणूस मुंबईत आपले सारे अस्तित्व आणि व्यक्तित्व विसरून शेवटपर्यंत एका यंत्राचाच भाग होऊन राहतो आणि अति संवेदनाक्षम खानोलकर आपल्या जीवनाचे यंत्र होऊ देण्याविरुद्ध मोठा झगडा देतात आणि हा झगडा देणारा जो खानोलकर नावाचा

माणूस असतो तो या सामान्य खानोलकर नावाच्या व्यक्तीत दडून बसलेला एक प्रतिभावंत लेखक असतो. तो कवी असतो, कादंबरीकर असतो आणि नाटककारही असतो, हे त्याच्या जीवनाचे आणखी तीन असामान्य पैलू.

म्हणूनच जया दडकर जेव्हा या सामान्य माणसाच्या सामान्य जीवनाचा शोध घेण्याची यातायात करतात तेव्हा त्या शोधामधून काळोखात मध्येच एखादी वीज चमकून जावी तसे खानोलकरांच्या प्रतिभेचे काही अस्पष्ट परंतु चकचकीत पैलू नजरेसमोर येतात. हे असे पैलू अधूनमधून उलगडतच राहतात आणि तेच पैलू या सामान्य व्यक्तीच्या जीवनावर प्रकाशाचे पट्टे फिरवीत राहतात.

हे प्रकाशाचे पट्टेदेखील दुहेरी पद्धतीने फिरत असतात. एकीकडे ते खानोलकरांचे सामान्यपणे अंधारात कोंडलेल्या आयुष्याच्या तुकड्यांवर प्रकाश टाकतात, तर दुसरीकडे ते त्यांच्या कलामनाचे कप्पेदेखील उजेडाच्या टप्प्यात आणीत असतात. जया दडकर खानोलकरांच्या जीवनाचा शोध घेत फिरत असताना एके ठिकाणी म्हणतात (पान ४८) 'निघालो. मुंबई–गोवा रस्त्यानं भंगसाळनदीवरील पुलावर आलो.' समोर नदीचं पात्र अर्धमुर्धं कोरडंच. काही बायका धुणी उमलत होत्या.

'जिथे आहे घाट तिथे आहे नार,
तिथून चढते झिंगोनिया कोर.'

'आणि अशा निसर्गरम्य ठिकाणी माणसांच्या हातून 'हिर्व्या चुका' घडावयाच्याच.'

अशी किती तरी उदाहरणे आणि प्रसंग जया दडकर यांनी या शोधप्रकरणी उभी केली आहेत. खानोलकर जिथे जिथे गेले, वावरले, रमले, विसावले, खंतले, अंतर्मुख झाले; कुठे भांडले, कुठे चिडले, कुठे हसले, कुठे रडवेले झाले, कुठे एखाद्या कलाकृतीचं बीज त्यांनी आपल्यात सामावून घेतलं, तर कुठे एखाद्या प्रसंगानं त्यांच्या कविमनावर मोरपंखी फुंकर घातली असे सारे प्रसंग जया दडकर मोठ्या कसोशीनं शोधण्याचा प्रयत्न करतात आणि असे करीत असतानाच एखाद्या प्रसंगी त्यांना खानोलकरांचे एखादे पात्र दिसते किंवा त्यांनी केलेली एखादी कविता अथवा तिचे एखादे कडवे आठवते.

जया दडकर यांचे हे सारे प्रयत्न आणि धडपड चालली असताना मला मात्र एखाद्या मेकॅनोच्या खेळाची आठवण होते. निरनिराळ्या आकृतींचे ठोकळे जोडीत जोडीत एखाद्याने एक सलग चित्र तयार करावे असे काही तरी वाटत राहते.

खानोलकरांचे जीवनचरित्र त्यांच्या कलाप्रवृत्तींच्या आधाराने शोधणे ही गोष्ट जितकी सोपी नाही तेवढीच ती तर्कशुद्धही नाही असे मला वाटते.

## दैव आणि आत्मस्वातंत्र्य

कलावंताला आपल्या जीवनात अनंत आणि अनंत प्रकारच्या व्यक्ती भेटत असतात. त्यामधील कित्येक व्यक्तींचे आणि त्याचे जिवाभावाचे नातेदेखील असू शकते. त्यातील काही व्यक्ती तर कलावंताच्या जीवनात प्रचंड उलथापालथ देखील घडवून आणण्याइतक्या सामर्थ्यवान असू शकतात; परंतु एवढे जरी सारे खरे असले तरी कलावंत ज्या जगात जीवन जगत असतो ते आणि कलावंताच्या स्वतःच्या मनातले त्याचे कलाविश्व या दोन वेगवेगळ्या गोष्टी असतात असे मला वाटते.

कुडाळ किंवा कोचर या ठिकाणी जीवन जगत असता खानोलकरांनी एखादी 'लक्ष्मी' (रात्र काळी...घागर काळी) पाहिलीदेखील असेल. इतकेच नव्हे तर तिच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाने आणि अलौकिक सौंदर्याने लेखक भारावूनही गेला असेल; परंतु आपल्या कलाविश्वास (रात्र काळी...घागर काळी) जेव्हा तिला जन्माला घालावयाचे खानोलकरांनी ठरविले असेल तेव्हा या नेहमीच्या जगातल्या मर्त्य लक्ष्मीला त्या विश्वात प्रवेश देणे त्यांना शक्य नव्हते! जसा या पृथ्वीवरील मर्त्य माणूस देहानिशी स्वर्गात जाऊ शकत नाही तसेच हे थोडेसे आहे.

हा नियम जसा गद्य ललितकलाकृतींच्याबाबतीत गृहीत धरता येण्यासारखा आहे तशी परिस्थिती काव्यनिर्मितीच्या बाबतीत असू शकेल असे मला वाटत नाही. काव्याचा, निदान भावकवितेचा प्रकृतिधर्म गद्य ललितकृतीपेक्षा निराळा असतो. जसे खानोलकर एके ठिकाणी 'नियतीच्या पुढती अपमानित' झालेल्या मानवाला म्हणतात,

'स्वैरपण सोडून दे
प्राण तुझे आकाशी
चैतन्य राखुनिया
ठेव तुझ्यापाशी

उज्ज्वल भवितव्य तुझे, चिर होईल नाव तुझे
उज्ज्वल भवितव्य तुझे, उज्ज्वल भवितव्य तुझे

जया दडकर म्हणतात, (पान ३२) 'ही कविता वाचल्यानंतर मला माधव आचवलांच्या 'कादंबरीकार खानोलकर' या लेखाची आठवण झाली. 'फेट' आणि 'फ्री विल' माणसाच्या आशा–आकांक्षांपासून संपूर्णपणे अलिप्त असलेली, पूर्वनियोजित स्वयंभू अशी नियती आणि आपले आयुष्य आपल्याला हवे तसे स्वेच्छेने घडविता येण्याचे माणसाचे स्वातंत्र्य ह्या दोहोतले नाते खरोखरच काय असते या प्रश्नाशी, या रहस्याशी खानोलकर आपल्या लेखनात झुंज देत असल्याचं मत आचवलांनी मांडलेलं आहे–'

दैव आणि आत्मस्वातंत्र्य हा प्रश्न खानोलकरांच्या जीवनाशी त्यांच्या तरुण वयापासूनच भिडलेला होता; परंतु या प्रश्नाचं स्वरूप निश्चित करताना जसा त्यांनी कादंबरी–नाटकादि गद्य ललितकृतींचा आधार घेतला तसाच काव्य या वाङ्मयप्रकाराचाही आधार घेतलेला आहे; परंतु या प्रश्नाशी निगडित अशी कलाकृती उभी करताना नित्याच्या व्यावहारिक जगातील कृति–प्रकृतींचे त्यांना आधार घ्यावे लागले, ते आधार काव्याच्या बाबतीत कमी प्रकृतीतील आणि ललित गद्य कलाकृतींच्या संदर्भात अधिक प्रकृतिनिष्ठ असणे अगदींच स्वाभाविक आहे.

वर मी म्हटले त्याप्रमाणे व्यवहारी मर्त्य जगातील प्रकृती कलाकृतींमध्ये जशाच्या तशा उतरू किंवा अवतरू शकतच नाहीत, तरी पण ललित गद्य कलाकृतींच्या संदर्भात त्यांच्या काही खाणाखुणा आकारित झालेल्या आढळणे शक्य असते. तसे काव्य या कलाप्रकाराच्या बाबतीत मुळीच घडण्याचा संभव नसतो.

म्हणून जया दडकर यांनी घेतलेल्या खानोलकरांच्या शोधाच्या बाबतीत दोन प्रमुख भाग पडू शकतात, हे माझे विधान दडकर यांनी खानोलकरांच्या कलेच्या बाबतीत घेतलेल्या शोधाच्या संदर्भातच आहे.

एक तर कवी खानोलकर म्हणून जया

दडकर यांनी त्यांचा फारसा शोध घेतलेलाच नाही. कारण ही गोष्ट त्यांच्या अगदी सहजपणे लक्षात आलेली असणार की कवितेमधील भावाविष्कारांचा संदर्भ घेऊन आपल्याला खानोलकरांचा पिंड तपासता येणार नाही ! ही गोष्ट अगदीच खरी आहे. कारण काव्य म्हणजे काही जिवंत प्रकृतिपुरुषाचे रूप नव्हे की त्याचे दर्शन नव्हे किंवा त्याचा आविष्कारही नव्हे. व्यवहारातील काही घटना, काही प्रसंग, काही व्यक्तीदेखील काव्यनिर्मितीला कारणीभूत झालेल्या असतील; परंतु एकदा काव्यनिर्मिती झाल्यावर वरील प्रसंगांची नाळ त्या कलाकृतीपासून तुटूनच पडते. तसे ललित गद्य कलाकृतींच्या बाबतीत शोध घेताना नेहमीच्या जगातील-विशेषतः कलावंत जगला असेल त्याच्या अवती-भोवतींचे संदर्भ त्याच्या कलाकृतीमध्ये शोधण्याचा मोह होतो. असा मोह होणे ही देखील स्वाभाविक गोष्ट आहे; परंतु त्यामुळे कलाकृतीच्या यशापयशावर कोणताही परिणाम होत नाही ही गोष्ट आपण सतत लक्षात ठेवली पाहिजे.

'चि. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात' या आपल्या पुस्तकात जया दडकर यांनी तीन पातळ्यांवरून खानोलकरांचा शोध घेतलेला आहे हे दिसून येते.

एक, त्यांचे वैयक्तिक जीवन आणि त्यामधील यशापयश. दोन, त्यांचे सामाजिक जीवन व त्या जीवनातील स्तर आणि तीन, कलावंत खानोलकर यांचे जीवन आणि त्याबरोबरच त्यांच्या कलाकृतींचे विश्लेषण.

या शोधातील तिन्ही भाग महत्त्वाचे आहेत आणि ते एकमेकांना पूरक आहेत. पाश्चात्य लेखकांच्या संदर्भात अशी पुष्कळ पुस्तके लिहिली गेली आहेत. आपल्याकडेही क्वचित एक-दोन अशी पुस्तके असतील. अशी पुस्तके मनोरंजक असतात; पण उद्बोधक असतात का याविषयी शंका उपस्थित करण्यास खूपच वाव असतो. एक तर कोणत्याही व्यक्तीचे जीवन म्हणजे एखाद्या प्रयोगशाळेतील प्रयोग नव्हे. प्रयोगशाळेत ठराविक पद्धतीने प्रयोग करून ठराविक बिनचूक निष्कर्ष काढता येतात. एक तर व्यक्तीचे मन अगम्य असते. मानसशास्त्रज्ञांनी आजवर माणसाच्या मनावर अगणित प्रयोग केलेले आहेत. तरीही मनाचे संपूर्ण स्वरूप अजून तरी या प्रयोगांतून स्पष्ट झालेले नाही. माणूस अमुक एका परिस्थितीत अमुक प्रकारेच वागेल, तसेच विशिष्ट परिस्थितीत त्याच्या मनात विशिष्टच विचार येतील असे निदान करणे अशक्यच आहे.

## लक्षणीय प्रयत्न

तेव्हा कलावंताच्या व्यक्तिमनात उठलेल्या तरंगांचे संदर्भ त्याच्या कलाकृतीत शोधणे हा एक चांगला खेळ जरी असला तरी तो शास्त्रोक्त नाही ! म्हणून या शोधातून निघालेले निष्कर्ष देखील शेवटी ज्याच्या त्याच्या वैयक्तिक तर्ककसोटीवरच सोडून द्यावे लागतात. जया दडकर यांना देखील तशी जाणीव नसावी असे नाही. म्हणून त्यांनी देखील पुष्कळ व्यक्तींचे शोध खानोलकरांच्या वैयक्तिक जीवनाच्या पातळीवरच सोडून दिलेले दिसतात; परंतु असे असले तरी जया दडकर यांचे हे प्रयत्न निरर्थक वाटत नाहीत हे देखील कबूल करावेच लागते. कारण त्यामुळे खानोलकर ही व्यक्ती आणि कलावंत खानोलकर यांच्या जीवनातील अनेक पैलूंवर प्रकाश पडतो आणि त्या व्यक्तीचे जास्तीत जास्त पूर्णत्वाने दर्शन घडण्यास मदत होते.

उदाहरणार्थ व्यक्तीची कामवासना, तिचे दैव आणि तिचे आत्मस्वातंत्र्य या तीन पातळ्यांवरून जया दडकर यांनी व्यक्ती खानोलकर आणि त्यांची कला (अनेक कलाकृती) यांचा जो शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे तो त्यांचा प्रयत्न फार महत्त्वाचा आहे. असा प्रयत्न करीत असता जया दडकर खानोलकरांच्या कलाकृतीमधील अनेक व्यक्तिरेखांचे एक दुसरीशी साम्य दाखविण्याचा प्रयत्न करतात आणि असा प्रयत्न करीत असताना एक विशिष्ट प्रकारचा तर्क वापरतात. खानोलकरांच्या व्यक्तिरेखांमध्ये असलेले साम्य इतरांनाही जाणवावे इतके कधीकधी स्पष्ट असते देखील; परंतु याबाबत जुळ्यांच्या जीवनाचे उदाहरण देता येण्यासारखे आहे. काही रूपसाम्य दर्शविणारे जुळे असतात, तर काही जुळे असतात; पण त्यांच्यामध्ये रूपसाम्य नसते. इकडे तिकडे काही खाणाखुणा किंवा लकबींमध्ये साम्य असू शकते; परंतु असे जरी असले तरी त्यांच्या जीवनात कुठेही साम्य नसते ! तसेच त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनातही साम्य असत नाही. प्रत्येकाचे कामजीवन, त्याचे दैव आणि त्याचे आत्मस्वातंत्र्य यामध्ये दोन ध्रुवांइतके अंतर असू शकते.

तसेच खानोलकर एखादा जीवनपट आपल्यासमोर उभा करतात तेव्हा त्या जीवनपटातील काही व्यक्तींचे त्यांच्या इतर जीवनपटामधील काही व्यक्तींशी थोडेबहुत साम्य आढळण्याचा संभव काही अगदीच नाकारता येणार नाही आणि अशा साम्यदर्शनाच्या स्थळांमुळे त्या कलावंताच्या कलेत काही वैगुण्य येईल किंवा काय याविषयी देखील माझ्या मनात थोडी शंका आहे.

एखाद्या लेखकाची प्रत्येक कलाकृती जरी वेगळी असली तरीही तिच्यामध्ये अनेक दृष्टींनी कुठल्या ना कुठल्या बाबतीत बरेच साम्य देखील असते. एखादी कथा वाचल्यावर आपण म्हणतो, 'ही जी. ए. कुलकर्णी यांची कथा आहे' किंवा 'ही श्री. म. माटे यांची कथा आहे.' ही असली विधाने आपण कशाच्या आधारावर करीत असतो ?

या बाबतीत मला जे वाटते ते असे: प्रतिभावंत लेखकाचे त्याचे स्वतःचे एक जग असते आणि त्या जगामध्ये त्याचे एखादे किंवा अनेक स्फूर्तिस्थाने असतात. त्याच्या कलेला जे विषय मिळतात ते या स्फूर्तिस्थानामधूनच. त्याचे स्वतःचे जे एक जग असते त्या जगामधूनही तो आपल्या कलाविषयांची आणि व्यक्तींची निवड करीत असतो. मात्र अशा वेळेस त्याची ही देवघेव जशीच्या तशी नसते. एखाद्या छायाचित्रकाराने आपल्या कॅमेऱ्यामध्ये एखादी व्यक्ती जशीच्या तशी टिपून घ्यावी तशी ही निवड नसते. त्या व्यक्तीमध्ये कलावंताच्या कल्पकतेचे आणि त्याच्या प्रतिभेचे रंग मिसळलेले असतात. कित्येक वेळा कलावंत एकाच कल्पनेने किंवा प्रतिभेतून स्फुरणाऱ्या एकाच प्रकारच्या सौंदर्यछटांनी भारलेला असतो आणि माझ्या दृष्टीने तेच प्रतिभावंत कलावंताचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व असते ! हे त्याचे व्यक्तिमत्त्व त्याच्या कलेमध्ये अनेक तऱ्हांनी प्रदर्शित झालेले असते. कुठे ते डोळ्यांच्या साम्यामधून प्रगट होईल, तर कुठे एखाद्या विशिष्ट प्रकारच्या स्वभावउद्रेकातून ते प्रकट होईल. कुठे दुःखांतिकेच्या

विशिष्ट प्रकारच्या अभिव्यक्तीमधून ते प्रत्ययाला येईल तर कधी दुःखांतिकेच्या दृष्टिकोणामागील एखाद्या साम्यस्थळातून ते प्रगट होईल.

ही गोष्ट अपरिहार्य आहे असे मला वाटते आणि निरनिराळया कलावंतांच्या लक्षणीय कलाकृतींच्या सूक्ष्म अभ्यासामधून या साम्याचा प्रत्यय आपल्याला सहज घेता येईल.

शेवटी जया दडकर यांनी खानोलकरांच्या कादंबरी या साहित्यप्रकाराचेच अधिक परीक्षण, मनन आणि विश्लेषण केलेले आहे. यावरूनही त्यांची खानोलकरांच्या व्यक्ति-जीवनापाठीमागची जिज्ञासा व्यक्त होते. 'कोंडुरा' या त्यांच्या कादंबरीचे तर त्यांनी अधिक खोलात जाऊन निरीक्षण केलेले आहे; परंतु या निरीक्षणातही बऱ्याच त्रुटी मला जाणवतात. त्यामधील काही तर अगदीच ढोबळ आहेत. उदाहरणार्थ तात्या ब्रह्मचर्यव्रत-पालनाचा आदेश घेऊन येतात आणि आपल्या बायकोशी संभोग टाळतात. अगदी व्रतस्थ राहतात. असे असताना ते पार्वतीची अभिलाशा का बाळगतात? इतकेच नव्हे तर त्या संदर्भात ते पार्वतीच्या बाबतीत अघोरी मार्गाचा का अवलंब करतात?

मला या बाबतीत असे वाटते की, कलाविश्वातील प्रश्नांचे निष्कर्ष कलाबाह्य विश्वातील उपकरणांच्या साह्याने काढण्याचा आपण प्रयत्न करू नये हे बरे!

शेवटी कलावंताचे जग हे एक त्याचे खास आणि स्वतंत्र विश्व असते. अनिश्चिततेचा जो नियम नेहमीच्या व्यवहारी जगाला लागू आहे तोच कलाविश्वालाही लागू आहे. अनिश्चिततेचा, वैफल्याचा, असुरक्षिततेचा, दैवाचा, मृत्यूविरुद्धचा आणि माणसाला आत्मस्वातंत्र्य नसल्याचा हाच खरा झगडा मानवी जीवनाच्या मुळाशी आहे. प्रत्येक मोठा कलावंत आपल्या प्रतिभेच्या साह्याने आणि आपल्या कलाकृतींच्या माध्यमातून या झगड्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतो आणि त्याच्या कलेचे यश आणि अपयशही शेवटी यावरच अवलंबून असते.

जया दडकर हे खानोलकरांचा शोध कोणत्या दृष्टिकोनातून घेत आहेत? आणि खानोलकरांच्या जीवनशोधनाच्या बाबतीत नेमक्या कोणत्या गोष्टींसाठी हा शोध घेत आहेत? त्यांच्या मनासमोर प्रामुख्याने एक खानावळ चालविणारा खानोलकर आहे की,

'कसे? कसे हासायाचे?
हासायचे आहे मला,
हसतच वेड्या जीवा थोपटीत, थोपटीत;
फुंकायचा आहे दिवा.
हासायचे कुठे? कुठे आणि केव्हा?
कसे आणि कुणापास?

इथे भोळ्या कळ्यांनाही आसवांचा येतो वास.' आपल्या प्रखर प्रतिभेच्या विश्वातून कलापुष्पांना जन्म देणारा कलावंत? जया दडकर यांनी या दोन्ही खानोलकरांचा शोध मोठ्या कसोशीने घेतलेला आहे यात काही शंका नाही; परंतु या शोधात खानोलकरांच्या सामान्य जीवनाचे विश्व आणि त्यांनी निर्माण केलेले कलाविश्व यांच्या सीमारेषा त्यांच्या शोधात फिक्कट झाल्यासारख्या वाटतात.

चानीच्या निष्पाप जीवनाचा शेवट तिच्या निर्घृण हत्येत होतो. मामीच्या जीवनाला चिकटून बसलेले दुःख आणि अगतिकता पाहून आपली जीभ टाळ्याला चिकटूनच बसते. खानोलकरांच्या कलाविश्वात मृत्यूला नैसर्गिक स्थानच नाही. कोणी कोरड्या विहिरीत उडी टाकून जीव देतो तर कोणाची हत्या पिसाळलेल्या कुत्र्याने नरड्याचा घोट घेतल्यामुळे होते! हे जसे मृत्यूचे तसेच जीवनाचेही.

कोणाचेच जीवन स्वतंत्र नसते. कोणी ना कोणी कशाने तरी झपाटलेले जीवन जगत असतो. कोणाला एखाद्या मुलीमुळे झपाटलेपण आलेले असते, तर कोणाला समाधिपुरुषांच्या अलौकिक परंपरेच्या दबावामुळे झपाटलेपण आलेले असते. कोणी कामवासनेने झपाटतो तर कोणाला मिळालेल्या सौंदर्याच्या शापामुळेच झपाटलेपण येते. सुतारीण भावकाईचा तिच्यात झालेल्या संचारामुळे झपाटते, तर पर्शरामतात्या न्यूनगंड आणि अहंगंड या द्वंद्वाच्या कचाट्यात सापडून झपाटतात. 'अजगर' मधल्या झपाटलेपणाने तर एका वेगळ्याच स्तरावर आपले रौद्र दर्शन घडविलेले आहे.

शेवटी खानोलकरांच्या कलाविश्वातील माणसांचे जगणे आणि मरणे या दोन टोकांमधले जीवन जगत राहणे, यांचे अर्थ शोधणे हाच खरा खानोलकरांचा शोध ठरतो.

अशा शोधातील जया दडकर यांचे 'चिं. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात' हे पुस्तक हा एक लक्षणीय प्रयत्न. हा त्यांचा प्रयत्न लक्षणीय तर खराच; पण त्याव्यतिरिक्त त्याला मराठी साहित्याच्या इतिहासातही एक महत्त्वपूर्ण स्थान आहे हे निःसंशय. □

चिं. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात.
लेखक—प्रकाशक : जया दडकर.
किंमत : पंचावन्न रुपये
पृष्ठे : २२३ डेमी.

## कच्च्या जमाखर्चाची पावती

काळाच्या उदरात गडप झालेल्या भूतकाळाला पुन्हा एकदा हाक घालायची आणि या हाकेच्या उमटणाऱ्या प्रतिध्वनीतून सरलेल्या भूतकाळाला वर्तमानकाळी वर्ख चढवायचा, या विशिष्ट विचारसरणीतून साकार झालेली आत्मचरित्रे ही एक ठराविक चौकटीबद्ध व्यक्तिमत्त्व लेऊन आल्यासारखी वाटतात. म्हणजे प्रत्येक आत्मचरित्रातील व्यक्ती, प्रसंग, संदर्भ, पार्श्वभूमी वगैरे तपशील निरनिराळे असले तरी ते कथन करण्याची, सहजशा मांडणीतून वाचकांसमोर ठेवण्याची चौकट तीच असते. अमृता प्रीतम यांच्या 'रसीदी टिकट' या आत्मकथेचं वेगळेपण मनात ठसतं ते नेमकं इथंच: कारण हे आत्मकथन म्हणजे लहानपणापासून मोठेपणाच्या काळापर्यंतच्या घटनांचं-प्रसंगांचं सलग संगतवार चित्रण नाही, तर हे आत्मकथन कधी सलग घटनाचित्रणाच्या अंगांनी जातं, तर कधी वेळोवेळी डायरीत केलेल्या नोंदींमधून अमृता प्रीतम यांच्या जीवनाचे अक्षांश-रेखांश स्पष्ट करतं. काही ठिकाणी ते स्वप्नांमधून फुलतं, तर काही ठिकाणी आपल्या मनाला फुलांच्या स्पर्शांनी भिडणाऱ्या कवितांमधून आकार घेतं. कुठे मनाला सुखविणाऱ्या प्रसन्न आठवणीतून तर कुठे मनाला घायाळ करणाऱ्या आठवणींच्या जहरी जखमांतून स्पष्ट होतं. स्वआविष्काराच्या अलग अलग पातळ्यांतूनही एक सलग लय साधण्याची कला आणि किमया इथं घडली

आहे. साहजिकच त्यामुळे अमृता प्रीतम यांचं व्यक्तिस्वरूप आणि साहित्यिकस्वरूप वाचकांच्या समोर उलगडत जातं.

'अंतर्मनात उमटणारे सारे खळाळ; विचार, वेदना, सुखदुःखं ही तशी वेळोवेळी कथाकादंबऱ्यांच्या हवाली होत गेलीच आणि तरीही पुन्हा आत्मचरित्र लिहिलंय ते आयुष्याच्या जमाखर्चाच्या कागदावर लावले जाणारे पावतीचे तिकीटच. कविता, कादंबऱ्यांच्या कच्च्या जमाखर्चाची पावती पक्की करण्यासाठी !' ही या आत्मकथनामागची छोटीशी भूमिका अमृता प्रीतम यांनी पहिल्यांदाच स्पष्ट केली आहे आणि तीही 'सत्यापासून सत्यापर्यंत' पोचण्याचा एकमेव हेतू मनात धरूनच ! या प्रक्रियेच्या प्रामाणिकतेपोटीच यात अनेकदा भंगल्या गेलेल्या श्रद्धांची टोचती जाणीव आहे, संपूर्ण कथनालाच एक विलक्षण गहिरा आणि हळुवार सूर मिळवून देणारे आयुष्यातल्या रेशमी क्षणांचे तरल आठव आहेत, आयुष्यावरचा विश्वास उडावा अशा अस्वस्थ क्षणांच्या घुसमटणाऱ्या सावल्या आहेत, साहित्यिक जीवनात पदरी आलेल्या अवहेलना; उपेक्षा, कोंडीला वाट देऊन घेतलेला मोकळा श्वास आहे, रसरसून अनुभवलेले, जगलेले बेभान क्षण आहेत तशी दुभंगलेल्या विश्वासाच्या रक्तबंबाळ जखमांची ठुसठुसही आहे...

ही ठुसठुस सर्वांत पहिल्यांदा उमटते ती सोळाव्या वर्षाच्या आठवणीनं. अमृता प्रीतम यांच्याच शब्दात सांगायचं तर 'सोळावं वर्ष हे सरळ सरळ घराचं दार ठोठावून आलं नाही. चोरासारखं आलं.' घरातलं मध्यमवर्गीय, पारंपारिक वातावरण, तारुण्याची ओळख होण्याआधीच आयुष्यातून निघून गेलेली आई, धार्मिक आणि परंपरांनी जखडलेले वडील आणि त्या वयातलं भरून येणारं मन मोकळं करावं असं घरात दुसरं कुणी नाही. या कारणांमुळे ऐन सोळाव्या वर्षात वेडी स्वप्नं किंवा कोवळी थरथर यांच्याऐवजी त्यांच्या वाट्याला आली ती कुचंबणा, असहाय्यता आणि बेचैनी. अमृता प्रीतम यांना सोळाव्या वर्षाच्या रंगीबेरंगी क्षणांची अनुपस्थिती इतक्या तीव्रतेनं जाणवते ती त्यांना लाभलेल्या संवेदनाक्षम आणि चिंतनशील स्वभावामुळे ! आणि इतक्या वर्षांनंतर या अनुपस्थित वर्षांची ठुसठुस शब्दांतून तितक्याच तीव्रतेनं व्यक्त होते. सोळाव्या वर्षीचा विविध कोनातून केलेला विचार वाचताना नकळतच मनात हिशेब सुरू होतात ते स्वतःच्या सोळाव्या वर्षीच्या बेरीजवजाबाक्यांचे आणि 'रसीदी टिकट' च्या सुरुवातीच्या काही पानांशीच जडलेलं हे आणि असं नातं पुढं पुढं आणखी दृढ होत जातं.

## घटनांचे ओरखडे

सोळाव्या वर्षी हरवलेले, खुळे-बावरे क्षण अमृताजींनी पुढं आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर गोळा करण्याचा प्रयत्न केला. साहिर, इमरोज, सज्जाद हेच ते वेगवेगळे टप्पे. कारण त्यांच्या वैवाहिक आयुष्याची स्थितीही सोळाव्या वर्षासारखीच होती. चार वर्षांच्या असतानाच ठरवलेलं लग्न सोळाव्या वर्षी झालं; पण सगळं काही सुरळीत असतानाच खऱ्या अर्थानं मनोमीलन असं झालंच नाही ! दिवसेंदिवस परस्पर नात्यातील वीण पक्की व्हायच्याऐवजी उसवतच गेली आणि परिणामी पूर्ण विचारांती दोघांनी निर्णय घेतला तो विभक्त होण्याचा ! अर्थातच हा शेवट कुठल्याही प्रकारच्या कटुतेतून, तिरस्कारातून किंवा तक्रारीतून झालेला नव्हता, याची ग्वाही मिळते ती त्यांच्याच एका वाक्यातून– '...आता जेव्हा ती साथसंगत सुटत होती, तेव्हा दोघांच्यामधलं सच्चेपण कायद्यापेक्षा किती तरी पटींनी अधिक दृढ झालं होतं.' यानंतर इमरोजशी मैत्री फुलत गेली.

अमृता प्रीतम यांच्या सज्जादशी असलेल्या मैत्रीचा वृत्तपत्रांनी विकृत अर्थ लावला. परिणामी या पवित्र मैत्रीचा उच्चारही एक पाप ठरलं होतं; पण या साऱ्याचा यात मोकळेपणानं उल्लेख आहे तो 'त्याच्या (सज्जादच्या) उल्लेखाशिवाय या साऱ्या आठवणी अपूर्ण राहतील म्हणून !'

साहिर हा अमृताजींच्या दृष्टीनं एक विचार होता किंवा स्वतःच्याच विचारांची एक जादू होती, तर इमरोजबरोबरचं आयुष्य ही एक अखंड धुंदी होती. पतीपासून विभक्त झाल्यानंतरच्या एकाकीपणानं घेरलेल्या दिवसांत त्यांना इमरोजच्या निखळ मैत्रीची साथ मिळाली आणि तेही दिवस केव्हाच सरले ! साहजिकच इमरोज त्यांच्या सुखदुःखांचा वाटेकरी झाला आणि या साऱ्या भावक्षणांचे कंगोरे 'इमरोज', 'छोटं सत्य, मोठं सत्य' या प्रकरणांत अधिक स्पष्ट झालेच आहेत; पण त्याशिवाय या तिघांच्या आठवणींचे पारदकणही ठिकठिकाणी या कथनात विखुरलेले आहेतच. इमरोजशी त्यांची अधिक जवळीक होती आणि या जवळिकीचं सारं सार व्यक्त होतं ते 'पिता, भाऊ, मित्र आणि पती कुठल्याही शब्दाशी कसलाही संबंध नाही; पण तुला पाहिलं आणि सारीच अक्षरं सार्थक झाली !' या एका शेरामध्येच अमृताजींच्या इमरोजविषयीच्या भावभावना एकवटलेल्या दिसतात आणि लौकिक अर्थानं कुठलंही नातं नसताना अमृताजी आणि इमरोज यांची मैत्री अनेक नात्यांनी समृद्ध झाल्याचं निदर्शनास येतं

आयुष्यातल्या या नादावलेल्या दिवसांची नोंद करताना हळुवार होणाऱ्या लेखणीला समकालीन साहित्यिकांकडून, वर्तमानपत्रांकडून मिळालेली अवहेलना, उपेक्षा यांचं वर्णन करताना एक प्रकारची कडवट धार चढते. 'अमृता डेलिगेशनमध्ये असली तरी आमच्या बायका आम्हाला डेलिगेशनमध्ये जाऊ देणार नाहीत–' या शब्दात पंजाबी लेखकांनी केलेली उपेक्षा, 'गर्भवती' या कवितांच्या निमित्तानं त्यांच्यावर उठवलेली टीकेची झोड आणि 'कामुक मुंगी' म्हणून दिलेला किताब, हे सारं होत असताना पंजाबमधील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिकांनी स्वीकारलेलं मौन, १९६८ मध्ये झेकोस्लोव्हाकियाविषयी लिहिलेल्या कवितांवर लावण्यात आलेलं 'पोर्नोग्राफी'चं लेबल.. या व अशा कैक घटनांनी अमृताजींना अनेकवार खोलवर घायाळ केलं. याशिवाय अधूनमधून घडणाऱ्या घटनांनी ओरखडे उमटवलेच ! आज या भूतकाळाविषयी लिहिताना शब्द तटस्थ होतात. तटस्थ अशा दृष्टीनं की, या निमित्तानं समकालिनांवर कोरडे ओढण्याचा किंवा आपण किती निर्दोष होतो हे दाखवून देण्याचा अभिनिवेश नाही तर या लिखाणालाही एक संयमित सूर आहे, तो म्हणजे जखमेवरची खपली काढलीय खरी; पण ती इतक्या हलक्या अलवारपणे की, जखम उघडी होईल; पण रक्त भळभळा वाहणार नाही. त्यामुळं या घटना कटू असल्या, त्या वर्णन

करताना एक प्रकारचा कडवटपणाही डोकावत असला तरी त्यामुळं या आत्मकथनाचा सूर कडवट होत नाही. याला आणखी एक महत्त्वाचं कारण म्हणजे अमृता प्रीतम यांना समकालीन पंजाबी साहित्यिकांकडून सापत्न वागणूक मिळाली असली तरी देशोदेशींच्या साहित्यिकांकडून, रसिकांकडून मात्र कौतुकाचे, प्रेमाचे अनेक अमूर्त समाधानी क्षण त्यांच्या पदरी पडले ! यात ओळखीचे होते, तसे अनोळखीही होते. मान्यवर होते तसे सामान्यही होते. नात्याचे होते तसे नात्यानं कुणी नसलेलेही होते. उजबेकिस्तानमधल्या लोकांच्या अकृत्रिम प्रेमाविष्कारानं भारलेल्या अमृता प्रीतम यांनी 'मला स्वत:च्या घरी बोलवून आयुष्य माझा पाहुणचार करायला विसरलं' ही आपल्याच एका गीतातील तक्रार व्यर्थ असल्याचं मान्य केलं. त्या लंडनला गेल्या असताना तेथे भरलेल्या एका मैफिलीत प्रसिद्ध गायक नजाकतअली आणि सलामतअलीही हजर होते. मैफिलीच्या शेवटी त्यांना गाण्याची विनंती केली; पण तेथे ना साथीदार, ना साथ संगत; पण तरीही ते गायले ते एकाच कारणाखातर... 'हमने आजतक बिना साजके कभी गाया नही...मगर जिसने 'वारिसशाह' कविता लिखी है - आज उसके लिए बिना साजके भी गाएँगे' ज्या 'वारिसशाह' कवितेचा नजाकतअलींनी इतक्या जाणीवपूर्वक आणि आदरपूर्वक उच्चार केला ती अमृताजींची कविता अशीच वादग्रस्त ठरली होती. फाळणीच्या वेळी झालेल्या भीषण अत्याचाराच्या खुणा त्यांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या होत्या आणि या खुणांनी त्यांचा ठावठिकाणा सोडला नाही. पंजाबच्या लक्षावधी कन्यकांचं आक्रंदन ज्याच्याजवळ सांगावं अशी एकच व्यक्ती त्यांच्या डोळ्यांसमोर होती आणि ती म्हणजेच हीरचं दु:ख गाऊ शकणारा कवी वारिसशाह. ज्या कवितेच्या रूपात हे सारे विचार शब्दबद्ध झाले ती कविता म्हणजेच 'वारिसशाह !' या कवितेनं लोकांच्या डोळ्यांतून पाणी काढलं होतं, लोकांना अक्षरश: वेडं केलं होतं आणि अशी क्षमता असलेल्या कवितेच्या वाट्याला टीका, निंदानालस्ती आलीच ! साहित्यकृती एकच पण ती उलटसुलट प्रवाहांच्या लाटांवर हेलकावे खात असतानाच तिनं कौतुकाच्या अमृताची गोड, शीतल तर टीकेच्या जहराची कटु, जळजळती जाणीव एकाच वेळेस दिली. याशिवाय 'अमृताजींचं साहित्य' ज्यानं वाचलंय, तो स्त्रियांशी गैरवर्तन कधी करूच शकणार नाही' असं त्यांना सांगणारा एक साधाभोळा सैनिक 'दूर पंजाबात राहणाऱ्या या स्त्रीशी मैत्री करायला हजारो हात उत्सुक आहेत,' असं कळवणारी रूसी कवयित्री रिम्मा काजाकोवाने, 'व्हेन आय रीड अमृता प्रीतम माय अँटी इंडियन फीलिंग्ज आर व्हॅनिश्ड्' असं आपल्या डायरीत लिहून ठेवणारे नेपाळचे कादंबरीकार धूसवाँ सायमी !

## अकृत्रिम लय

आयुष्याच्या वाटचालीत वेळोवेळी कडोसरीला लावलेल्या अशा घटना, अनुभव लिखाणातून डोकावणं स्वाभाविकच होतं. कधी हे अनुभव दुसऱ्याचे होते तर कधी स्वत:चे. प्रत्यक्ष लिखाण करताना ही जाणीव मनात असायचीच असं नाही; पण ती कलाकृती हातावेगळी झाल्यानंतर अलिप्त दृष्टिकोनातून बघताना मात्र त्यातील विशिष्ट व्यक्तींचे, प्रसंगांचे संदर्भ पटकन जाणवायचे. त्यामुळेच 'यात्री' या कादंबरीच्या नायिकेनं–सुंदरानं–त्यांचं अवघं आयुष्य व्यापून टाकलं होतं आणि एका निसटत्या क्षणी जाणवलं होतं की, सुंदरा हे स्वत:चंच रूप आहे. 'पिघलती चट्टान' मध्येही स्वानुभवच शब्दरूपानं अलगद साकार झाला तो अंतर्मनाला चुकवूनच. साहजिकच त्यांच्या मनाच्या जडणघडणीचा त्यांच्या साहित्यकृतींवर गाढा परिणाम झाला होता. कारण त्यांनी स्त्रीचं परंपरावादी स्वरूपच फक्त आदर्श आहे, असं कधीच मानलं नाही, तर त्याहीपलीकडे जाऊन त्यांनी स्त्रीच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. 'मन' असलेल्या स्त्रीचं चित्रण करण्याचा प्रयत्न केला. साहजिकच त्यांच्या नायिका या समाजविचारांच्या दोन पावलं पुढंच होत्या. परंपरावादाला घट्ट चिकटून बसलेल्या समाजमनाला हे विचार, हे चित्रण यांच्याशी समझोता करणं अवघड झालं तर नवल नाही. एकदा दूरदर्शनवरील मुलाखतीत त्यांना एक असा प्रश्न विचारला गेला होता की, 'तुमच्या कादंबरीच्या नायिका आत्मसत्याच्या शोधात भरली घरं उध्वस्त करून जातात ! हे समाजाच्या दृष्टीनं हानिकारक नाही का?' यावर अमृताजींनी शांतपणे उत्तर दिलं. 'आजपर्यंत जेवढी घरं उध्वस्त झाली ती असत्याच्या हातून. आता काही घरं सत्याच्या हातून होऊ द्यात !' याच दृष्टिकोनातून त्यांच्या नायिकांनी मन 'मारून' तर सोडाच; पण मन 'बाजूला' ठेवूनही जगायचं नाकारलं. केवळ स्त्रीच्याच स्वातंत्र्याच्या मागणीसाठी नाही तर कुठल्याही विचित्र, चुकीच्या चालीरीती, समजुती, मार्गाविरुद्ध अमृताजींची लेखणी सदैव तत्पर होती आणि अंगावर येणाऱ्या टीकेच्यानिंदेच्या झोंबत्या वाऱ्याच्या भीतीनं या लेखणीनं कधीच आपला मार्ग बदलला नाही की, तिची धार कमी झाली नाही.

या आत्मकथनाचा मार्ग पुढं सरकतो तो कवितेचा साज लेवूनच. साहजिकच अनुवाद करताना या तरल अभिव्यक्तीचं भान जरा जरी सुटलं तरी या रंगलेल्या सुराचा नूर विघडून जायची किंवा या आत्मकथनाचे कंगोरे बोथट व्हायची शक्यता होती; पण डॉ. मुरलीधर शहा यांचे हे भान कुठेही–जराही सुटलेलं नाहीय आणि तरीही हा अनुवाद आहे, या पार्श्वभूमीपायी येणाऱ्या कृत्रिमतेलाही यात कुठे थारा नाही. तर एक सहज, अकृत्रिम लय आहे आणि यातच या अनुवादाचं लक्षणीय यश सामावलेलं आहे.

हे सगळं अगदी पूर्णपणे मान्य केलं तरी एक गोष्ट खटकते आणि ती म्हणजे मराठी अनुवादात पंजाबी कविता तशाच ठेवून त्यांचा तळटीपेत दिलेला मराठी अनुवाद. आत्मकथनाच्या ओघवत्या लयीशी लय साधण्याच्या प्रयत्नात मध्येच येणाऱ्या या पंजाबी कवितांनी बाधा येते. कारण पंजाबी भाषेबद्दलचं अज्ञान. असं करण्यामागचा हेतू नीटसा स्पष्ट होत नाही त्यामुळं कथनाच्या ओघात मराठी अनुवाद देऊन हवं तर पंजाबी कविता तळटीपेत दिल्या असत्या तर अधिक बरं झालं असतं असं वाटल्यावाचून राहात नाही.

–शुभदा रानडे

# रंगभूमी

### आवर्जून पाहावा असा लघुपट

# पु. ल.

वि. भा. देशपांडे

---

**म**हाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात काही व्यक्ती केवळ आद्याक्षरांवर सहजपणाने ओळखल्या जातात. अशांपैकी पु. ल. देशपांडे हे एक अग्रभागी असलेले व्यक्तिमत्त्व आहे. म्हणूनच त्यांच्या जीवनावर काढलेल्या लघुपटाला ‘ पु. ल. ’ असे सार्थ नाव दिले आहे.

भारतसरकारच्या डॉक्युमेंटरी विभागाने पु. लं. वर एक व्यक्तिजीवन–लघुपट नुकताच तयार केलेला आहे. त्याचे काही खाजगी खेळ पुण्यात नुकतेच प्रदर्शित झाले. जी व्यक्ती सरकारला फारशी अनुकूल नाही, अशा व्यक्तीबद्दल ( मग ती कितीही जनप्रिय असो) सरकारला इतके प्रेम येण्याचे कारण संभवत नाही; पण या लघुपटविभागातील श्री. देव्हरे यांनी पु. लं. ना आग्रह करून हे करणे किती आवश्यक आहे, हे पटविलेले असावे. मराठी माणसाची अस्मिता, संकोच आणि बरेच काही गुणावगुण अशा नकाराला यापूर्वी कारणी ठरले असतील. कारणे कोणतीही असोत; पण शासकीय स्तरावर झालेल्या या प्रयत्नाला पु. लं. नी मन:पूर्वक प्रतिसाद दिला हे अनेकार्थांनी चांगले झाले.

एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण घटनांचा क्रम अपेक्षित असतोच, तसा तो येथेही आहे. जन्मापासून साठीपर्यंतचा कालखंड यासाठी घेतलेला आहे; पण केवळ घटनांमागून घटना सांगणे एवढीच दृष्टी यामागे नाही, तर आपण कोणत्या वास्तूत, परिसरात आणि मुख्य म्हणजे कोणत्या माणसांच्या सहवासात घडलो गेलो या सूत्रावर अधिक भर दिला गेला; तो योग्यच आहे. पु. लं. चे जीवन हे अनेक कलागुणांचे मजेशीर रसायन आहे. संगीत, नाट्य, साहित्य, भाषण, चित्रपट आदि अनेक गोष्टींमध्ये त्यांना केवळ आवड–हौस आहे असे नव्हे तर त्यावर त्यांची हुकमत आहे. ते ज्या ज्या क्षेत्रात विहरत राहिले, त्या त्या ठिकाणी त्यांनी आपल्या कर्तृत्वाची मुद्रा प्रस्थापित केली. अशा क्षेत्रांची नुसती नावे सांगण्यासाठी सुद्धा बराच वेळ जाईल. ती क्षेत्रे सर्वांना परिचित आहेतच. अशा भिन्न क्षेत्रांत वावरलेल्या व्यक्तीच्या लघुपटात प्रत्येक क्षेत्रातील कामगिरी खोलवरपणाने दाखवायची ही अशक्य गोष्ट आहे. त्याची झलकच पाहावयास मिळणार. तशीच अनेक कलागुणांची झलक इथे आपण पाहत राहतो.

पु. लं. ची बहुविध क्षेत्रांतील कामगिरी जर नीटपणाने आपण न्याहळली तर आपल्या असे ध्यानात येईल की, हा एकटा माणूस स्वगुणांच्या ताकदीवर ‘ बहुरूपी ’ म्हणून वावरतो आहे. हीच त्यांची प्रतिमा या लघुपटाच्या अभिव्यक्तीसाठी वापरलेली आहे. पु. ल. आपल्याला आपल्या स्वत:च्या आयुष्याविषयी अगदी सहजपणाने सांगत आहेत. त्यांचे हे सांगणे कोठेही कृत्रिम होऊ नये म्हणून त्यांनी ते सतत हलते–फिरते आणि विविध ध्वनि–दृश्य माध्यमांच्या आधाराने गतिमान, जिवंत ठेवले आहे. आपल्याला अनेक लघुपटांत अनुभवाला येणारी एक पद्धत या ठिकाणी जाणीवपूर्वक टाकली असावी, ती म्हणजे ज्या व्यक्तीचे चित्रण करायचे तिच्या केवळ हालचाली, छायाचित्रे आदींचा वापर करून दुसऱ्याच कोणा व्यक्तीचा अदर्शनीय ध्वनी शब्दरूपाने वापरायचा. या ठिकाणी तसे काहीही न करता पु. ल. आपल्याला अनेक ठिकाणी घेऊन जातात, आपल्याशी सुखसंवाद करतात, आयुष्यात आपल्याला काय व्हायचे होते, पण त्याआधी आपण परिस्थितीमुळे कसे भेंडकाळत राहिलो, सन्मानित नोकऱ्या मिळूनही आपले मन कोठेच एका ठिकाणी कसे स्थिरावू शकले नाही, तो आपला स्वभावच नाही, हे सारे हितगुज ते मोकळेपणाने करतात. त्यांनी आचार्य अत्रे यांच्याबद्दल म्हटले आहे की, आपले बोलणे म्हणजे लोकांशी संवाद साधणे आहे, ती कला आपण कशी अवगत केली ते त्यांनी अतिशय नम्रपणाने सांगितले. नुसते सांगितले नाही तर त्याचे प्रात्यक्षिक या लघुपटात करून दाखवले.

### दंतकथाच !

पु. लं. च्या जीवनकहाणीत सुनीताबाईंचा वाटा मोठा आहे. ( पु. लं. च्या शब्दांत उरलेल्या छत्तीस वर्षांची कहाणी तिनेच–सुनिताने सांगायला हवी.) सुनीताबाईंच्या नावाचा, छायाचित्रांचा यथायोग्य वापर लघुपटात झालेला आहे. सुनीताबाईंमुळेच आपल्याला जीवनातले श्रेयस आणि प्रेयस काय असते ते उमगले अशी प्रांजळ कबुलीही त्यांनी दिलेली आहे; पण विशेष म्हणजे सुनीताबाईंनी प्रत्यक्षात येऊन पु. लं. च्या बरोबर बोलण्याचा, सांगण्याचा मोह या ठिकाणी टाळलेला आहे. असा मोह टाळायला कमालीचा आत्मसंयम असावा लागतो, तो त्यांच्याकडे एरवीही आहे. जो लघुपट आता कायम स्वरूपाचा म्हणून जतन करून ठेवला जाणार आहे, अशा ‘ जतनवस्तूत ’ आपण अधिकात अधिक असावे असा सहज स्वार्थी विचार कोणालाही खुणावत राहणार; पण मग इतर कोणी आणि सुनीताबाई यांच्यात विशेष फरक राहिला नसता ! या संयमाने त्यांनी एक चांगला पायंडा पाडलेला आहे. यातून ज्याला काही शिकायचे आहे, समजायचे आहे ते खूप आहे !

या लघुपटात जसे पुष्कळ येऊन गेले आहे तसेच काही राहून गेले आहे, हे पु. लं. नाही मान्य व्हावे. विशेषत: डॉ. वसंतराव देशपांडे आणि पु. ल. यांच्या सहवासातील महत्त्वाचे सोनेरी क्षण किंवा पु. ल. दिल्लीला असताना त्यांनी केलेला ‘ गडकरीदर्शन ’ या कार्य-

क्रमाचा काही तपशील, नांदेडच्या नाट्यसंमेलनाचा थोडासा तपशील आदी. अर्थात अशी यादी करीत असताना हेही लक्षात घ्यायला हवे, सर्वच घटना–प्रसंग सांगायचे–दाखवायचे म्हटले तर हा जीवनचित्रपट दोन-तीन भागात काढायला हवा. शेवटी कोठे तरी निवड करून थाबावे लागतेच.

हा लघुपट सुमारे पावणेदोन तासांचा आहे. हा पाहात असताना आपण पु. लं. च्या सहवासात नेहमीप्रमाणेच काळाचे भान हरपून बसतो; पण त्याचबरोबर तांत्रिकदृष्टचा एका महत्त्वपूर्ण उणीवेची गोष्ट सतत लक्षात राहते. ती म्हणजे या लघुपटात विविध प्रकारच्या ध्वनींचा वापर केलेला आहे. कधी पु. ल. स्वतःसमोर येऊन बोलतात, कधी त्यांचे ध्वनिमुद्रित शब्द आहेत, कधी काही गायकांच्या जुन्या ध्वनिमुद्रिका आहेत. (ज्यांचे आवाज आता क्षीण वाटतात), कधी भाषणाच्या ध्वनि-चित्र-फिती वापरल्या आहेत. या सर्व ध्वनींची गुणवत्ता एकाच स्तरावर राहिलेली नाही. जुन्या ध्वनिमुद्रितांबद्दल आपण एक वेळ समजू शकतो; पण खुद्द पु. लं. च्या ध्वनिमुद्रित शब्दांत आणि पडद्यावरील समोर साक्षात येणाऱ्या शब्दांत असलेली तफावत त्रासदायक होती. क्वचित त्यामुळे रसभंगही झाल्यासारखा वाटला.

भिन्न भिन्न प्रेक्षकांच्या दृष्टिकोनातून आणखीही काही त्रुटी असू शकतील; पण त्या त्रुटींच्या उणीवांपेक्षा किती तरी अधिक पटींनी सुखावणाऱ्या गोष्टी या लघुपटात आहेत. मराठी साहित्यिक कलावंत यांच्या संदर्भात शासकीय स्तरावर होणारा असा प्रयत्न फारच विरळा. म्हणून याचे महत्त्व आहे. कदाचित पु. लं. ना आपण आज हिंडते–फिरते पाहतो आहोत किंवा त्यांच्या जीवनातले अनेक तपशील मराठी माणसाच्या स्मृतीचे धन आहेत, त्यामुळे नाविन्य–कुतूहल कमी प्रमाणात वाटणे शक्य आहे; पण असे लघुपट पुढच्या पिढ्यांसाठी एक महत्त्वाचे साधन असते. पु. लं. सारखा माणूस हा 'जिवंतपणीच दंतकथा' होणाऱ्या भाग्यवान कुळातला आहे. पुढे पन्नास-पाऊणशे वर्षांनी हा व्यक्तिजीवनपट जे लोक पाहतील तेव्हा त्यांनाही हे जीवन म्हणजे एक 'कलात्मक दंतकथा' वाटण्याची शक्यता आहे. एका माणसाला इतक्या कलांमध्ये गती होती, इतकी मान्यता होती, एका कलावंताने लाखो रुपयांचे दान केले, महत्त्वाच्या मानाच्या नोकऱ्या सोडल्या, एकपात्री 'बहुरंगी' सोंग घेऊन लोकांना मनमुराद हसवले, यावर लोकांचा विश्वास बसणार नाही; पण ज्यांनी हा चमत्कार घडवला त्यांच्याच तोंडून त्यांची जीवनकहाणी ऐकण्याचे भाग्यही याच लघुपटामुळे लाभणार आहे!

असा हा 'पु. ल.' नामक व्यक्तिजीवन लघुपट तयार करून शासनाने चांगले काम केले. आणखीही असे काही इतरांचे व्यक्तिलघुपट करणे शक्य आहे; पण ते तयार करून केवळ शीतगृहात जतन-संवर्धन नावाखाली एका पेटीत किंवा खोलीत बंदिस्त होऊन पडू नयेत. ते जनसामान्यांना पाहावयास मिळतील अशी नित्य स्वरूपाची व्यवस्थाही करायला हवी.

पु. ल., तुमच्या लघुपटाने दिलेल्या आनंदाबद्दल तुमचेच मनःपूर्वक अभिनंदन. कारण याही ठिकाणी तुम्ही आपली स्वतःची सर्व कलात्मक वैशिष्टचे वापरून आम्हाला सुखावलेत! पुन्हा एकदा आयुष्याचा एकपात्री खेळ आमच्या साक्षीने आमच्यासमोर मांडलात. आता साठीनंतरच्या आयुष्याच्या लघुपटाची तयारी करायला हरकत नसावी! □

## ¤ सत्कार

'वऱ्हाड निघालंय लंडनला' या एकपात्री प्रयोगाचा ५२५ वा खेळ समारंभपूर्वक औरंगाबादेस ११ मार्चला झाला. या निमित्ताने प्रा. लक्ष्मण देशपांडे यांचा भव्य सत्कार श्रीमती ज्योत्स्नाबाई भोळे यांच्या उपस्थितीत झाला. सत्काराप्रीत्यर्थ प्रा. त्र्यंबक महाजन, प्राचार्य जीवन देसाई आणि वि. भा. देशपांडे यांची गौरवपर भाषणे झाली. हा सत्कार औरंगाबादच्या नाट्यपरिषदेने आयोजित केला होता. □


फाळणी नाकारली तरी रक्तपात होतो
स्वीकारली तरीही तो टळत नाही.
अब्राहम लिंकनने ह्यातला पहिला पर्याय पत्करला.
त्याच्या अजरामर राजकीय जीवनाची कथा.

अब्राहम लिंकन
फाळणी टाळणारा महापुरुष
वि. ग. कानिटकर



भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली पहिली डिलक्स आवृत्ती.
मोठा क्राऊन आकार
पृष्ठे : सुमारे ४००
मूळ किंमत : रु. १५०/- किमान

पुस्तक १ जूनला प्रकाशित होईल.

राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव पेठ, पुणे. ४११ ०३०.

पंजाब वार्तापत्र एक : पंजाबनं एक फाळणी अनुभवलीय, आता पुन्हा नको : पृष्ठ ८ वरून

लगेच भोवती उत्सुक गर्दी जमली. गर्दीतून आम्ही पहिल्या सद्भाव-यात्रेच्या फोटोंचा आलबम फिरवला. ओळखदेख दिली. तिथल्या कार्यकर्त्यांनाही रजिस्टरमधल्या जुलै ८३ मध्ये आमची नोंद सापडली. एवढं झाल्यावर चहा आला, पाठोपाठ सैलसर मोकळेपणा आला. शेवटी वातावरणात आपुलकीही आली असावी.

## आमच्याकडून धक्का नाही !

संत लोंगोवाल यांचीही तासभर भेट झाली. अकाली दलाचे इतर १०/१२ नेतेही तिथेच बसलेले होते. वुलनची सुरवार आणि कुडता या वेशात मांडी घालून बसलेले संत लोंगोवालजी जुलैतल्यापेक्षा वेगळे दिसले किंवा कदाचित आमच्या दृष्टीतला हा दोष असेल. दरम्यानच्या सहा-आठ महिन्यात काही वेळा टोकाची विधाने संत लोंगोवालजींनी उच्चारलीत. आताही साधारण तसंच झालं. प्रथम पहिल्या यात्रेच्या आठवणी, आलबम पहाणी आणि जरा इकडचे तिकडचे झाल्यावर गाडी रुळावरून धावू लागली. इकबालजींनी प्रस्तावनेचं वाक्य उच्चारलं, 'मागल्या सहा महिन्यात पंजाबमधली स्थिती अधिकच बिघडत गेलीय...' चटकन् संत लोंगोवालजींचं तीव्र उत्तर आलं 'याला केंद्र सरकार जबाबदार आहे.' त्यांनी हा प्रश्न लटकवत ठेवलाय. राजकारणाच्या निसरड्या रुळांवरून काही काळ चर्चा धावली. मी नम्रपणे मांडायचा प्रयत्न केला की, 'राजकारणातल्या या गुंतागुंतीवर आम्हाला काही म्हणायचं नाही; पण शतकानुशतकं असलेलं ऐक्य तुटत चाललंय ही चिंतेची गोष्ट नव्हे का?' तर उत्तर आलं की, 'त्याला आम्ही जबाबदार नाही आहोत. शिखांवर हरियाणात पहा कसे अत्याचार झाले!' त्यापूर्वी पंजाबमध्ये दीर्घकाळ काय चालू होतं असं मला विचारावंसं वाटलं; पण विचारलं नाही. कारण त्याचा नकळत का होईना असा अर्थ झाला असता की, हरियाणातल्या प्रतिक्रियेचे आम्ही समर्थन करतो आहोत. हरियाणातले काही शिख मुख्यमंत्री भजनलाल यांना भेटायला गेले होते तेव्हा त्यांनी 'मग, गेलं दीड वर्ष पंजाबमध्ये नाही का हिंदूंचे खून पडले?' असं त्यांनी उत्तर दिलं, असं संत लोंगोवालांनी सांगितलं. हरियाणात शिखांवर कसे अत्याचार झाले याची काहीशी भडक, अतिरंजित वाटणारी वर्णनं आधीसुद्धा ऐकायला मिळाली होती. त्यातला खरेखोटेपणा सोडा. एवढं निश्चित की, झाल्या प्रकारानं कोणाचाच फायदा झाला नाही. वातावरण अधिकच नासलं. म्हणूनच 'मूळ जबाबदार कोण' असा भांडण उकरून काढणारा प्रश्न आम्ही टाळून म्हटलं 'सहा महिन्यांपूर्वीपेक्षा हिंदु आणि शिखांमधली तेढ वाढल्याचं आम्हाला दिसतंय. ती दूर करायला अकालीदल काही विधायक पावलं उचलणार का? हिंदूंच्या मनात अकालींबद्दल विश्वास निर्माण होईल असं काही करता येईल का? उदाहरणार्थ इकबालजींनी एक सूचना केली. 'अकालीदलाच्या वर्किंग कमिटीत काही 'चंगे' हिंदू, एखादा मुसलमान कोणी ख्रिश्चन'... हे वाक्य चालू असतानाही आजूबाजूचे लोक हसले. संत लोंगोवालजी म्हणाले, 'आता तसंच आहे. आमचं आंदोलन सर्व पंजाबींसाठी आहे. केवळ शिखांसाठी नव्हे, उदाहरणार्थ रावी-बियासच्या पाण्यात अधिक वाटा मिळाला तर तो काही फक्त शिख शेतकऱ्यांनाच नाही! सगळ्यांनाच मिळेल.' 'घटनेचं २५ वं कलम जाळणं हे सर्व पंजाबींच्या हिताचं कसं हे माझ्या लक्षात येत नाहीये. कृपया समजावून सांगता का?' याला काय उत्तर मिळालं ते मला आठवत नाहीये, हा बहुधा माझाच दोष असावा. वाढता हिंसाचार आणि निर्दोष लोकांच्या हत्यांचाही विषय निघाला. 'त्या आम्ही करत नाही, जे करतात त्यांना विचारा!' असं जवळजवळ चिडूनच म्हणून त्यांनी पुरवणी जोडली, आमचे मूळ प्रश्न सुटले तर हे प्रकार थांबतीलही.' काही दिवसांपूर्वीच संत गुरुचरणसिंग तोहरांचंही अशाच आशयाचं वाक्य वृत्तपत्रांतून आलं होतं. याचा अर्थ किती गंभीर होतो आणि यामुळे शिखेतरांच्या मनात किती भय अन् अविश्वास निर्माण होतो हे त्यांच्या लक्षात येत नसेल का? हे आणि असे किती तरी प्रश्न विचारायचे होते; पण ही वाट फक्त वादविवाद, कटुता यांच्या जंगलात शिरून लुप्त झाली असती. म्हणून आधी असलेली कोणतीही रेषा खोडून काढण्याच्या भरीस न पडता शेजारी 'सद्भावयात्रे' ची रेष आखली. २३ मार्चपासून १३ एप्रिलपर्यंत फिरोझपूर ते अमृतसर व्हाया आनंदपूर साहेब ही सद्भावयात्रा महाराष्ट्रातून आलेले युवक करणार आहेत, त्याला पंजाबातल्या सर्वांचेच पंथ, पक्ष भेदांच्या पार-सर्वांचेच सहकार्य हवे आहे. हे सर्वांनी सावधचित्तपणे ऐकून घेतलं आणि संत लोंगोवालजींनी अनुकूलता दर्शविली. या कल्पनेला आमचा पाठिंबा तर आहेच, प्रत्यक्ष सहकार्यही देऊ. 'नो पार्टी बॅनर, नो पोलिटिकल टॉक' असं मृदू ठामपणे सांगितल्यावरही त्यांनी सहकार्याचा हात मागे घेतला नाही. त्यांनी आम्हाला शिरोमणी अकालीदलाचे सेक्रेटरी गुरुचरणसिंग यांना भेटायला सांगितलं. मग मी समारोप केला, 'आम्ही महाराष्ट्रातून आलोत, ते काही इथल्या राजकारणात लुडबुड करण्यासाठी नाही; पण देशाच्या एकात्मतेला, विकासाला धक्का लागू नये असा म्हणण्याचा आम्हाला भारतीय युवक म्हणून हक्क आहे. आमच्या अल्पशा कुवतीनुसार काही करायचा प्रयत्न करणार आहोत. आपल्या सर्वांचे आशीर्वाद हवेत!' संत लोंगोवालजींनीही निरोप दिला. 'काळजी नको देशाच्या एकात्मतेला आमच्याकडून धक्का लागणार नाही! भारताच्या रक्षणासाठी शिखांनी नेहमीच बलिदान केलंय, आताही त्याला आमची तयारी आहे!'

सेक्रेटरी गुरुशरणसिंग याच्याकडे आम्ही पोचण्यापूर्वी अध्यक्षांच्या कार्यालयातून फोन आला असावा. कारण खुर्चीत बसल्या बसल्या 'काय काय मदत हवीय' असा प्रश्न आला. येईल त्या उत्तरावर चर्चा करण्यासाठी भोवती इतर कार्यकर्तेही तयार होते. त्यात अकालीदलाच्या 'युवकशाखे'चा अध्यक्ष इंदरजितसिंग बागोसुद्धा होता. २७-२८ च्या आसपास असलेल्या इंदरजितसिंगनं 'रिलिजन'-मध्ये काम केलं आहे. फिरोझपूर व अमृतसरचे कार्यक्रम आणि संपूर्ण यात्रा यात शिख युवकांचा सहभाग हवा असं म्हटल्या म्हटल्या पटकन् उत्तर आलं 'दिला!' नो पार्टी बॅनर नो पोलिटिकल टॉक

हे सूत्र पुन्हा उच्चारलं तरी 'बिलकुल ठीक.' ज्या गावात जाऊ तिथल्या युवकांनी आमच्याबरोबर विविध कार्यक्रमात सहभागी व्हावं, पुष्कळ मदत या सर्वांविषयी इतक्या सहजपणे योजना होत गेली की, माझा विश्वासच बसेना. 'तुमचा सर्व प्रोग्रॅम निश्चित झाल्यावर आम्हाला कळवा. त्यानुसार पंजाबमधल्या आमच्या शाखांना आम्ही सूचना देतो' अशासहित मूळ मुद्द्याची चर्चा पूर्ण झाली. नंतर गप्पा चालू राहिल्या. नंतर AISSF (ऑल इंडिया शिख स्टुडंट्स् फेडरेशन) च्याही युवकांच्या भेटीगाठी झाल्या.

संध्याकाळी ५॥ ला चावलाजींकडे गेलो. ६.०० कर्फ्यू सुरू होणार होता त्यामुळे ताबडतोब फिरोझपूरला जाणं शक्य नव्हतं म्हणून 'डॅडी' अकालीदलाच्या ऑफिसात थांबले. मी घरी गेलो तर त्यांच्याकडे आणखी पाहुणे आले. असं लक्षात आलं की आपली अडचण होणार आहे. म्हणून ५.५० ला सामान काढून गल्ल्यांमधून पळत सुटलो. अकालींनी आधीच कल्पना दिली होती की, कर्फ्यू अत्यंत कडक आहे. सहानंतर रस्त्यावर दिसणारा नंतर सीधे जेल-मध्येच दिसतो. धापा टाकत सुवर्णमंदिर कॉम्प्लेक्समध्ये शिरलो अन् कर्फ्यू सुरू झाला. अकालीदलाच्या कार्यालयात गेलो तर जरा धावपळ चालू होती. फोन खणखणत होते. हा शिवरात्रीचा दिवस होता. बसअड्ड्याजवळच्या शिवालयात उत्सव चालू असताना बॉबस्फोट झाला. आठ-दहा स्त्रिया, मुलंमुली, पाचपन्नासजण जखमी झाले. बहुधा हा प्रकार करणारे दोघे पकडले गेले; पण लोकांनी चिडून दंगल सुरू केल्यावर पुन्हा आधी अश्रुधूर, नंतर गोळीबार, अमृतसरमध्ये २४ तासांचा कर्फ्यू जाहीर झाला. या सर्व बातम्या भराभर ऑफिसात येत होत्या. अफवांचं तर पीक बहरलंच. मग निश्चित बातमी काढण्यासाठी 'पासधारकांना' रवाना करण्यात आलं. सर्व व्यवहार पंजाबीतून चालू होता; पण ९० टक्के भाग मला कळत होता. एव्हाना गुरुमुखी लिपीदेखील थोडीथोडी 'लावता' येऊ लागली होती. संध्याकाळी बातम्यांची सुरुवात झाली· 'Violence in Punjab continues unabale' प्रत्यक्ष सुवर्णमंदिर आणि नानकनिवास यांच्यामध्ये असलेल्या रस्त्यावर जथेच्या जथे जमून बातम्या ऐकत होते. अस्वस्थपणे चर्चा करत होते, नापसंती व्यक्त करत होते. गुरुशरणसिंग कळवळून म्हणत होते, 'सिखोंको यह कलंक है' आम्ही तूर्त तरी सर्वांचे दोस्त बनलो होतो. रात्री जेवणही त्यांच्याबरोबरच. मुक्कामाच्या खोलीत 'गुरुनानक निवासात जाताना हवा फारच छान पडली होती, रस्ता सुनसान होता. परिसर शांत, सामसूम. मंदिराच्या शिखरावरचा निळा दिवा जुलै ८९ तल्या-प्रमाणेच मंदपणे तेवत होता. पृष्ठभागाखाली खळबळ मात्र स्फोटक. प्रत्यक्ष स्फोटाचा परिघ कधी अमृतसर शहर, कधी संपूर्ण जिल्हा-कधी आतासारखा 'संपूर्ण पंजाब;' पण चक्रीवादळाचा डोळा नेहमीच शांत असतो. रात्री बऱ्याच उशीरा इकबालजींनी पुण्यात आपल्या घरी फोन लावला. तो पलीकडून सौ. नी उचलल्यावर खुर्चीत उडी मारून ते जवळजवळ ओरडलेच 'हॅलो सुवर्णमंदिरातून बोलतोय.'

दुसऱ्या दिवशी अमृतसरमध्ये कर्फ्यूच होता; पण काहीही झालं तरी आज फिरोझपूरला जायलाच हवे, म्हणून गल्ल्यांमधून रस्ता काढत एक खाजगी गाडी शोधत तिनं 'तरणतारण' इथे सोडलं. आम्ही पोचायच्या आधी तरणतारणमध्ये बँकेवर दरोडा पडला होता. गाव चिडीचिप्प. स्टँडवर मिळालेल्या 'ट्रिब्यून' मध्ये 'शांति-यात्रे'वर एक छोटंसं फीचर 'उजडते चमन को बचाने की कोशिश' तरणतारणहून दुसऱ्या बसनं हरकी नावाच्या गावी, तिथून तिसऱ्या बसनं अखेर फिरोझपूरमध्ये. वाटेत ग्रामीण पंजाब खूप, पहायला; गप्पा मारायला, चाखायला मिळाला. तिथे कुठे 'दंश' पोचल्याचं दिसत नव्हतं. बसमधल्या माना बिनफेटेवाल्यांकडे विचित्रपणे वळत नव्हत्या.

पुढे काय चालू राहिलं? फिरोझपूरमध्ये, परत जालंदरमध्ये शेवटी पुन्हा चंदिगढमध्ये. एक फेरी पूर्ण झाली. तेव्हा जालंदर दूरदर्शन आणि चंदिगढ आकाशवाणीवर महाराष्ट्रातून येणाऱ्या 'शांती-जथ्याची बातमी आली. नंतर दिल्लीहून प्रसारित होणाऱ्या बात-म्यातही. भाई आणि युवती कार्यकर्त्यांनी काम इतकं उत्तम करून ठेवलं होतं की, आता आम्ही लोकांकडे जाण्याऐवजी लोक पत्ता शोधत येत होते. आम्ही काय मदत करू असे विचारत होते. वृत्तपत्रांतली बातमी वाचून अनेकांची पत्रं आली होती अभिनंदन करणारी आणि सहभागाची इच्छा व्यक्त करणारी. केंद्रसरकारच्या 'कामगार प्रशिक्षण संघटनेनं' पूर्ण मदत देऊ केली. आणखी एक सभा झाली. चंडिगढमध्ये पत्रकारपरिषदेत सद्भावयात्रेच्या उप-क्रमाची माहिती दिली. हिंदुस्थान टाइम्सचे आर. पी. माथूर, इंडिया टुडेचे गोविंद हुकराल यांनी परिस्थितीचं गांभीर्य समजावून देत 'Go Ahead' असे आशीर्वाद दिले. अत्यंत बुद्धिनिष्ठ, सडेतोड चर्चेनंतर माथुरजींनी 'गुरुनानकदेव के आशीर्वाद आप के पीछे हैं' असं हळवेपणानं म्हटलं तरी पण वरच्या सर्व विधायक संवेदनांची संक्षिप्त छबी दिसली, मी पुण्यात पुढच्या कामासाठी परत यायला निघालो, एक प्रतिसाद पंजाबमधून मिळाला होता. आता पुण्यातून, महाराष्ट्रातून युवकांचं समूहगान पंजाबपर्यंत पोचायला हवे.

### We the people of India

परतीच्या प्रवासात पुन्हा 'डेव्हिल्स आल्टरनेटिव' वाचायला घेतलं. अनेक english novels मधल्या हीरोचे गट्स्, कणखरपणा, जिगर यांचं दर्शन खरोखर स्फूर्तिदायक असतं. इथेही दोन शैतानी पर्याय टाळून अखेर ॲडॅम मन्रोनं तिसरा मर्याय शोधून दाखवलाय. 'डेव्हिल'चा पराभव करून दाखवलाय, करता येतो. थोडी निर्भयता थोडी बुद्धी, काम करायची इच्छा आणि पुष्कळ तुम्हा सर्वांचे आशीर्वाद, सहकार्य मिळाले तर काम यशस्वीपणे करता येतं.

निघालो त्या दिवशी 'ट्रिब्यून' मध्ये श्री. प्रेम भाटियांचा एक अप्रतिम अग्रलेख पहिल्याच पानावर चौकटीत आला होता. पंजाब-मधल्या परिस्थितीत आता लोकांनीच जागं होणं आवश्यक आहे-सर्व राजकारण, सर्व पंथ-पक्षभेद बाजूला सारून बळकट लोक चळवळ हे पंजाब-परिस्थितीवरचं उत्तर आहे. पंजाबनं एक फाळणी अनुभवलीय. आता पुन्हा नको. म्हणून उत्तर कुठल्या खुर्चीतून, मंदिरातून किंवा गुरुद्वारातून येणार नाही. ते येईल जनतेच्या मना-तून...उत्स्फूर्तपणे. अग्रलेखाचं शीर्षक होतं – We the people of Punjab. मनातल्या मनात भाटियांजींची माफी मागून मी एक उद्धटपणाकेला, माझ्यापुरतं शीर्षक बदलून घेतलं– We the people of India. □

ही अवश्य काळजी घ्या !' यावर चिंतामणराव मोठ्या कृतज्ञतेने लिहितात, 'इतक्या दूरदर्शीपणाचे, धंदेवाईकपणाचे धडे पितृतुल्य जिव्हाळ्याने योग्य वेळ येताच ते देत..... हा नाट्याचार्य व्यवहारी–म्हणजे आपला स्वत:चा व्यवहार पहाणारा नव्हता–तर त्या सर्व नाटकमंडळीचा अंदाज घेऊन, वडिलकीच्या नात्याने मार्गदर्शन करणारा होता. असा नाटककार कधी कुणाला भेटला असेल किंवा पहाण्यातही आला असेल, असे मला वाटत नाही !'

# नाट्यपंढरी



## □ नाटकवाल्यांचे पालक !

काकासाहेब खाडिलकर हे 'महाराष्ट्र' नि 'गंधर्व' मंडळीचे दैवतच होते. अण्णासाहेब कारखानीस नि बालगंधर्व यांनी, त्यांच्याविषयीचा आदर वेळोवेळी व्यक्त केलाच आहे; पण फार काळ काकासाहेबांचा सहवास न लाभलेल्या चिंतामणराव कोल्हटकरांनी आपल्या 'बहुरूपी'त काकासाहेबांचे मोठेपण, मोठ्या हळव्या शब्दात टिपले आहे. चिंतामणरावांनी नाट्यसृष्टीत पहिले पाऊल टाकले तेच मुळी काकासाहेबांचे बोट धरून !

'Not failure, but low aim is exicute.' हे ब्रीदवाक्य शिरोधार्थ मानणाऱ्या 'महाराष्ट्र नाटक मंडळी'च्या रंगभूमीवर गडकऱ्यांचे 'प्रेमसंन्यास' हे पहिले नाटक आले; पण त्या वेळी 'महाराष्ट्रा'ला फाटाफुटीचे वेध लागले होते. मालकांचे मतभेद चव्हाट्यावर आले होते; पण काकासाहेबांच्या धाकामुळे, कारखानीस-टिपणीस–देशपांडे ही मालकमंडळी दबून होती. तरी पण या कंपनीच्या गढूळ वातावरणाचा गडकऱ्यांच्या नाटकावर नेमका वाईट परिणाम झाला. प्रधान (कमलाकर), अप्पा टिपणीस (विद्याधर) यांच्या नकलाही धड पाठ नव्हत्या. प्रयोग फार ठिसूळ झाला. दुसऱ्याच दिवशी प्रयोगाच्या यशापयशाची चर्चा करताना, काकासाहेबांना न राहवून अप्पा टिपणिसांना त्यांनी खडसावले, 'तुमच्या अशा कृत्यामुळे एक नवा नाटककार जगातून उठणार आहे याची तुम्हाला जाण आहे का?' नुसते इतके बोलूनच काकासाहेब थांबले नाहीत, तर त्यांनी तावडतोब तालमीची घंटा देववून काही प्रवेशांची स्वत: तालीम घेतली. हा सर्व प्रकार घडताना गडकरी तिथेच होते. खाडिलकरांसारख्या सिद्धहस्त नाटककाराने, आपल्यासारख्या नव्या नाटककाराविषयी दाखविलेल्या आपुलकीच्या जिव्हाळ्याने ते भारावून गेले. त्या क्षणापासून ते खाडिलकरांना 'काका' या घरगुती वडिलकीच्या नात्याने संबोधू लागले. 'प्रेमसंन्यास'चे पुढचे प्रयोग रंगू लागले. खाडिलकरांच्या पुण्याईने गडकऱ्यांचा लौकिक वाढीस लागला नि या वाढत्या लौकिकाचा वेलू गगनावेरी गेल्याचेही त्यांनी (काकासाहेबांनी) डोळे भरून पाहिले !

## □ नाटक मालकांच्या हातात हवे

१९२० साली गडकऱ्यांच्या नावामागे दु:खद 'कै.' लागून त्यांचे 'भावबंधन' बलवंत संगीत मंडळीच्या रंगभूमीवर आले. प्रेमसंन्यास नि पुण्यप्रभाव यांच्या नवलाईने, त्यांच्या नव्या नाटकाविषयी कुतूहल होतेच. शिवाय नाटककर्ता अकाली निवर्तल्याने प्रेक्षकांना हळहळही वाटत होती. प्रयोग पुण्यात होता. साहजिकच प्रतिष्ठित विद्वानमंडळींची गर्दी होती. त्यात काकासाहेब खाडिलकरही होते. प्रयोग सर्वांगसुंदर झाला ! बलवंत संगीत मंडळीच्या मालकांनी, मास्तरांच्या नाटकात काहीही न्यून ठेवले नव्हते. चिंतामणराव कोल्हटकर (घन:श्याम), मा. दीनानाथ (लतिका), दिनकर ढेरे (कामण्णा) या प्रमुख पात्रांच्या कामांचे खूप कौतुक झाले. तरी एक गोष्ट सिद्ध होती की, ते नाटक दिनकरचे होते. कारण त्याने आपल्या त्या भूमिकेने नावाचे 'कामण्णा' हे नाणेच पाडले होते. आजही त्यांच्या नावाचा उल्लेख दिनकर ढेरे असा न होता, 'दिनकर कामण्णा' असाच होतो. इतके अफाट यश त्याने त्या भूमिकेत संपादले होते.

काकासाहेब खेळ आटोपल्यावर आत गेले. त्यांनीही नाटकाचे तोंड भरून कौतुक केले; पण एक व्यवहारी सूचना करायलाही ते विसरले नाहीत. ते म्हणाले, 'नाटकातल्या प्रमुख भूमिका नेहमी मालकांच्याच हातात हव्यात. (चिंतामणराव–दीनानाथ–कोल्हापुरे हे तिघे मालक नि दिनकर नोकर होता) दिनकरसारख्या मुलाने उद्या एखादी भलतीच गोष्ट मनात आणली, तुम्हाला सोडून जायचे ठरविले, तर तुम्ही काय करणार? यापुढे

## □ हे माझे भाग्य !

गणपतराव जोशी, भागवत, खाडिलकर, गडकरी अशी थोर नट, नाटककार मंडळी त्या त्या काळात अनेक नटांची श्रद्धास्थाने होती. त्यांच्या पायी माथा ठेवण्यात त्यांना नेहमीच धन्यता वाटे. अशीच एक आठवण केशवराव दाते यांनी अभिनयश्रेष्ठ गणपतराव भागवतांविषयी सांगितली आहे. केशवराव 'महाराष्ट्र नाटक मंडळी'त रहाण्यासाठी पुण्याला आले, तेव्हा त्यांना उतरून घेण्यासाठी खुद्द भागवत स्टेशनवर आलेले पाहून ते भारावून गेले. भागवतांची नि केशवरावांची आधीची ओळख नव्हती. दाते येत आहेत, अशी आगाऊ सूचना मिळाल्याने भागवत स्टेशनवर आले होते. दात्यांनी मात्र 'अरे, हे कांचनगडची मोहना'मधले पिलाजीराव–गणपतराव भागवत !' म्हणून लगेच ओळखले नि त्यांच्यापाशी गेले.

गावात शिरताना योगायोगाने शनिवारवाड्याजवळ प्रा. भानूंची गाठ पडली. भागवतांनी त्यांचे नाव सांगून, त्यांना नमस्कार करण्यास खुणावले. भर रस्त्यात केशवरावांनी प्रा. भानूंना वाकून नमस्कार केला. दाते आपल्या स्वभावाला अनुसरून मोठ्या विनयाने लिहितात– 'खरं म्हणजे, माझ्यासारख्या नवख्या तरुणाला उतरवून घेण्यास आस्थेने त्यांनी स्वत: येण्याची अजिबात आवश्यकता नव्हती. ते आले याचे कारण 'नट' या संस्थेबद्दल त्यांना आतून वाटणारे खरेखुरे प्रेम ! ...भागवतांसारख्या थोर कलावंताचे बोट धरून 'महाराष्ट्र'मध्ये मी पाऊल ठेवले हे माझे भाग्य !

# फॅब धुलाई नजरेत भरते... फॅब धुलाई दरवळत राहते!





# नवीन लेमन फॅब बॉरॅक्स युक्त

## डिटर्जंट वडी

आता आपल्यासाठी भारतात प्रथमच!
लेमन बोरॅक्सचा प्रभावी फॉर्म्युला या डिटर्जंट वडीमधे.
लेमन फॅब बोरॅक्स युक्त डिटर्जंट वडीमधील
धुलाईची शक्ती इतर कोणत्याही साधारण वडी पेक्षा
अधिक जास्त आहे.
फॅबचा खोलवर मुरणारा फेस अगदी तेलकट आणि
चिवट डाग सुद्धा साफ धुवून टाकतो. कपडे अधिक
शुभ्र-चमकदार आणि खरोखरच स्वच्छ धुतले जातात.
फॅब धुलाई नजरेत भरते...
फॅब धुलाई दरवळत राहते!




**नवीन लेमन फॅब बॉरॅक्स युक्त.
स्वच्छ धुलाईसाठी साधारण वडी पेक्षा
अधिक शक्तिशाली!**

कोलगेट– पामऑलिव्हचे दर्जेदार उत्पादन

फक्त महाराष्ट्र राज्यात उपलब्ध.

GKBE.B.84.2 Mar.